राक्षस-विवाह

[मनोविश्लेषणात्मक भावकथा]

लेखक
श्रीकृष्ण केशव क्षीरसागर

प्रस्तावना
शीलवतीबाई केतकर

व्यक्ति आणि वाङ्मय

रा. क्षीरसागर यांच्या टीकात्मक निबंधांचें पुस्तक. प्रस्तुत वाखाणलेल्या टीकाग्रंथांत 'लोकहितवादी'वरील विस्तृत प्रबंध, 'भाषाशुद्धी'वरील तर्कशुद्ध हल्ला, तांबे यांच्या काव्याचें सहृदय समीक्षण, माधव ज्यूलियन्, अत्रे, गडकरी, केळकर वगैरेवरील कलात्मक टीकालेख व शब्दचित्रें आलीं आहेत. उच्च विद्यालयांतील विद्यार्थी व रसिक यांस हा ग्रंथ बहुमोल वाटत आला आहे.

किंमत १। रुपया

प्रकाशक
यशवंत गोपाळ जोशी
६२३/१५ सदाशिव, देशमुख-वाडी, पुणें २.

60039

राक्षस-विवाह

[मनोविश्लेषणात्मक भावकथा]

लेखक

श्रीकृष्ण केशव क्षीरसागर, बी. ए.

प्रस्तावना

शीलवतीबाई केतकर

ऑक्टोबर १९४०

प्रकाशक
यशवंत गोपाळ जोशी
६२३/१५ सदाशिव पेठ, पुणें २.

60091

मुद्रक
श्री. र. राजगुरु
राजगुरु प्रेस, ४०९ नारायण पेठ,
कॉमनवेल्थ कॉलनी, पुणें २.

FOREWORD

There is a proverb which says that "A little touch of nature makes the whole world kin." A very obvious example of this may be seen in the interest which is taken universally in the three great events of life: Births, Marriages, Deaths. These events create an absorbing, almost morbid interest. These facts, even about people with whom we are not in the least acquainted, attract our attention and arouse our curiosity. We find it ard to pass them by. More than that, they also timulate thought and reflection. Old though the ubjects may be, they rarely fail to provoke us new to speculation, to introspection, to philo- ophizing— and if we are of a practical turn of nind, they may even lead us to some constructive hinking.

This story by Mr. Kshirsagar is likely to prove f great interest to many. It is indeed a human ocument. The subject, in itself one of great sychological importance, being so very personal nd intimate in its nature, is one on which it is ot easy to procure a truly frank confession from ndividuals. We may thank the author, therefore,

for passing on to us the material which he was fortunate enough to have in his possession. To me, personally, the reading of it has, to a certain extent, filled a gap which has long existed in my mind.

To one who comes from the West the marriage systems of India form a most fascinating subject for study, from the stand-point of sociology as well as that of the personal element. I must admit that, even after living in Maharashtra among Maharashtrians for twenty years, and after being fairly intimately acquainted with a number of young girls of the " to be married " and " recently married " categories, I have never really succeeded in penetrating to the inmost recesses of their hearts upon this very vital matter. It was not through mere idle curiosity that I sought information, but on account of the tremendous different-ness between the local marriage-usages and those to which I was accustomed. It seemed to me so necessary, for a more sympathetic understanding of those among whom one lives, to know just how they " feel " about this and that in connection with this great event in their lives. Our imagination can lead us only a certain distance, and even then we cannot be quite sure whether our imagination is leading us astray or not. Our guesses may be

wide of the mark. A frank outspoken book like this, based as it is upon fact, may serve us either as a revelation or a confirmation, according to the conclusions at which we had arrived before reading it. In any case, however, we cannot but rejoice that time changes all things, even the local marriage customs. I do not mean to say that there may not be times when we perhaps look back with regret to the days of greater orthodoxy. The present time is one of transition, and the pace at which so-called progress is rushing along, at least in our large cities, sometimes makes us shudder with apprehension. We cannot truthfully say that, "All is well" with the social life of our younger generation. But one thing seems sure, and that is that the recently adopted custom of the honey-moon, as long practised in the West, should prove a blessing to young couples launching their barques on the sea of matrimony. It is to be hoped that the custom will be more generally adopted. Those first few days or weeks alone together will go a long way towards helping the young people to adjust themselves to marriage and to each other in those difficult early days. If the benefit of this is found to be great by couples who have known each other more or less intimately for some time, and who have voluntarily selected each

other as life-partners, then how much greater will it be in the case of those who are practically strangers to each other, and who have become husband and wife for no better reason than that of the selection and practically enforced wish of parents or other guardians.

One fact in the story seems to me rather astonishing, and that is that a girl of the comparatively mature age of seventeen, as highly educated as our heroine is, and who has, moreover, been permitted more than usual freedom by her parents, should, as the author expresses it, be married off just like every other girl. For this she gives her explanation at the end of the book. We wonder whether her parents sufficiently appreciated the sacrifice, and we regret that she should have had to feel the necessity of making it.

Since most people are instinctively reticent on these topics which affect most of us so closely, we must rejoice that the subjects are sometimes taken up in this way, even-though it be in the guise of fiction. Every honest and sincere attempt to ventilate a problem, surely contributes something towards its ultimate solution. Thus we may congratulate the author on a double service rendered— firstly, to literature and secondly, to the cause of social progress.

'Shridhar Niwas'
163 D, Hindu Colony
Dadar (Bombay)
5th October, 1940.

—Shilavati Ketkar

प्रस्तावना*

अशी म्हण आहे कीं, "निसर्गाच्या स्पर्शमात्रेंकरून अखिल जगतांत आप्तपणा उत्पन्न होतो." या नियमाचें अगदीं ठळक उदाहरण म्हणजे मानवी-जीवनांतील 'जन्म,' 'विवाह' आणि 'मृत्यु' या तीन महत्त्वाच्या घटनांविषयीं व्यक्तिमात्रांस वाटणारें कुतूहल हें होय. या घटनांनीं मनुष्यमात्रांत किती गाढ, जवळजवळ विकृत कुतूहल उत्पन्न होतें! ज्यांच्याशीं आपला अर्थाअर्थी संबंध नाहीं, ओळखदेखहि नाहीं, अशांच्या जीवनांत या घटना घडल्या तरीहि आपलें लक्ष वेधतें व कुतूहल जाग्रत होतें. अशा घटनांविषयीं उदासीन राहणें आपणांस जणूं अशक्यप्राय होऊन जातें; एवढेंच नव्हे, तर या घटनांच्या अवलोकनानें आपण विचारमग्न होतों. हे विषय सनातन असले, तरी आपल्या अंतरंगांत कल्पनातरंग व अन्तर्मुखता उत्पन्न केल्याखेरीज राहत नाहींत. इतकेंच काय, पण आपणांस अशा घटनांमुळें थोडें फार तत्त्व-प्रतिपादन केल्यावांचूनहि राहवत नाहीं; आणि आपण थोडे व्यवहाराभिमुख वृत्तीचे असल्यास त्यांतूनच आपणांस कांहीं विधायक विचारांकडेहि वळण्यास चोदना मिळते.

रा. क्षीरसागर यांनीं लिहिलेली ही भावकथा अनेक वाचकांना याच दृष्टीनें फार महत्त्वाची वाटण्यासारखी आहे. ही कथा म्हणजे मानवी जीवनासंबंधींचा एक महत्त्वाचा 'पुराव्याचा कागद'च म्हणण्यास हरकत नाहीं! हा विषयच मुळांत मानसशास्त्रदृष्ट्या इतका महत्त्वाचा आहे, इतका व्यक्तिगत आणि खाजगी आहे कीं,

---

* शीलवतीबाईंच्या सुंदर इंग्रजी प्रस्तावनेचा हा केवळ तर्जुमा आहे. शक्य असेल त्यांनीं मूळ अवश्य वाचावें.

त्यांत कोणतीहि व्यक्ति आपलें अन्तरंग उघडून दाखविणें मुष्कील आहे. आणि म्हणूनच दैववशात् स्वतःच्या गांठीला असलेलें अनुभूतिसाहित्य बाह्य जगापर्यंत पोंहोचतें करणाऱ्या या ग्रंथकर्त्यांचे आपण आभार मानण्यास हरकत नाहीं. व्यक्तिशः मला तर हा 'जीवनरूप पुरावा' (Human Document) वाचून अनेक वर्षें रिता असलेला माझ्या अन्तःसृष्टींतील एक कोपराच भरून निघाल्याप्रमाणें वाटत आहे.

युरोपांत जन्म पावलेल्या व्यक्तीस या देशांतील विविध विवाह-पद्धति, समाजशास्त्र व वैयक्तिक भावना या दोन्ही दृष्टींनीं अत्यंत आकर्षक असा अभ्यासविषय होऊन राहिल्या आहेत. आणि मला हें कबूल करायला हवें कीं, महाराष्ट्रांत, महाराष्ट्रीयांच्या समीप वीस वर्षें राहूनहि आणि उपवर व नूतन परिणीत मुलींशीं दाट परिचय लाभूनहि, मला या जिव्हाळ्याच्या विषयांत त्यांच्या हृदयाचा ठाव काढण्यांत खरोखर कधींच यश आलें नाहीं ! अर्थात् मी केवळ पोरकट कुतूहलामुळें हें रहस्य भेदूं इच्छीत होतें, असें नव्हे ! मला परिचयाच्या वाटणाऱ्या, अर्थात् माझ्या मूळ देशच्या वैवाहिक रूढि आणि या देशच्या वैवाहिक रूढि, यांतील प्रचंड तफावत हेंच माझ्या कुतूहलाचें खरें कारण होतें. आपण ज्या लोकांत राहतों त्यांच्या हृदयाचें यथार्थ आकलन होण्याच्या दृष्टीनें मला लग्नसंबंधासारख्या महत्त्वाच्या घटनेंतील हरएक प्रकारासंबंधीं त्यांच्या विशिष्ट भावना काय असतील हें निश्चितपणें जाणणें अगत्याचें वाटे !

या प्रांतांत आपली कल्पनाशक्ति, आपली सोबत फार दूरवर करूं शकत नाहीं व जेथपर्यंत ती आपणांस पोंचविते, तेथपर्यंतहि आपली वाट बरोबर कीं चूक याची शंकाच असते. अशा नाजुक विषयांतील आपले तर्क अगदीं चुकीचे असण्याचाहि संभव असतो. आणि या पुस्तकासारखें मनमोकळें व उघड लिखाण वास्तवतेवर अधिष्ठित असल्यामुळेंच वाचकांस कदाचित् सर्वस्वीं नवीन ज्ञान देईल; कदाचित

जुने ग्रह अधिक दृढ करील. यांपैकीं कोणत्या प्रकारचा परिणाम हें पुस्तक करील, हें अर्थातच आपल्या पूर्वीच्या मनोभूमिकेवर अवलंबून राहील. कांहींहि असलें, तरी एक गोष्ट मात्र समाधानाची म्हटली पाहिजे कीं, काळामुळें सर्वच बदलत असतें. मग स्थानिक वैवाहिक रूढि तरी कशा बदलल्याशिवाय राहतील ? मी असें मात्र म्हणत नाहीं, कीं जुन्या चालींचा जुना काळ गेला म्हणून आपणांस दुःख करण्याचा प्रसंग येणारच नाहीं. सध्यांचा काळ संक्रमणाचा आहे. आणि ज्याला समाजसुधारणा म्हणण्यांत येते, तें संक्रमण आपल्या मोठाल्या शहरांतून तरी इतक्या वेगानें वाहवत आहे कीं, तें पाहून आपल्या अंगावर भीतीनें कांटाच उभा राहावा ! आपल्या अंतःकरणाची साक्ष विचारल्यास आपल्या तरुण पिढीचें सामाजिक जीवन फारसें नीट चाललें आहे असें आपणांस म्हणतां येणार नाहीं. पण एक गोष्ट मात्र निश्चितपणें सत्य आहे. पाश्चात्य देशांत अनेक शतकें चालत असलेली व या देशानें अलीकडेच स्वीकारलेली हनी-मूनची (अथवा लग्नोत्तर विहाराची) पद्धत वैवाहिक जीवनाच्या समुद्रांत तारूं हांकारणाऱ्या तरुण दांपत्यास सर्वस्वीं शुभप्रद ठरेल. आपण अशी आशा करूं या कीं, ती पद्धत याहून अधिक रूढ होईल. वैवाहिक जीवनाचे हे पहिले दिवस अथवा पहिले आठवडेच या अपोक्त स्त्री-पुरुषांना एकमेकांचे स्वभाव जुळवून घेण्यास व उभयतांचेंहि विवाहसंस्थेशीं जमवून घेण्यास मदत करतील. कारण, हा प्राथमिक काल या दृष्टीनें मोठाच बिकट असतो आणि ज्यांचा लग्नापूर्वीच थोडाफार परिचय असतो व ज्यांनीं एकमेकांस स्वखुषीनें जन्माचे सोबती म्हणून पसंत केलेलें असतें, त्यांनाहि या 'मधुर सहजीवना'पासून (हनी-मूनपासून) येवढा फायदा होतो; तर ज्यांची जवळजवळ तोंडओळखहि नाहीं व जे विवाहबद्ध होण्यास मातापितरांच्या इच्छेहून अगर जबरदस्तीहून वेगळें कारण नाहीं, अशा मुलांमुलींच्या बाबतींत तर हनीमून-पद्धतीचा फायदा किती तरी अधिक होईल.

या भावकथेंतील एका घटनेचें मात्र मला थोडें आश्चर्य वाटलें. या कथेची नायिका सतरा वर्षांची म्हणजे एका दृष्टीनें प्रौढच म्हटली पाहिजे. ती बरीच सुविद्यहि दिसते. खेरीज, तिला तिच्या आईबापांनीं बरेंच स्वातंत्र्य दिल्याचेंहि लेखकानें दाखविलें आहे. अशा मुलीचेंहि लग्न इतर दहाजणींप्रमाणें व्हावें, हीच ती आश्चर्यकारक गोष्ट होय! ती मुलगी या प्रकाराचें स्पष्टीकरण पुस्तकाच्या शेवटीं देते. पण तरी तिनें केलेल्या त्यागाची व स्वीकारलेल्या दुःखाची योग्य जाणीव तिच्या आईबापांस होती कीं नाहीं, याची मोठीच शंका आहे! आणि या मुलीला हा स्वार्थत्याग करून हें जबरीचें जीवन पत्करणें अपरिहार्य वाटलें, हें पाहून आपणांस वाईट वाटल्यावांचून राहत नाहीं.

पण अशा विषयांत कोणीहि झालें तरी, वस्तुस्थितीची वाच्यता स्वभावतःच टाळणार! कारण हे विषय म्हणजे आपल्या अन्तरंगाचा गाभारा होत! आणि म्हणूनच कल्पितकथेच्या रूपानें का होईना, हे विषय कधींकधीं जगापुढें येतात ही एक आनंदाची गोष्ट म्हटली पाहिजे. एखादा सामाजिक प्रश्न जगापुढें आणण्याचा कोणताहि प्रामाणिक प्रयत्न अखेर त्यावरील उपायशोधनास निःसंशय थोडाफार हातभार लावतो.

या दृष्टीनें पाहतां, या ग्रंथाच्या द्वारें ग्रंथकारानें प्रथमतः वाङ्मयात्मक व नंतर समाजसुधारणारूप अशी दुहेरी कामगिरी केलेली आहे. या द्विविध कार्याबद्दल ग्रंथकाराचें अभिनंदन करणें जरूर आहे.

शनिवार, तारीख ५ ऑक्टोबर १९४०
'श्रीधर-निवास'
१६३ D हिंदु-कॉलनी, दादर.

—शीलवती केतकर

पूर्वेतिहास आणि स्वरूप

'It's a part of me that is already dead!'*

—*Shelley*

प्रस्तुत ग्रंथाच्या रूपानें महाराष्ट्र वाचकांपुढें येत असलेली सुदीर्घ भावकथा मीं सुमारें नऊ वर्षांपूर्वीं मुंबईतील सुप्रसिद्ध **'प्रगति'** साप्ताहिकांतून सुरू केली होती. त्यांत सुमारें सात प्रकरणें येऊन गेल्यानंतर तें पत्र सरकारच्या अवकृपेमुळें बंद पडलें. पहिल्या सात प्रकरणांत मीं एका आप्तप्राय मुलीच्या विवाहामुळें मनांत आलेले विचार मांडले आहेत. त्यांपुढील प्रकरणांतून मला त्याच मुलीला विवाहोत्तरविधि व वरगृहनिवास वगैरेंनीं काय वाटलें असेल, हें वर्णावें लागणार होतें. अर्थात् सूक्ष्म अवलोकन व जवळजवळ परकायाप्रवेश केल्याखेरीज हा पुढील भाग लिहिणें अशक्य होतें. कारण सदर कादंबरी म्हणजे रम्य कल्पना आणि कोटिबाज भाषा येवढ्यांवर खुलविलेलें वाङ्मय नव्हे! यांतील विचारांकरितां मला त्याहून वेगळ्या प्रकारची किंमत द्यावी लागली आहे. अर्थात् पुढें बऱ्याच वर्षांनीं नववधू-हृदयाचें माझ्या कल्पनेप्रमाणें आकलन होतांच माझी लिहिण्याची बौद्धिक तयारी झाली, असें मीं ठरविलें. पण ज्या आर्त मनःस्थितींत मनुष्य हृदयाविष्करणाची यातायात करतो, ती संपून मी कांहीं वर्षें, वृत्तीनें थोडा सुखवस्तु झालों होतों. समाज, वाचक आणि दुःखी वधू यांची मला गुमान नव्हती. तरीहि एक प्रिय कर्तव्य म्हणून पुढील बहुतेक भाग मीं सांगली मुक्कामीं दुखण्यांतच संपविला.

---

* 'एपिसायकिडिऑन्' काव्याची प्रस्तावना.

तथापि श्रीयुत प्रभाकर कोल्हटकर यांनीं मला पुस्तक पुरें करणें भाग पडावें, म्हणूनच आपल्या 'संजीवनी' मासिकांत तें आरंभापासून फिरून प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली नसती तर हें आवडतें कामहि याहून लांबणीवर पडलें असतें! या दृष्टीनें रा. कोल्हटकर व इतर अनेक रसज्ञ स्नेही यांच्या प्रेमळ आग्रहाबद्दल मी आभारी आहें.

माझ्या विवाहविषयक भावना 'प्रगतीं'त कथारूपानें प्रसिद्ध केल्या-नंतर थोड्याच वर्षांत माझे विवाहविषयक विचार बदलले. विवाह ही शस्त्रक्रिया असली, तरी ती शारीरिक व मानसिक स्वास्थ्याकरितां सर्वसाधारण माणसास तरी अवश्य आहे असें मत दृढ झालें; आणि मन कठोर करून संसारांत उडी घ्यावी म्हणजे पोहून सुखी होण्याचा मार्ग बहुतेकांना सापडतो, हें निश्चित कळून आलें. या विचार-क्रान्तीला अनुलक्षूनच आरंभीं मी शेलीचें "It's a part of me that is already dead." हें वचन उद्धृत केलें आहे.

सदरहू पुस्तकाची भूमिका अत्यंत स्पष्ट असूनहि नेहमींची ठराविक नसल्यामुळें तींतील वैशिष्ट्य कित्येकांच्या ध्यानांत येत नाहीं. उदा-हरणार्थ, माझे विद्वान् मित्र कै. माधवराव पटवर्धन यांना ही भाव-कथा फार आवडली असून आणि तिच्यांतील मध्यवर्ती प्रश्न त्यांना अर्थात् माझ्याहूनहि अवगत असून ते या भावकथेबद्दल मला म्हणत, "अहो! भाषाशुद्धि, पुरोगामी वाङ्मय, या पंडिती विषयांत वेळ मोडण्यापेक्षां तुमचा तो 'जरठ-कुमारी-विवाह' एकदां पुरा करा ना!"

त्यांच्या उत्तेजनाबद्दल कृतज्ञता वाटत असूनहि त्यांच्या या स्थूल उल्लेखाचें मला हसूं येई; पण त्याच्या आड दडलेल्या धोपटमार्गी गैर-समजाचे वाटेकरी माझे कित्येक भाबडे वाचकहि असतील. जरठाला तरुण कुमारी दिली, तरच त्यांत खेदाला जागा; बाकी तरुण-तरुणींच्या लग्नांत खेदाला कसली जागा? हाच तो गैरसमज. उलट, हें पुस्तक तर असें प्रतिपादीत आहे कीं, अनुरूप वधूवरांचा विवाह-

देखील बहुतांशीं राक्षस-विवाहच असतो. मात्र त्यांतील राक्षसीपणा परिचयामुळें लक्षांत येत नाहीं, येवढेंच !

बाजारी वधूपरीक्षा, वरपक्षाची जेत्याची भूमिका व अपरिचित वराला एका दिवसांत शरीरार्पण यामुळेंच मला रूढ विवाह 'राक्षस-विवाह' वाटतो. बाल-विवाहामुळें नव्हे, कीं वृद्ध-विवाहामुळें नव्हे; उलट बाल-विवाहांत आठव्या वर्षापासून निदान पंधराव्या वर्षापर्यंत परिचयाला व कोर्टशिप्‌ला उत्कृष्ट व पद्धतशीर संधि असे, असेंच माझें मत आहे. आज वीस वर्षांची मुलगी व तीस वर्षांचा मुलगा तोंड-ओळखहि होण्याच्यापूर्वी एका रात्रीं समोरासमोर दाखल होतात व जें प्रणयाचें व दीर्घ परिचयाचें फळ, तें कच्च्या स्थितींत चाखूं लागतात व तोंड कडू करतात. कित्येकदां जन्माचे एकमेकांस विटतात.*

अर्थात् हें पुस्तक वधूंना सहानुभूति म्हणून आहे, तर वरांना उपदेश म्हणून आहे.

या पुस्तकावरून होणारा दुसरा गैरसमज म्हणजे लेखकाला प्रीति-विवाह सर्वस्वीं पसंत आहे हा होय. मला प्रीति-विवाह अर्थातच पसंत आहे. आणि दोन प्रेमी जीवांचें मीलन म्हणजे अत्युत्तम विवाह असें न म्हणण्याइतका अरसिक कोण असेल ? पण प्रेम हें ठरवून करतां येत नाहीं. आयुष्य मर्यादित, त्यांतून तारुण्य अल्पतर असल्यामुळें प्रेमा-सारख्या चंचल पक्ष्याची वाट पाहत बसणें धोक्याचें असतें. शिवाय प्रीति-विवाह करूनहि वधू-वर कायमचे दुःखी होऊं शकतात. कोर्टशिप् अथवा मनधरणी ही कधींहि पूर्ण परिचयास पुरेशी ठरत नाहीं. जे जन्मच्या जन्म आपल्या पत्नीशीं कोर्टशिप् करूं शकतात, म्हणजेच जे जन्मजात रसिक व प्रेमी असतात तेच प्रीति-विवाहांत यशस्वी होतात. अर्थात् मोक्षमार्ग जसा सर्वांकरितां नव्हे, तसा प्रीतिविवाह हाहि सर्वां-करितां नव्हे. उलट, परिचयशून्य लग्नानंतरहि वधूवरांचा परिचय घडवून नंतर गर्भाधान करणें शक्य आहे; इतकेंच नव्हे, तर लग्न ठरल्यापासून

* 'हॅवलॉक् एलिस्' कृत Psychology in Sex, Vol. VI

लग्न लागेपर्यंत वधूवरांना वडील माणसांच्या पसंतीनें परिचय करूं देणें अगदीं शक्य आहे. विवाहानंतर कित्येक रात्रीं केवळ परिचयांत घालविणारे वधूवर माझ्या माहितीचे आहेत. सारांश, प्रीतिविवाहाची श्रेष्ठ योग्यता ओळखीत असूनहि परिचययुक्त विवाह हाच सर्वोपयोगी असें माझें मत आहे.

शिवाय प्रीतिविवाहांतील भयंकर धोकेहि प्रस्तुत लेखक पूर्णपणें जाणून आहे. प्रेमाची वाट ही कड्यावरून चालण्यासारखी आहे. तींतून केव्हां कडेलोट होईल, याचा नियम नसतो. त्यांतच अशा अवघड वाटेवरून प्रेमाला, केवळ एकट्यालाच प्रवास करावयाचा नसतो, तर 'काम'नामक शिकारी कुत्राहि प्रेमाच्या मागोमाग येत असतो. प्रेम म्हणजेहि एक मोठी शिकारच असल्यामुळें या शिकारी कुत्र्याखेरीज चालणेंच शक्य नसतें. तर कधीं कधीं धन्याला धुडकावून देऊन हा मस्त कुत्रा एकटाच शिकार करून टाकतो व विवाह हा प्रेमाचा विषय होण्याऐवजीं कामाचें भक्ष्य होतो. 'प्रेम' आणि 'काम' यांतील अंतर, प्रीतिविवाहांतील खांचखळगे व गुणदोष या विषयांवरहि मीं अलीकडेच लिहिलें आहे. सदर पुस्तक **'गांधर्व-विवाह'** या नांवानें प्रसिद्ध होईल. प्रेम म्हणजे गर्ह्य समजणें हा जेवढा मूर्खपणा, तेवढाच प्रेम म्हणजे एक सुलभ चैन आहे असें समजणें, हाहि होय !

आणि या दृष्टीनें माझ्या 'गांधर्व-विवाह' नामक पुस्तकाचा आजकालच्या प्रीतिविवाहाच्या दिवसांत मार्गदर्शक म्हणून उपयोग होईल; पण अधिक सूक्ष्म व तात्त्विक विचार करणारांचें समाधान 'गांधर्वविवाहां'तील प्रेमचर्चेनें व प्रेमाचित्रानें होणार नाहीं. अशांचेकरितां **'सुफी पर्णमाला'** नामक काव्यमय ग्रंथ मीं सुमारें सहा वर्षांपूर्वी लिहिला आहे. वरील दोन ग्रंथ व प्रस्तुत ग्रंथ मिळून विवाह-विषयक तत्त्वज्ञानाचा एक महत्त्वाचा सांठा ठरेल, अशी माझ्या पुष्कळ विद्वान् मित्रांची समजूत आहे.

बालविवाह, परिचययुक्त विवाह व गांधर्वविवाह या तीन प्रकारां-खेरीजहि विवाहाचा एक श्रेष्ठ प्रकार प्रस्तुत पुस्तकाच्या शेवटच्या प्रकरणांत नायकानें ध्वनित केलेला आढळेल. त्यास 'मानस-विवाह' (Spiritual Marriage—केवळ ध्येयजीवनांतील तादात्म्या-मुळें झालेलें दोन मनांचें मीलन) असें म्हणतां येईल. मनांचें तादात्म्य होणें हेंच शरीरांच्या मीलनाचें ध्येय असतें व मनांचें तादात्म्य झाल्यानंतर शरीरांचें मीलन गौण होय, हाच या अष्टविध विवाहापलीकडील विवाहाचा अर्थ होय. या ध्येयसृष्टीच्या श्रेष्ठतेवर विश्वास असूनहि सामान्य माणसांनीं या विरळ वातावरणांत जन्म काढण्याचा अट्टाहास करणें वेडेपणाचें होय, असें मजप्रमाणेंच सर्व सुज्ञ वाचकांचेंहि मत होईल यांत शंका नाहीं.

शिवाय "श्रेष्ठ पुरुष लग्न करीत नसतात." हें नायकानें उद्‌धृत केलेलें नीत्शेचें वचन शब्दशः घेतलें, तरीहि "श्रेष्ठ पुरुषांनीं लग्न करूं नये!" असें नीत्शेहि म्हणाला नसता. येवढेंच काय, पण नीत्शेसहि त्याची श्रेष्ठता ओळखणारी पत्नी मिळती, तर त्याचेंहि जीवन इतकें दुःखमय झालें नसतें!

आणि ध्येयवाद्यांनीं आपणांस शरीर आहे हें विसरूं नये, हें जितकें खरें, तितकेंच व्यवहारवाद्यांनीं 'Man does not live on bread alone' (म्हणजे मनुष्य केवळ "आहारनिद्राभयमैथुनं च" एवढ्यावरच जगत नाहीं.) हें ख्रिस्तवचनहि लक्षांत ठेवावें. केवळ ध्येयवाद जितका भ्रामक तितकाच केवळ 'व्यवहारवादहि' घातुक होय. आणि म्हणूनच या भावकथेच्या नायकानें रंगविलेलें 'मानस-विवाहा'चें ध्येयवादी चित्र अशक्यप्राय असलें तरी तो केवळ कल्पनाविलास नव्हे. कारण, हा ध्येयवाद आहारनिद्रादिकांहूनहि मनुष्यमात्रास आवश्यक आहे. या ध्येयवादाच्या ओढीमुळेंच मनुष्य पशुत्वांतून वर आला आहे.

आतां, या भावकथेंत अपरिचित पुरुषास शरीरार्पण करतांना नव-वधूस केवढे क्लेश होत असतील, याचें हृदयद्रावक वर्णन आलें आहे.

त्यावरून या अनैसर्गिक मीलनांत पुरुषास क्लेश कोणतेच नाहींत, असाहि समज होणें शक्य आहे! तथापि तसें मात्र प्रस्तुत लेखकाचें मत नाहीं. ज्या ज्या वेळीं माझे प्रिय मित्र किंवा जवळचे आप्त पुरुष अशा धोपटमार्गी लग्नाचे विषय झाले, त्या त्या वेळीं मला ते पुरुषहि दुर्दैवीच वाटले आहेत. कारण, स्त्री-पुरुषांच्या मीलनांत केवळ स्त्रीच शरीरार्पण करते असें नसून पुरुषहि शरीरार्पण करतो, असें प्रस्तुत लेखकाचें मत आहे. आणि जेथें प्रेम नाहीं, निदान परिचयजनित आदर नाहीं, तेथें शरीरार्पण करणें म्हणजे जवळजवळ वेश्याचार होय. अर्थात् धर्माच्या व आप्तेष्टांच्या अध्यक्षत्वाखालीं होणाऱ्या संबंधास वरील नांव मीं सामाजिकदृष्ट्या देत नाहीं. तरी व्यक्तीच्या मनावर त्या संबंधाचा संस्कार इतकाच अनिष्ट होणें शक्य असतें. विवाहसंबंध हा याहून उच्च आनंदाचा व मानसिक उन्नतीचा संबंध होणें शक्य आहे, हें पुरुषांच्या दृष्टीनेंहि मी तितक्याच जोरानें म्हणतों. अर्थात् या भावकथेंतील नूतन पति मीं तितकासा विचारप्रधान दाखविला नाहीं. त्यास अधिक उच्च सुखाची जाणीव नाहीं असें दाखविलें आहे; पण तें केवळ वधूच्या चित्रावरील केंद्रीकरण दृढ करण्याकरितांच होय. कारण सर्वच वर या स्थूल कोटींत मोडतील असें नाहीं. वराच्या दृष्टीनेंहि मामुली विवाहांतील अनैसर्गिक मीलन कष्टप्रदच असतें, याविषयींची साक्ष अनेक विचारी नववर आणि एक वेळ खऱ्या प्रेमाचे वाटेकरी झालेले द्वितीय वर देतील, अशी मला खात्री आहे. आणि पहिल्या प्रेमाशीं एकनिष्ठ असून अन्यत्र विवाहबद्ध झालेल्या एका दुर्दैवी पुरुषाच्या वैवाहिक मीलनादिवशींच्या मानसिक यातना मीं इतरत्र चित्रित केल्याहि आहेत.

अर्थात् एकच मनुष्य--कल्पक किंवा प्रतिभासंपन्न असला तरीहि-सामान्य वधू आणि उच्च मनोवृत्तीची वधू, सामान्य वर व भावनाप्रधान वर, या सर्वांच्या मनांत पूर्ण प्रवेश करूं शकणार नाहीं. या या दृष्टीनें विवाहित व उपवर, पोक्त व अपोक्त, दोन्हीहि अवस्थांतील

स्त्री-पुरुषांनीं, या पुस्तकांत रंगविलेलीं व्यक्तिचित्रें व बऱ्याच सूक्ष्म कोटीला नेलेलें मनोविश्लेषण आपणांस कितपत पटतें हें कळविल्यास समाजावलोकन व आत्मपरीक्षण या दोन्ही दृष्टींनीं मला त्याचा फार उपयोग होईल.

या पुस्तकांतील आत्मनिष्ठ भूमिकेमुळें माझ्या आणखी एका दृष्टिकोनाविषयीं वरवर पाहणारांस एकांगी कल्पना होणें शक्य आहे. तो म्हणजे माझा स्त्री-विषयक दृष्टिकोन. मीं स्त्री-पूजकहि नाहीं किंवा स्त्री-द्वेष्टाहि नाहीं. पुरुषांत जे गुण नसतात, पुरुषांना ज्या गुणांची शक्यताहि कल्पितां येणें कठीण, असे कित्येक गुण स्त्रियांत असतात; पण त्याबरोबरच ज्यांनीं येवढ्या थोर गुणांचें माहेरें होतें असे कांहीं अतर्क्य दोषहि त्याच स्त्रियांमध्यें आढळतात! कोणत्याहि वस्तूचे प्रभावी गुण माहीत असल्याखेरीज तिचा मोठ्यांत मोठा उपयोग करतां येणार नाहीं. उलट, तिचे मुख्य दोष माहीत असल्याशिवाय तिजपासून उद्भवणाऱ्या आपत्तींचें निवारण करतां येणार नाहीं. बंदुकीनें अभिज्ञास प्राणांचें रक्षण करतां येईल किंवा अनभिज्ञास स्वतः-वरच अपघातहि ओढवतां येईल! पण अपघात टाळून स्वसंरक्षणार्थ व शौर्यवर्धनार्थ उपयोग करील, तोच तिचा खरा उपयोग जाणतो असें म्हणावें लागेल. तिचाच, घराला शोभा अथवा टेंकावयाला काठी म्हणून उपयोग करणारा तिचें स्वरूप जाणत नाहीं, असेंच म्हणावें लागेल. स्त्रियांचें खरें सामर्थ्य—कल्याणकारक व अनर्थकारक दोन्हीहि प्रकारचें—न जाणतांहि त्यांच्याशीं जन्म काढतां येतो; परंतु त्यांच्या खऱ्या सामर्थ्याचें व स्वरूपाचें आकलन झाल्यास त्यांचा खरा उपयोग करतां येईल व या दृष्टीनें त्यांचे मोठे गुण व मोठे दोष जाणणें अवश्य आहे असें प्रस्तुत लेखकाचें मत आहे.

हें स्त्री-चरित्रदर्शन व्यक्तिशः झालें म्हणजे पुरें, असें मात्र नव्हे. कारण पुरुष काय किंवा स्त्री काय, कितीहि ज्ञानी असली तरी

मोहवश झाल्यावर वरील ज्ञानाचा उपयोग होईलच असें नाहीं; व म्हणून स्त्री-पुरुषांचे गुणदोष ओळखून सामाजिक संस्थांची व रूढींची आंखणी समाजशास्त्र्यांनीं करून ठेवावी लागते. एकटी व्यक्ति कितीहि बुद्धिमान् अगर कितीहि सद्धेतु-प्रेरित असो, हितप्रद व दूरदर्शी रूढींचा आश्रय केल्याखेरीज प्रबल मोहापुढें तिचा निभाव लागणें शक्य नाहीं.

या पुस्तकांत अर्थातच एका बहुगुणसंपन्न मुलीकडे तिच्या गुणांवर लुब्ध असलेल्या पुरुषानें भावनापरतेनें विचार केलेला आढळेल. म्हणजे एका स्त्रीपुरतें तरी स्त्रीपूजनच आढळेल आणि त्या असामान्य स्त्रीचेहि दोष याच चित्रांत सूक्ष्मपणें ध्वनित केले असले तरी या पुस्तकाच्या नायकापुरतें तरी तें निःसीम स्त्री-पूजनच आहे, यांत शंका नाहीं. परंतु एका स्त्रीचें पूजन म्हणजे दिसेल त्या स्त्रीच्या पायीं लोटांगण घेणें नव्हे ! आणि प्रस्तुत लेखकाचें तर असें मत आहे कीं, ज्यास जन्मदात्या मातेखेरीज एकहि पूजनीय स्त्री भेटत नाहीं, तो एक प्रकारें हतभागीच म्हटला पाहिजे !

सारांश, प्रस्तुत पुस्तकांत भावना व काव्य यांचा रोख एका व्यक्तिचित्राकडे आहे, तर बुद्धि व चिकित्सा यांच्या अंतर्भेदी प्रकाशाचा झोत एका सामाजिक संस्थेकडे आहे.

पुस्तकाच्या सामाजिक हेतूबद्दल व दृष्टिकोनाबद्दल येवढा खुलासा केल्यावर त्यांत अवलंबिलेल्या तंत्राबद्दल दोन शब्द सांगणें जरूर आहे. पुस्तक आकर्षक वाटल्यानंतरहि तें कोणत्या लेखनप्रकारांत मोडतें हा प्रश्न आजकाल सर्वसाधारण वाचकहि उत्पन्न करतात. जींत बाह्य घडामोडींस विशेष महत्त्व नसून मानसिक घडामोडींसच सर्वस्वीं महत्त्व आहे अशा तऱ्हेची ही एक मानसशास्त्रीय भावकथा आहे. अर्थात् असें केवळ मनोव्यापारांचेंच कथानक आणि मनोविश्लेषण हेंच तंत्र असलेली ही पहिलीच सुदीर्घ भावकथा असल्यामुळें तिच्या नवीन प्रकारासंबंधीं येथें निर्देश केला. सारांश, तंत्राच्या दृष्टीनें हें

पुस्तक सर्वस्वीं (Subjective) आत्मनिष्ठ व वैयक्तिक आहे, तर हेतूच्या व जीवनविषयक दृष्टिकोनाच्या दृष्टीनें तें सर्वस्वीं वस्तुनिष्ठ व सामाजिक आहे.

या भावकथेंतील भावनांच्या व मनोविश्लेषणांच्या सूक्ष्मतेसंबंधीं येवढेंच सांगतां येईल कीं, ती केवळ कला किंवा करामत नव्हे; अर्थात् कलेशिवाय ती सूक्ष्मता असह्य व तापदायकहि झाली असती, म्हणून कला तर तींत आहेच. पण केवळ कला हाच तिचा उद्देश नाहीं. जे विधि व जे रिवाज अतिपरिचयामुळें निरुपद्रवी वाटूं लागले आहेत, आणि ज्यांचा एकत्रित परिणाम दुःखद वाटला तरी पृथक् अर्थ कोणींच पाहूं शकत नाहीं, त्या रिवाजांचा खोल अर्थ उलगडून दाखविण्यास ही सूक्ष्मता आणि हें मनोविश्लेषण हेंच एक साधन होतें. आणि उत्कट भावनांचा मागोवा घेत कोणत्याहि मनाचें विश्लेषण केल्यास, तें शास्त्र व काव्य ह्या दोहोंच्याहि कसोटीस उतरण्यास हरकत नाहीं.

अर्थात् दोन हृदयांचें हें स्पंदन रंगवितांना शब्दांनाहि या नैसर्गिक लयीचाच अवलंब करावा लागतो. भावना व भाषा यांची तालबद्धता काव्यालाच नव्हे, तर गद्य भावकथेलाहि अवश्य असते. सारांश, भाषेच्या दृष्टीनें काव्य, कथानकाच्या दृष्टीनें भावकथा आणि हेतूच्या दृष्टीनें सामाजिक कथा हीं या भावकथेच्या रचनेचीं तीन अंगें होत.

आधुनिक वाङ्मयासंबंधीं लेखकांचीहि अशी कल्पना दिसते कीं, प्रचलित प्रश्न हे जसें त्याचें क्षेत्र तशीच दहा-वीस वर्षें हीच त्याची आयुर्मर्यादा; पण प्रचलित प्रश्नांचेंहि एक स्वरूप तात्कालिक असतें, तर दुसरें चिरकालीन असतें. तसेंच कलात्मक वाङ्मयांतहि कांहीं भाग तात्कालिक महत्त्वाचा असतो, तर कांहीं चिरकालीन महत्त्वाचा असतो. विशिष्ट रिवाजांना उद्देशून असलेला भाग कदाचित् चार-दोन पिढ्यांनीं कमी महत्त्वाचा वाटला तरी मानवी हृदयाच्या मूळ प्रकृतीला अनुलक्षून असलेला भाग शाश्वत महत्त्वाचा ठरण्यास हरकत नाहीं; व या दृष्टीनें

पाहतां सर्वंच गद्यवाङ्मय अथवा सर्वच सामाजिक कथावाङ्मय हें चार दिवसांपुरतें असतें, अशा दृष्टीनें लेखकांनीं किंवा वाचकांनीं त्याकडे पाहूं नये असें माझें मत आहे.

उलट, पाश्चात्य गद्याच्या अत्युच्च विकासाकडे पाहिलें म्हणजे गद्यग्रंथांना शाश्वत् वाङ्मयाच्या (Classical Literature च्या) योग्यतेला पोंहोचविणें हा एकोणिसाव्या व विसाव्या शतकाचा विशेष अधिकार आहे असें दिसून येईल. आणि खोल विचार, तीव्र भावना, व दीर्घ तपस्येनें प्राप्त झालेलें भाषाप्रभुत्व यांच्यावर अधिष्ठित असलेलें गद्य, शाश्वत महत्त्वाचें होण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं असें प्रस्तुत लेखकाचें मत आहे.

अशा रीतीनें आपले अनुभव, भावना व त्यांवरील विचार लोकांच्या उपयोगार्थ प्रसिद्ध करणें हा साहित्यिकाच्या जीवनाचा विशेष अधिकार आहे. साहित्य आणि समाजजीवन या प्रश्नापेक्षांहि साहित्य आणि त्यामागील व्यक्ति-जीवन म्हणजे अनुभव हा प्रश्न साहित्यिकाच्या दृष्टीनें अधिक महत्त्वाचा आहे. कारण, श्रेष्ठ साहित्यिकास, जीवन हेंच साहित्याचें साहित्य वाटतें व साहित्य हेंच श्रेष्ठ साहित्यिकाचें जीवन असतें.

या दृष्टीनें साहित्यिकांस दिसणारा जीवनाचा व साहित्याचा अर्थ लोक जितक्या लवकर लक्षांत घेतील तितकें चांगलें ! द्रव्यार्जन-रतांच्या दृष्टीनें पाहिल्यास ज्याला केवळ मरायचें किंवा मारायचें समजतें असा योद्धा वेडा ठरेल, प्रसिद्धीच्या किंवा वैषयिक सुखाच्या मागें लागलेल्या स्त्रीच्या दृष्टीनें पाहिल्यास अपत्यसंगोपन किंवा एकनिष्ठ प्रेम करीत बसलेली स्त्री वायां गेली असें दिसेल; तसेंच, प्रत्यक्ष उलाढालींच्या किंवा धाडसांच्या मापानें मोजल्यास साहित्यिकाचें जीवन कर्तृत्वशून्य दिसेल. परंतु द्रव्यार्जन, विषयसुख किंवा कर्तृत्व या सर्वांचे अंतिम हेतु पाहण्यांत गुंतलेल्या साहित्यिकांसहि त्याग, धाडस व कर्तृत्व दाखवावींच लागतात. कोणतेंहि मोठें कार्य त्यागाशिवाय किंवा

कर्तृत्वाशिवाय होत नाहीं. आणि श्रेष्ठ वाङ्मय हें लहान कार्य आहे असें अज्ञ माणसाखेरीज कोणीच म्हणणार नाहीं. म्हणून 'केवळ साहित्य', 'निव्वळ साहित्यिक' हे शब्द अर्थशून्य होत. पैशांकरितां जगणारे ते धनिक, इंद्रियसुखाकरितां जगणारे ते वैषयिक, स्वजनरक्षणाकरितां जगणारे ते सैनिक; तसे जीवनाचा अर्थ पाहण्याकरितां व दाखविण्याकरितां जगणारे ते साहित्यिक, असेंच विचारी लोकांस दिसून येईल. 'साहित्यिकाच्या जीवनांत त्यागाला, शौर्याला किंवा कर्तृत्वाला जागा नाहीं' असें म्हणणें कल्पनाशक्तीचा अभाव दाखवितें. दुःखमय पर्यवसानाची शक्यता असूनहि श्रेष्ठ ध्येयाकरितां एखादा अनुभव पत्करणें हें केवळ विचारशून्यांच्या अगर वैषयिकांच्या धाडसाहून श्रेष्ठ धाडस आहे आणि अशा अनुभवांचा गूढार्थ जगाला दाखविण्याची कला म्हणजे श्रेष्ठतम कर्तृत्व होय. आणि या दृष्टीनें शौर्य व कर्तृत्व असल्याखेरीज श्रेष्ठ वाङ्मय निर्माण करतां येत नाहीं. 'वाङ्मय म्हणजे नुसते सुंदर शब्द' असें म्हणणें हें अज्ञान होय. सुंदर जीवनाखेरीज सुंदर शब्द आजवर कोणीहि लिहूं शकला नाहीं. श्री. हरिभाऊ आपट्यांचें जीवन त्यांच्या रम्य कल्पनासृष्टीसारखें होतें, लो. टिळकांचें जीवन त्यांच्या गीतारहस्यासारखें होतें, ज्ञानकोशकार केतकरांचें त्यांच्या ज्ञानकोशासारखें होतें, समर्थांचें जीवन त्यांच्या दासबोधासारखें होतें, ज्ञानेश्वरांचें जीवन ज्ञानेश्वरीसारखें होतें; फार काय, नीत्शे, ब्राउनिंग, कीट्स्, लॅम यांचींहि जीवनें दुःखमय असोत कीं सुखमय असोत, सुंदरच होतीं. उलट, ध्येयशून्य आणि नकली व्यक्तींचीं जीवनें, यशस्वी असोत कीं अयशस्वी असोत, अर्थशून्य आणि नकलीच असणार !

सारांश, अनेकविध सृष्टींतील श्रेष्ठ सौंदर्याची, श्रेष्ठ साहित्यिकांस जन्मतःच पारख असते व या सुंदर सत्यामागें लागून कष्टमय झालेलें जीवनहि सामान्य जीवनाहून नितान्त सुंदर असतें. कारण ध्येयनिष्ठा व सहृदयता म्हणजेच सौंदर्य; हीन सुखलालसा, निर्दयता आणि मौर्ख्य म्हणजेच कुरूपता !

साहित्य आणि जीवन यांविषयींची उच्च कल्पना येथें व्यक्त करण्याचा उद्देश येवढाच कीं, प्रस्तुत पुस्तकाचें, केवळ 'सुंदर शब्द' म्हणून स्वागत झाल्यास लेखकास गौरव वाटणार नाहीं. सुंदर जीवनाचें प्रतिबिंब आणि सुंदरतर जीवनाचें मार्गदर्शक होईल, तरच कोणतेंहि ललित-पुस्तक यशस्वी झालें असें प्रस्तुत लेखकाचें मत आहे.

या पुस्तकावर व त्याच्या कर्त्यांवर लोभ करणाऱ्या सर्वच व्यक्तींचा येथें निर्देश करणें कठीण आहे. तथापि अशा ऋणानुबंधी मंडळींपैकीं कांहींचा निर्देश करणें आवश्यक आहे. अशांतील पहिले म्हणजे महाराष्ट्राचे विख्यात पंडित व माझे सन्मान्य मित्र कै. माधवराव पटवर्धन हे होत. एखाद्या कार्याच्या प्रारंभकाळीं ज्यांनीं कौतुक केलें, किंबहुना ज्यांच्या प्रोत्साहनांत व प्रेमांतच त्या कार्याचा जन्म, त्या व्यक्ती त्याच्या परिसमाप्तीचे वेळीं कौतुक करावयास जवळ नसणें हा आयुष्यांतील एक उदासवाणा अनुभव होय. माझ्या या आवडत्या कार्याच्या नशीबीं हा योग यावा, ही दैवगति होय !

याखेरीज निर्देशनीय ऋणानुबंधी म्हणजे, माझे बौद्धिक जीवनांतील सहचर, ध्येयजीवनाचे साहाय्यक, भावनात्मक जीवनाचे सहृदयसाक्षी, सुखापेक्षांहि दुःखाच्या क्षणीं माझ्या ध्येयांची मला अधिक तत्परतेनें आठवण करून देणारे माझे स्नेही श्री. भय्यासाहेब उमराणी, श्री. गोपीनाथ तळवलकर व श्री. निरंतर हे होत. यांच्या सहकार्याखेरीज व प्रोत्साहनाखेरीज प्रस्तुत पुस्तक आज प्रसिद्ध होऊंच शकलें नसतें.

तसेंच, आपल्या तर्कसिद्ध दुःखवादाचें आणि विरक्तीचें 'घुंगट' मजवरील लोभाखातर क्षणभर बाजूला करून माझ्या या मोहवादी आणि ध्येयवादी गद्यकाव्याचें कौतुक करणारे इतिहास-पंडित प्रो. शेजवलकर यांचेहि मी कृतज्ञतेनें आभार मानतों.

त्याचप्रमाणें हें पुस्तक प्रकाशित करावयाचें ठरल्यावर तें वाचून त्याचें मनःपूर्वक स्वागत करणारे सुप्रसिद्ध लघुकथालेखक श्री. य. गो. जोशी

व प्रशंसापूर्वक प्रोत्साहन देणारे सुप्रसिद्ध नाटककार श्री. ना. वि. कुलकर्णी यांचेहि मी आभार मानतों.

ज्ञानकोशकार केतकर यांच्या पत्नी परमपूज्य तीर्थस्वरूप शीलवतीबाई केतकर यांनीं आपल्या अनंत अडचणी बाजूला सारून माझ्या या पुस्तकाला स्वतःच्या प्रस्तावनेच्या रूपानें प्रेमळ आशीर्वादाची जोड करून दिली, याबद्दल मी त्यांचा आजन्म ऋणी राहीन. माझ्या पुस्तकाला प्रस्तावनारूप आशीर्वाद देण्याचें त्यांनीं बरेच दिवसांपूर्वी वचन दिलें होतें. पुस्तकाची छपाई पुरी होण्याच्या सुमारास त्यांचें स्वतःचें आजारीपण व त्यांच्या कन्येचें आजारीपण यांसारख्या अडचणी उद्‌भूत न होत्या तर त्यांच्या पोक्त विचारांचा थोडा अधिक लाभ घडला असता. तथापि इतक्या अडचणींतून त्यांनीं इतकी संयत, सूचक व सुंदर प्रस्तावना धाडली याबद्दल त्यांचें कसें उतराई व्हावें हें मला कळत नाहीं. शीलवतीबाई यांनीं आपल्या गूढार्थगर्भ प्रस्तावनेंत अनेक खोल सामाजिक व मानसशास्त्रीय प्रश्न सूचित केले आहेत. त्यांतील एकाच सूचिताविषयीं मी येथें थोडें लिहितों. 'इतपत प्रौढ व इतक्या सुविद्य मुलीचें लग्न तिच्या संमतीशिवाय कसें होऊं शकतें?' या त्यांच्या शंकेचें उत्तर महाराष्ट्रांत घरोघर प्रत्यक्ष कृतीनेंच मिळत आहे. पण त्यापुढें जाऊन त्यांनीं उद्‌भूत केलेल्या शंका मला माझ्या सूक्ष्म मनोविश्लेषणविलासांतहि सुचल्या नव्हत्या. शीलवतीबाई म्हणतात,— "नायिकेनें जो त्याग दाखविला त्याची त्या बिचाऱ्या आईबापांस जाणीव तरी असेल कीं नाहीं याची शंकाच आहे." तसेंच, अशा मुलीला एवढा त्याग करण्याची अपरिहार्यता वाटावी याबद्दल सर्वांसच खेद वाटेल असेंहि त्या सूचित करतात.

या कादंबरीच्या नायिकेनें एवढा त्याग कां केला व तिच्या मातापितरांनीं हतबुद्धपणें तिला तो कां करावयास लावला याचें विवेचन प्रस्तुत भावकथेंत सूचकपणें भरपूर आढळेल; पण समाजांतील त्याग व त्याची जाणीव यासंबंधीं शीलवतीबाईनीं उपस्थित केलेला हा प्रश्न

कुतूहलजनक व खेदजनकहि आहे, असें आढळून येईल. त्यागाची हकीकत अशी आहे कीं, त्याची जाणीव त्याग करणाराला असेलच असें नाहीं व त्याचा फायदा भोगणाराला तर ती बहुधा नसेलच असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्याग, औदार्य, दया यांची जगांत वाण आहे ही मुख्य आपत्ति नव्हे; मुख्य करुणकथा ती वेगळीच आहे. जगांत आहे तीहि थोडीफार त्यागवृत्ति, औदार्यबुद्धिदेखील अस्थानीं खर्च होते ही खरी दुर्घटना—खरी ट्रॅजेडी होय! मुलीनें केलेल्या त्यागाची बापाला जाणीव नसेल आणि म्हणून त्या मुलीचें कौतुक व कींव करावी, तों त्याच मुलीकरितां आई-बापांनीं अगर अन्य कोणी प्रेमाच्या माणसांनीं केलेल्या त्यागाची तिला किंमत नसेल! व वेळ येतांच ती फिरून अस्थानींच त्याग करीत राहील! त्यागाची ही उद्वेगजनक कथा महाराष्ट्रांपुरती आहे कीं सर्व राष्ट्रांतहि आहे, स्त्रियांपुरती आहे कीं पुरुषांतहि आहे, हा प्रश्न अप्रस्तुत होय. व्यक्तिशः प्रस्तुत लेखक सुफी-वेदान्ती असल्यामुळें व दुःखमय घटनांतहि त्यास दैवी सौंदर्य आणि वत्सलताच प्रतीत होत असल्यामुळें त्यानें आपल्या या कल्पनाचित्राचें सौंदर्य वरील विपरीत वस्तुस्थितीच्या संसर्गानें दूषित केलें नाहीं. प्रस्तुत लेखक निवार्य दुःखांचें चित्रण करण्याइतपत पुरोगामी आहे; पण अनिवार्य दुःखांचें निवारण आर्थिक पुनर्घटनेनें होईल असें म्हणण्याइतपत अर्थभक्त मात्र नाहीं. तसाच तो अनिवार्य दुःखांचें उद्वेगकारक चित्र रेखाटणारा पाश्चात्य ट्रॅजीडियन्‌हि नव्हे!

या पुस्तकाची शेवटची प्रत तयार करण्यांत व मुद्रितें तपासण्यांत श्री. पी. जे. बोकील यांच्या कार्यक्षमतेचा व दक्षतेचा मला फारच उपयोग झाला. पुस्तकाची छपाई राजगुरु छापखान्याच्या चालकांनीं आपल्या नेहमींच्या आस्थेनें केल्यामुळें मुद्रण व सजावट राजगुरु प्रेसच्या लौकिकास साजेशी झाल्याचें वाचकांस आढळेल असा भरंवसा आहे.

माझ्या या पुस्तकाचीं सात प्रकरणें आठ-नऊ वर्षांपूर्वीं **'प्रगती'**तून प्रसिद्ध होत असतांच अनेकांस प्रिय झालीं होतीं व आज संपूर्ण

स्वरूपांत प्रसिद्ध होत असलेलें पुस्तकहि सर्वांस प्रिय होईल असा मला भरंवसा आहे. तथापि अनेक अडचणींनीं लांबणीवर पडलेल्या या आवडत्या कामाविषयींचा माझा स्वतःचाच उत्साह कालक्रीडिताच्या तडाख्यांत गारद होतो कीं काय, अशी मला अलीकडे भीति वाटूं लागली होती. तथापि वैयक्तिक सुखदुःखावर सर्वाधिकार गाजविणाऱ्या कालक्रीडिताचा, कर्तव्याच्या व ध्येयजीवनाच्या विशालतर आनंदापर्यंत हात पोंहोचूं नये हा साहित्यिकास येणारा त्यांतल्या त्यांत सुखद अनुभव म्हटला पाहिजे !

आणि ज्या भावना व जे विचार मला एकेकाळीं प्रिय व जिव्हाळ्याचे वाटले ते आजहि तसेच वाटले, तरीहि एखादा विचार प्रिय वाटणें वेगळें व तो प्रसिद्ध करण्याइतका उत्साह वाटणें वेगळें; अशा दृष्टीनें पाहतां माझें व माझ्या अनेक वाचकांचें हें आवडतें पुस्तक आज एका दृष्टीनें 'पोरकें' जन्मास येत आहे. दुःखांत सुख येवढेंच कीं, कर्तबगार प्रकाशक व सहृदय वाचक यांच्या हातींच तें आज पडत असल्यामुळें मला त्याच्या भवितव्याविषयीं फारशी चिंता नाहीं. या नवीन मातापितरांच्या हातीं माझें हें लाडकें अपत्य निश्चितपणें निरवून मी सर्वांचा निरोप घेतों.

ता. १९ जुलै १९४०
'तुकाराम-आश्रम'
टिळक वाडी, पुणें २.

श्रीकृष्ण केशव क्षीरसागर

खुलासाः—पहिल्या प्रकरणांत (पृ. ४) उल्लेखिलेले, प्रीतिविवाहाच्या दृश्यानेंहि व्यथित होणारे पुरुषव्याघ्र म्हणजे कै. माधवराव पटवर्धन हे होत. शेवटच्या प्रकरणांतील नीत्शेच्या खाजगी चरित्रांतील उल्लेखांचें रहस्य, त्याचें आत्मचरित्र व त्याच्या बहिणीनें लिहिलेलें चरित्र वाचल्यानें अधिक लक्षांत येईल.

मंगल आणि अमंगल अनुभवांच्या द्वारें

आपलें विराट् स्वरूप दाखविणाऱ्या जगच्चालकास

— आणि —

कोणत्याहि अनुभवांतून

आपलें ध्येय व प्रेय न बदलणाऱ्या

थोर पुरुषास

वंदनपूर्वक समर्पण

८ ऑगस्ट, १९४०.

अबलाजीवन ! हाय तुम्हारी यही कहाँनी ! ।
आँचलमें है दूध, और आँखोंमें पानी ! ॥

हे अबले ! तुझ्या जीवनाची हीच कहाणी !
स्तनभागीं दूध आणि डोळ्यांतून पाणी !

— हिंदी कविश्रेष्ठ मैथिलीशरण गुप्त

१

कित्येक विद्वानांचें असें मत आहे कीं, नाटक पाहण्याची म्हणून एक स्वतंत्र कला आहे आणि हें उघडच आहे. एखाद्या उत्कृष्ट नाटकांतून रसिकास जो रस चाखतां येईल तो गांवढळास कसा येईल? मला वाटतें ही गोष्ट सर्वच दृश्यांस लागू आहे एखादें दृश्य सर्वांना सारखाच आनंद देईल असें म्हणतां येणार नाहीं. मला कित्येक वर्षें सिनेमा पाहतां येत नसे. माझ्या शेजारीं बसलेल्या माझ्या मित्रास पडद्यावरील कथानक पूर्णपणें उमगावें, इतकेंच नव्हे तर पुढें काय होणार हेंहि सांगतां यावें आणि मला मात्र इथून तिथून सारा गोंधळ वाटावा! पण नाटकसिनेमा-सारख्या दृश्यांचें एक तरी बरें आहे. आवडत नाहींसें दिसतांच उठून येतां येतें. फार तर फिरून जायचेंच नाहीं म्हटल्यासहि कोणाचा जोरा नसतो. पण सर्वच दृश्यांच्या बाबतींत प्रेक्षकांना अशी सवलत असतेच असें नाहीं.

मला कळूं लागल्यापासून विवाहाचें दृश्य पाहण्याचें मला कधींच साधलेलें नाहीं. बरोबर सिनेमासारखीच त्रेधा उडते! हा कोण, ही कोण

ह्या कोण, हे कोण, कांहींच पत्ता लागत नाहीं. मागचें कथानक डोक्यांत नसतें; पुढच्याचा सुगावा नसतो. एकंदर सर्व मिळून अस्वाभाविक आणि चमत्कारिक वाटूं लागतें. वधूला काय वाटत असेल, वराची मनःस्थिति काय असेल, अशा विचारांत आपण उभें राहावें तों कित्येक निर्ढावलेले कर्कश भेसूर सूर "शुभमंगल सावधान!" म्हणून ओरडून बजावतात! त्यांच्या धंदेवाईक आरडाओरडीवरून मला तर हॅम्लेट्मधील 'The lady doth protest too much' या शब्दांची आठवण झाल्याखेरीज राहत नाहीं. जो विधि वास्तविक नितान्त मंगल आणि शुभ, त्याच्या शुभत्वाचा पुकारा इतका कां करावा लागतो, असा प्रश्न डोळ्यांपुढें येतो, तोंच माझी नजर वधूच्या मातापितरांच्या पाण्यानें भरलेल्या डोळ्यांकडे जाते! वराची व त्याच्या गणगोताची चर्याहि गंभीर आणि क्वचित् गांगरलेली दिसते. अशा वातावरणांत मोतीचुराचे ढेकर देणाऱ्या भटजीखेरीज शुभमंगलाची ग्वाही देण्याची उमेद दुसऱ्या कोणास येणार?

लग्नाच्या दृश्यांतील पात्रें जितकीं निकटसंबंधी तितका माझ्या मनाचा अधिकच गोंधळ उडतो. 'तो' कोण व 'ती' कोण हें माहीत असल्यामुळेंच 'हें' काय चाललें आहे हें कळेनासें होतें. पूर्वीच्या कथानकाचा चित्रपट डोळ्यांपुढें उभा राहतो व तो भावी कथानकाविषयीं विस्मय उत्पन्न करतो. माझ्या एकाहि मित्राच्या लग्नसमारंभाचे वेळीं मीं सुखासमाधानानें व स्वस्थचित्तानें पाहण्याच्या (enjoy) मनःस्थितींत होतों असें मला आठवत नाहीं. मला ती कला साधलीच नाहीं म्हणा ना! वधू आणि वर, निदान त्यांपैकीं कोणी तरी एक– जो मला अधिक जवळचा असेल तो– एका भयंकर दिव्यांतून पार पडत आहे अशी माझी कल्पना होते. त्याच व्यक्तींस मी पुनः चार लोकांप्रमाणें हिंडतां-फिरतांना पाहतों. इतकेंच काय पण पूर्वींहून ते अधिक सुखी झाल्याचींहि उदाहरणें कमी नाहींत. म्हणून काय

झालें? तो विवाक्षित समारंभ कमी विलक्षण ठरणार कसा? शस्त्रक्रियेमुळें रोग्यास पुढें आराम वाटेल म्हणून शस्त्रक्रिया सुखावह असें कोण म्हणेल? शिवाय शस्त्रक्रियेची पाळी यावी यावरूनहि कोठें तरी बिघाड झालेला असतो हेंच सिद्ध होतें; पण यांत एक आहे. लग्नविधि शस्त्रक्रियेइतका भीषण वाटेल, तरच त्याच्या बुडाशीं असलेल्या रोगाची चर्चा करावीशी वाटेल आणि मला तर तो तसा वाटे आणि अद्याप वाटतो!

छे! माझ्या मनाचा विचित्रपणा हेंच या सर्व भ्रमाचें कारण. जेथें लतापल्लवांनीं सुशोभित मांडव घातलेला, जेथें सनया सुस्वर आलाप काढीत आहेत, जेथें महावस्त्रांनीं विभूषित आणि सोन्या-मोत्यांनीं मढविलेल्या सुवासिनी सौभाग्यद्रव्यें घेऊन उभ्या आहेत, जेथील वायूहि पुष्पहारांच्या कोमल सुवासानें व वेदवाणीच्या आलापांनीं भरून गेला आहे, अशा मंगलायतनांत ज्याचें मन उद्विग्न होतें, त्यानें इतरत्र काय बिघडलें आहे हें पाहण्यापूर्वीं आपल्या मनांत काय बिघाड आहे तें पाहावें हेंच उचित. येथें आलेला प्रत्येक मनुष्य मंगल विचारांनीं भरून गेला आहे. येथें उभीं असलेलीं वधूवरें चिरसौख्याच्या देहलीवर उभीं आहेत. बालकांचा हर्ष, संसारी जनांचें समाधान, स्त्रियांची हौस, विप्रांचे आशीर्वाद, सर्व एकत्र पाहून नेत्रांचें पारणें जर कोठें फिटत असेल तर लग्नमंडपांत आणि म्हणूनच मला माझ्या मनःस्थितीचें कारण शोधण्याची जबरदस्त आकांक्षा लागून राहिली. या सर्व आनंदलहरींच्या बुडाशीं कोणत्या भीषणतेचा व पाशवीपणाचा नक्र दडून आहे, कीं ज्यामुळें या मंगलकार्यावर मला काळी छाया पसरल्याप्रमाणें वाटावें?

पुढें माझें मीच कांहीं तरी कारण ठरवून समाधान करून घेऊं लागलों. माझ्या ज्या मित्रांचे विवाह झाले त्या सर्वांसच कोणत्या ना कोणत्या कारणानें मनाविरुद्ध विवाह करावे लागले होते. त्यांचे

विचार, त्यांच्या उड्या मला माझ्या स्वतःच्या आकांक्षांप्रमाणें वाटण्याइतके ते माझ्या जवळचे होते व हेंच माझ्या अस्वास्थ्याचें कारण असें मीं ठरविलें. बऱ्याच दिवसांत कोणाहि निकटस्थाच्या विवाहाचे वेळीं मी हजर नसल्यास याहि परिस्थितीचा विसर पडे आणि मीं कधीं विचार केलाच तर लग्नविधींतील हें शल्य सार्वत्रिक नाहीं, असें वाटून मनाचें थोडें समाधानहि होई. कित्येकदां प्रीतिविवाहाचे समारंभ सर्वस्वी आनंदाचे असतील असेंहि वाटे.

अशा संदेहस्थितींत मला एक अस्सल प्रीतिविवाह पाहण्याची संधि आली. या समारंभांतील वधूवर दोघेंहि माझ्या फार निकटचे नसले तरी बऱ्याच परिचयाचे होते. उभयतांचें एकमेकांवरील प्रेम व त्या प्रेमास गुरुजनांची अनुमति यामुळें तर दुधांत साखर पडल्याप्रमाणें झालें होतें. समारंभास हजर असलेली मंडळीहि सुसंस्कृत व उल्हासी होती. माझी नेहमींची व्यथित मनोवृत्ति या वेळीं पूर्ण निवळली होती. एका दृष्टीनें मी हा एक आदर्शभूत विवाहसमारंभ प्रथमच पाहत आहे असें माझ्या चिकित्सक मनाला वाटत होतें. इतर समारंभांत बेफिकीर-पणें अक्षता फेकणाऱ्या स्त्रीपुरुषांना मी उथळ भोजनप्रिय समजत असे; पण या समारंभांत मी त्यांच्याहूनहि बालिश वृत्तीनें हसत-खेळत अक्षता हातांत घेऊन उभा होतों. शुभमंगलाची पहिली गर्जना झाली मात्र आणि माझी दृष्टि अंतर्पाटाशेजारीं उभ्या असलेल्या वधूच्या एका जवळच्या नातेवाइकाकडे गेली. ज्यानें शस्त्रक्रियाहि हसत केली असती व करून घेतली असती अशा त्या पुरुषव्याघ्राची चर्या इतकी अस-हाय झाली होती, कीं फिरून मला माझेंच बरोबर असें वाटूं लागलें! सर्व मंगलवाद्यांच्या आड मला फिरून कांहीं तरी कर्कश आणि भेसूर असें ऐकूं येऊं लागलें. किंबहुना हीं वाद्यें, हीं पक्वान्नें, हे अलंकार, कांहीं तरी अपरिहार्य परंतु असह्य क्रौर्य झाकण्याकरतांच आहेत असें

वाटूं लागलें. प्रीतिविवाह म्हटला तरीहि भीषणता कमी नाहींच हें पाहून मला फिरून माझ्या प्रश्नानें अस्वस्थ केलें.

कोणतीहि गोष्ट गोड कीं कडू हें दुरून काय सांगतां येणार? नित्य शेंकडों मृत्यु घडत आहेत म्हणून आपण कोठें उदास होतों? पण तोच आपल्या प्रिय व्यक्तीचा मृत्यु म्हटला कीं— केवळ कल्पनाहि आपणास उदास करून सोडते. कोणत्याहि मोठ्या घटनेचें असेंच आहे. जन्म, मृत्यु, विवाह, यांसारख्या महा-स्थित्यंतरांचें खरें स्वरूप दुरून ध्यानांत येणें अशक्य आहे. पुणें शहरांत गेल्या आठवड्यांत दोनशें मुलें जन्माला आलीं असें वाचून मनांत कांहींच विकार उद्‌भूत होणार नाहींत; परंतु— पांचशें मैलांवर असलेल्या प्रिय मित्रास पुत्र झाला ही बातमी ऐकून मनांत दोन दिवस आनंदोर्मि येत राहतील. केवळ एका व्यक्तीच्या मृत्यूची वार्ता ऐकतांच वेड लागल्याची अथवा जगाला विटल्याचीं उदाहरणें कमी नाहींत. तीच गोष्ट विवाहाची. शेंकडों विवाह पाहणें म्हणजे लाडूपोळ्या पाहण्याहून फारसें अधिक नाहीं. पण जिवलग व्यक्तीचा विवाह पाहणें म्हणजे विवाहाचें खरें स्वरूप पाहणें होय! मीं आतांपर्यंत कित्येक निकटस्थ व्यक्तींचे विवाह पाहिले होते व त्यामुळेंच विवाहाच्या मांगल्यामागें कांहीं तरी भीषण सत्य लपलें आहे, असें कळण्याइतका मी त्यांच्या नजीक पोंहोचलों होतों. तरी त्याचें खरें भीषणत्व दिसण्याइतक्या जवळच्या व्यक्तीचा विवाह निदान माझ्या जाणतेपणीं तरी पाहिला नसल्यामुळें माझें कोडें तसेंच राहिलें. आम्ही सर्वजण मुद्दाम हजर राहून पाहतों, तीं विवाह-नाटकें शोकाचीं कीं आनंदाचीं?

अखेर सुदैवानें वा दुर्दैवानें अशा एका विवाहप्रसंगाला मला हजर राहावें लागलें, कीं ज्यांत विवाह-नाटकांतील प्रधान रसांचा मला पूर्ण आस्वाद घ्यावा लागला. मला लग्नांत कांहीं तरी भीषण कां वाटे, याचें कोडें उलगडण्याच्या मार्गास मी लागलों. सारांश, विवाहविधीचें

खरें स्वरूप समजलें. एक भीषण सत्य जवळून पाहण्यास द्यावी लागणारी किंमत अर्थातच मला द्यावी लागली. ती किंमत मी अश्रूंच्या रूपानें दिली. पण सत्यदर्शनाच्या मानानें ती किंमत भारी होती असें मी तरी मानीत नाहीं.

विवाह म्हणजे काय? विवाहाचा विधि मंगल कीं अमंगल? कन्या म्हणजे कोण? तिचें दान म्हणजे काय? कन्येचा पिता तें दान पुण्याच्या आशेनें करतो कीं समाजाच्या भीतीनें करतो? कीं एक अपरिहार्य अशुभकार्य म्हणून उरकून टाकतो? जाणत्या मुलीला विवाहविधि कसा वाटतो? वराला, वराच्या आप्तेष्टांना कन्याहरण कसें काय मानवतें? पहिले आप्त सोडून क्षणांत नवे स्वीकारण्याचें सामर्थ्य अज्ञ वधूच्या अंगीं कोणत्या मंत्रांनीं येतें? दागिने, हुंडा, करणी वगैरे प्रकार धर्मविधींत मोडतात कीं, उभयपक्षांचें अलोट सख्य दाखवितात? मुलगी पाहणें म्हणजे काय? व दाखविणें म्हणजे काय? या सर्व नेहमींच्याच परंतु—किंबहुना नेहमींच्या म्हणूनच —अगम्य होऊन राहिलेल्या प्रकारांचें खरें वर्म दर हंगामास शें-दोनशें प्रयोजनें झोडून ध्यानांत कसें येणार? जें पाहतांना डोळे भरून येतील असें एकच लग्न, लग्नविधि हा कसला विधि आहे हें स्पष्ट करून देईल.

या सर्व प्रश्नांचीं उत्तरें अथवा विवाहविधीचें वास्तविक स्वरूप अखेर मला माझ्या यमूच्या लग्नांत कळावयाचें होतें?

२

मी माझी यमू म्हटलें खरें, पण माझी म्हणणें जितकें सोपें तितकेंच ती "माझी कोण?" हें सांगणें कठीण आहे. कारण ती माझें सर्व कांहीं होती. ती माझी बहीण होती; मैत्रीण होती; शिष्यीण होती; इतकेंच काय पण ती माझी गुरु देखील होती! ती माझी कोण होती हें ती 'माझी' नव्हेशी होईपर्यंत माझें मलाहि पुरतें ठाऊक नव्हतें; पण ज्या दिवशीं ती माझी नव्हेशी झाली त्या दिवशीं माझी इतकीं बहुविध नातीं एकदम तुटल्यासारखें झालें. लौकिक नातेंच सांगायचें झाल्यास ती माझी लांबलांबची मामे कीं आते-बहीण होती. परंतु या लौकिक नात्यास आमच्या प्रेमनिर्मित अलौकिक नात्यांनीं कधींच मागें टाकलें होतें.

तिचीं माझ्याशीं असणारीं विविध नातीं विरोधी असूनहि परस्पर-पोषक झालीं होतीं. तिला बहीण म्हणावी तर ती प्रत्यक्ष भावाशींहि माझ्याइतक्या मोकळेपणानें वागत होती कीं नाहीं याची शंकाच आहे. केवळ मैत्रीण म्हणावी तर नात्याच्या अभावीं राहणारा परकेपणा तिच्या-माझ्यांत मुळींच आढळला नसता. विद्येनें व वयानें तिजहून

अधिक असल्यामुळें मी तिला शिकवीतहि असे. पण एवढ्यावरून तिला माझी शिष्या म्हणावें तर ती शिकतांनाहि माझ्याशीं इतक्या सलगीनें वागे कीं शिष्य कोण आणि गुरु कोण याची आमची आम्हांलाच भ्रांत पडे! मी तिला सांप्रत कांहीं बाबतींत गुरुस्थानीं मानतों ही गोष्टहि सत्य आहे. पण आमच्या परिचयाच्या आरंभीं जर कोणी तसें भाकीत केलें असतें तर मी त्यास वेड्यांत काढलें असतें; पण या सर्व विलक्षण नात्यांचा उगम आणि पर्यवसान एकाच गोष्टींत होतें; आणि ती म्हणजे यमू माझी होती आणि मी तिचा होतों.

आम्ही एवढे जीवश्च कंठश्च केव्हां झालों व कसें झालों हें आतां मला पुरतें आठवतहि नाहीं. पण आठवत नाहीं म्हणून या गोष्टीस फार दिवस झाले असें मात्र नव्हे. यमूचा आणि माझा दाट परिचय फार-फार तर गेल्या अडीच-तीन वर्षांतील. त्यापूर्वी तिचें माझें नातेंच असल्यामुळें आम्ही एकमेकांस ठाऊक होतों, यापेक्षां आमचा कांहींच संबंध नव्हता. मी तर तिला एक फाजील लाडावलेली मुलगी समजत असे. पण तिच्या लहानपणच्या स्वभावांत आणि माझ्या तिजविषयींच्या मतांत केव्हां फरक झाला कोण जाणे. तथापि दोन्ही गोष्टी साधारण एकदमच म्हणजे सुमारें अडीच वर्षांपूर्वी घडल्या असाव्या असें मला आज आठवतें. त्या वेळीं यमू इंग्रजी सातव्या इयत्तेंत गेली होती आणि मी कॉलेज कोर्समधून नुकताच मुक्त झालों होतों. या दृष्टीनें पाहिलें तरी आमच्यांत समानशीलत्व थोडेंच होतें? मी परीक्षांच्या तडाक्यांतून बाहेर पडल्यामुळें परीक्षा तुच्छ लेखीत होतों, तर तिच्या डोळ्यांपुढें पहिल्याच भयंकर परीक्षेचें भूत दिसत होतें. मी कॉलेजमधील स्नेही, परीक्षा, प्रोफेसर वगैरेस अतिपरिचयामुळें जवळ जवळ विटून गेलों होतों, तर तिला लकडी-पुलापलीकडील कॉलेजी जग म्हणजे जणूं स्वर्ग वाटे! कदाचित् या असमानशीलत्वामुळें आमची मैत्री

अधिक जमली असेल. शिवाय यमूच्या घरीं तिच्या बरोबरीचें असें कोणीच नव्हतें. त्यामुळें दररोज घडणाऱ्या कित्येक 'महत्त्वाच्या' गोष्टी 'जीर्णमङ्गे सुभाषितम्' यांत म्हटल्याप्रमाणें तिला मनांतल्या मनांत पचवून टाकाव्या लागत. आणि म्हणूनच माझा परिचय होतांच तिच्या सुखदुःखांस एकदम तोंड फुटल्याप्रमाणें झालें.

"आमचें बोलणें तीन-तीन तास चाले! इतर विषयांबरोबर त्यांत परस्परांची चर्चाहि होई. यमू कित्येकदां माझ्या स्वभाव-विशेषांचें इतकें बिनतोड वर्णन करी, कीं मला तिच्या समोर येणेंच धोक्याचें वाटावें! मीहि तिचें वर्णन तिला ऐकवीत असे. पण तोंडावर म्हणूनच कीं काय कोण जाणे, मला तें बहुधा औपरोधिक स्वरूपांत करावें लागे. तिला त्यांतील एक अक्षरहि मान्य नसल्याचें ती दाखवीत असे. तरी इतर विषयांहून स्वतःचें वर्णन तिची अधिक करमणूक करी. मोकळेपणाच्या बाबतींतहि तिनें मला थोड्याच दिवसांत चकित करून सोडलें. ती मजजवळ वाटेल त्या विषयावर बोले; आणि मला वाटतें तिला मला चकित करण्यांत एक प्रकारचा अभिमान वाटत असावा. एरव्हीं तिच्या बोलण्यांतील कित्येक विषय निघण्याचें कारण दाखवितां येणार नाहीं. यमूइतकी धीट मुलगी मीं पूर्वी पाहिली नव्हती हें तर खरेंच; पण हें मला पटवून देण्यांत यमूला कांहींसें भूषण वाटे! मी मात्र यमूजवळ कांहीं ठराविक विषयांवरच बोले. पण याचें तिला वैषम्य वाटूनच कीं काय कोण जाणे ती हव्या त्या विषयावर प्रश्न विचारून माझ्या मुग्धतेवर हल्ला चढवी. तिचे प्रश्न कित्येकदां भेदक वाटत, तर कित्येकदां पोरकट वाटत! "माझ्याकडे येण्यापूर्वी तुम्ही कोणाकडे गेलां होतां? काल तुमच्या हातांत पत्र होतें तें कुणाचें? परवां तुमच्याबरोबर कोण गृहस्थ होते? तुम्ही आपल्या मित्रांशीं कोणत्या विषयांवर बोलतां?" अशा प्रश्नांनीं ती मला बेजार करून सोडी व मीं टाळाटाळीचीं उत्तरें दिलीं,

कीं तिला अधिकच चेव येई! कित्येकदां मला तिचा रागहि येई. मला वाटे, काल ही पोर परकर नेसत असे आणि आज मारे काय आव आणते आहे प्रौढपणाचा! तिच्याशीं वागावें कसें याचेंच मला कित्येकदां कोडें पडे. तिची वाढती स्त्री-बुद्धि कित्येकदां इतका पल्ला गाठी, कीं मला वाटे मीच इच्यापुढें अजाण! तर कित्येकदां ती इतका पोरकटपणा करी, कीं "हीच का ती नेहमींची यमू?" असा प्रश्न उभा राही. तिचें तिलाहि या बाबतींत ठाम धोरण असें नव्हतें. कधीं तिला मोठी समजल्याबद्दल राग येई आणि ती म्हणे "मला तुम्ही समजतां तरी कोण? किती केलें तरी मी लहान आहे अद्याप!" उलट एखादे वेळीं तिजपासून एखादी गोष्ट लपवून ठेवूं लागल्यास, "तुम्ही मला कुकूबाळ का समजतां? मला सर्व गोष्टी समजतात!" असें म्हणून ती भेदकपणें हसे!

पण या सर्व धिटाईच्या व चतुराईच्या गोष्टी ती एका मुद्द्याशीं आली कीं विसरे; आणि तो मुद्दा म्हणजे तिचें लग्न. ती लग्नाविषयीं सामान्यतः म्हणजे इतरांच्या लग्नाविषयीं व स्वतःच्याहि विवाह-विषयक आकांक्षांविषयीं अगदीं मोकळेपणानें व धिटाईनें बोले. माझ्या लग्नाचा विषय काढणें हें तर तिच्या ठराविक अस्त्रांपैकीं एक अस्त्र होतें. पण ज्या वेळीं तिच्या लग्नाविषयीं प्रत्यक्ष कांहीं खटपट चाले त्या वेळीं मात्र ती अगदीं मुग्ध असे, व आपलें सर्व चातुर्य आणि धैर्य मनांतील खळबळ लपविण्यांत खर्च करी. यामुळें आमच्या मनमोकळेपणांत एक मोठेंच वैगुण्य राहिलें होतें असें मला अखेर आढळून आलें. या बाबतींत ती माझ्याशीं बोलत नाहीं अशी माझी समजूत असती तरी एकपरी चाललें असतें; परंतु तिच्या उल्हसित वृत्तीवरून ती एखादी महत्त्वाची गोष्ट माझ्यापासून लपवीत असेल अशी मला शंकाहि आली नाहीं. पण अखेर ही प्रतारणा तिची तिलाच असह्य वाटली म्हणून असो, कीं अन्य कारणामुळें असो ती

अस्पष्टपणें आपली अंतःस्थिति ध्वनित करूं लागली. पण मला प्रथम तें खरेंच वाटेना. इतक्या धीट आणि मनमोकळ्या मुलीला कशाची काळजी असणार! अशीच कांहीं अंशीं माझी समजूत होती. पैसेवाले आणि हौशी आईबाप; पुण्यासारख्या शहरांत वस्ती; इंग्रजी शिक्षणामुळें लहानपणच्या लाडांस प्रौढपणच्या स्वातंत्र्याची मिळालेली जोड; या सर्वांमुळें या मुलीइतकी भाग्यवान् कुणीच नाहीं अशी माझी कल्पना होती. मुलींचें भावी सौख्य सर्वस्वी लग्नावर अवलंबून असतें याची मला जाणीव नव्हती असें नाहीं; तथापि त्याहि बाबतींत ही सुखीच होणार हें मी धरून चाललों होतों. पण तिला कशाचीच काळजी नसेल असें समजण्याला आणखी एक कारण होतें. आणि तें म्हणजे लग्न ही गोष्ट कितीहि गंभीर स्वरूपाची असली तरी तिला अवकाश आहे अशी माझी समजूत होती. आणि या समजुतीला तरी काय आधार? यमूचें बेफिकीर आणि आनंदी वर्तन हाच!

या आनंदी जीवनक्रमाची दुसरी बाजू दाखविण्याचा यमूनें ज्या वेळीं पहिला प्रयत्न केला त्या वेळीं तर मी तें थट्टेवारीच नेलें. "यमूचें–आणि लग्न?" –अशा प्रकारचीच कांहीं अंशीं माझी वृत्ति होती. तथापि यमूलाहि लग्नाची बेडी आहेच आणि यमूच्या सर्वदा आनंदी मुखालाहि तो चिंतातुर करीत आहे हें पाहिल्यानंतर मला प्रथमच त्या बेडीच्या जडपणाची कल्पना आली. यमूचेंहि लग्न इतर चार लग्नांप्रमाणेंच होणार काय? कोणी तरी तिस्मारखान येणार, यमू त्याच्यापुढें गुढग्यांत मान घालून बसणार. तो हुंड्याची रक्कम सांगणार, पसंत-नापसंत दोन अक्षरांत पत्रानें अगर तारेनें कळविणार आणि त्यानें नापसंत म्हटल्यास यमू–ही यमू–नापसंत ठरणार! छेः! मला या गोष्टी खऱ्याच वाटेनात. यमू नापसंत! यमू हें घर सोडणार, यमू नांव आणि आडनांव बदलणार? ही हुशारी, हा प्रेमळपणा, हा चाणाक्षपणा गुंडाळून ठेवून यमू एका अनोळखी आचरटाची लहर

संभाळणार? तिच्या आईची इच्छा तिनें याच गोष्टी कराव्या अशी आहे काय? इतक्या चतुर व सुंदर मुलीलाहि कुठल्या तरी अनोळखी माणसाच्या नशिबाला नशीब बांधण्याशिवाय कांहींच मार्ग नाहीं काय? आणि असें असेल तर ही आहे इतपत तरी आनंदी कशी? हिची आई हिच्यावर जीव कीं प्राण करते तें अखेर अशी उजवून टाकण्याकरितांच कीं काय? छे! हा विचार हिच्या आईबापांस आजच कां उदास करून टाकीत नाहीं? पण यमूचा चेहरा फिरून आनंदी दिसला कीं मला हा सर्व भ्रम वाटे. बाकीच्या सामान्य मुली हव्या तशा दिल्या-घेतल्या जात असतील. यमूच्या बाबतींत तरी असला बाजारी सौदा अशक्य आहे असें मला वाटे. तरी फिरून एखादे वेळीं मला तिला या बाबतींत खोदून विचारण्याची लहर येई. पण मी काय विचारणार? तिच्या लग्नाचा विचार चाललेला असणार हें उघडच होतें. तीहि तें कबूल करी. इतर विषयांप्रमाणें या विषयांत भडाभड बोलत नसली तरी इतपत ती मला सांगत असे. पण एवढयानें माझें समाधान होत नसे. माझ्या मनांतील– अगदीं आंतील खरा म्हणजे— "यमू! तुझेंहि चार मुलींप्रमाणें लग्न होणार?" पण हा प्रश्न मी विचारूंहि शकत नसे आणि याचें उत्तर ती देऊंहि शकली नसती. माझ्याप्रमाणेंच तिलाहि या बाबतींत वाटत असेल काय? कीं ती अशाच लग्नाला तयार अथवा उत्सुक होती? मला वाटतें, ती उत्सुक नसावी. मला वाटतें, तिलाहि हें लग्न–हें उचलून देणें थोडें कसेंसेंच वाटत असावें. आणि म्हणूनच इतर विषयांत शब्दशूर असलेली यमू या विषयावर येतांच काळवंडून जाई.

तिनें कितीहि प्रयत्न केला तरी मधून मधून मला वस्तुस्थितीची कुणकुण लागल्याशिवाय राहत नसे. कधीं कुठच्या दूरच्या नातेवाइकांचें पत्रच येऊन थडके, तर कधीं गांवांतील एखादा स्नेहीसोबती यमूच्या वडिलांकडे एखाद्या स्थळाची वार्ता पोंहोचवी. अशा वेळीं यमूच्या

चर्येवरून मला कांही तरी सुगावा लागल्याशिवाय राहत नसे. पण याहून अधिक माहिती मला कळतहि नसे व कळवून घेण्याची मला फारशी उत्सुकताहि नसे. या बाबतींत मीं अगदींच औदासीन्य दाखविलें म्हणजे तिचें तिलाच कसेंसें होई. तिला वाटे या बाबतींत आपण बोलत नाहीं ही गोष्ट यांच्या मनाला लागत तर नाहीं? म्हणून ती सांगण्याचा यत्न करी आणि मगची तिची फजिती काय विचारावी! तिला या प्रकाराविषयीं धड आदरानें बोलतां येत नसे, कीं धड अनादरानेंहि बोलतां येत नसे. बिचारीच्या मनांत सांगायचें असूनहि तिची बोबडी वळे! आणि तिच्या मानी स्वभावाला ही स्थिति केवळ असह्य वाटे आणि फिरून त्या बाबतींत न बोलण्याचाच ती निश्चय करी. सांगून सांगून ती काय सांगणार? शनवारांत एक वाडा आहे–मुलाचे वडील कॉन्ट्रॅक्टर आहेत—मुलगा कोणत्याशा कॉलेजांत आहे आणि इंग्लंडला कीं कुठेंसा जाणार आहे—! परवां एक पाहिला त्याहून याच्या घरीं एक दहावीस हजार जास्तच असतील.—अशा गोष्टी लग्न जुळविणाऱ्या म्हाताऱ्या-कोताऱ्यांत कितीहि प्रिय असल्या तरी कोणी तरी एक पैसेवाला आणि त्याच्याकडे मी हें घर सोडून जाणार आणि जातांना मला त्यांची कांहींच माहिती नसणार ही परिस्थिति यमू कोणत्या तोंडानें खुलवून सांगणार? कधीं कधीं अशा गांवोगांवच्या नवऱ्यांच्या परीक्षा अथवा स्कॉलरशिपा सांगण्यांत मात्र तिला थोडासा उल्हास वाटे. तरी आज ज्याची विद्या वर्णावी तो उद्यां ठरेल कीं नाहीं याची भ्रांतच! एकंदरींत तिच्यासारख्या बोलक्या मुलीलादेखील या विषयावर कांहींच सांगतां येत नसे. मींहि अखेर तिला माफ करावयाचेंच ठरविलें. तरी पण अशा विषयांत उभयपक्षीं मुग्धता धरल्यामुळें बाकीच्या सर्वच बोलण्यावर एक प्रकारच्या कृत्रिमतेची छटा पसरूं लागली. आजपर्यंतची यमूची धिटाई मला व्यर्थ वाटूं लागली. आणि यापुढें एखादे वेळीं ती जरा ऐटीनें बोलूं लागल्यास मला तिचें

कौतुक वाटण्याऐवजीं कींवच येऊं लागली. मला वाटे या वल्गनांना, या चातुर्याला, या आवडीनिवडींना आणि या तीव्र चिकित्सक बुद्धीला काय किंमत आहे? जिला या दावणीची सोडून दुसऱ्या दावणीस नेऊन बांधावयाची तिनें मोठमोठ्या प्रश्नांवर आणि व्यक्तीं-वर मतें झोडण्याचा आव कशाला आणावा? तिच्या बौद्धिक स्वातंत्र्याविषयीं मला आजवर वाटणाऱ्या आदराचें पर्यवसान अनु-कंपेंत होऊं लागलें. मी आजवर तिला मोठमोठ्या पुस्तकांची व व्यक्तींची माहिती मोठ्या उत्साहानें सांगत असे. मला वाटे हिनें इतर मुलींप्रमाणें अर्धवट शिकून राहूं नये. सभोंवारच्या कूपमंडूक वृत्तीच्या स्त्री-पुरुषांप्रमाणें विद्येच्या अर्ध्या हळकुंडानें पिवळें होऊं नये. प्रत्येक महत्त्वाच्या विषयावर विचार करण्यास शिकावें. ठराविक नाटकें, ठराविक कादंबऱ्या आणि ठराविक मासिकें घेऊन नाचणाऱ्या आणि त्यांवर आपल्या प्रोफेसरांचीं मतें उसनीं घेऊन मिरविणाऱ्या 'विदुषीं'-हून यमूंत अधिक पात्रता खास होती. पण फिरून माझा मलाच प्रश्न पडे— पात्रता— स्त्रियांची पात्रता म्हणजे काय? जी वस्तु उचलून दतां येते तिची बुद्धि ती कसली आणि त्या बुद्धीची वाढ ती कसली? बरें, अशा परस्वाधीन जीवाच्या बुद्धीची आणि पर्यायानें अहंकाराची व व्यक्तित्वाची वाढ करून त्या जीवास सुख लागणार कीं दुःख?...

अशा प्रकारच्या विचारांनीं कित्येकदां ऐन रंगांत आलेला माझा बोलण्याचा ओघ थांबे आणि फिरून यमूला कसेंसेंच होई. अशा वेळीं मी यमूकडे कांहीं चत्मकारिक दृष्टीनें पाही आणि तीहि "माझ्याकडे काय दोष?" असें म्हणाऱ्या गरीब गाईच्या दृष्टीनें मजकडे पाही. अशा वेळीं मला वाटे, आपल्या सौंदर्यानें सर्वांस मोहित करणारी, आपल्या चातुर्यानें चकित करणारी आणि आपल्या चपलबुद्धिवैभवानें कित्येकदां मलाहि हात टेकावयास लावणारी यमू अशी केविलवाणी कां दिसावी?

३

यमूची स्वतंत्रप्रवृत्ति आणि असहाय स्थिति यांचा मेळ कसा घालावा हें मला समजेना. पण या बाबतींत फारसा विचार करावयाचा नाहीं असेंच अखेर मला ठरवावें लागलें. कारण या विरोधी स्थितींत स्वतः यमू आपली वृत्ति ढळूं देत नसतां, मीं मात्र डोकें पिकवून घ्यावें याची मला एक प्रकारची लाज वाटूं लागली. कधीं कधीं मला वाटे कीं यमू माझ्याहून अधिक धीराची म्हणूनच अशा परिस्थितींत आपलें गांभीर्य टिकवूं शकते; तर कधीं कधीं वाटे कीं भोंवतालच्या शेकडों मुलींची व पूर्वींच्या अनेक पिढयांची गत पाहून तिच्या भावना एकपरी बोथटल्या असाव्या. पण जें टाळतां येत नाहीं तें सोसलेंच पाहिजे या नियमानुसार मीं तिच्या भावी स्थितीचा खेद करण्यापेक्षां वर्तमानस्थितीचाच अधिक उपयोग करून घेण्याचें ठरविलें. यमू एका प्रवाहाच्या– गढूळ प्रवाहाच्या– कांठीं उभी होती हें मला दिसतच होतें; तरी त्यांत वाहून न जातां त्यांतूनहि डोकें वर काढण्याइतपत सामर्थ्य तिच्या अंगीं आणणें हें मला माझें कर्तव्य वाटत होतें. आणि हें सामर्थ्य माझे आवडते फ्रेंच व रशियन

ग्रंथकार तिला देतील अशी माझी श्रद्धा होती. निदान दुसरें कोणतेंच साधन मला तूर्त दिसत नव्हतें. आणि म्हणूनच बौद्धिक विकासासाठीं माझा पहिल्याहूनहि अधिक जोराचा यत्न सुरू झाला.

नैसर्गिक अभिरुचीमुळें असो, कीं माझी निराशा करावयाची नाहीं या सात्त्विक संकल्पामुळें असो, यमू या अस्थिर अवस्थेंत पहिल्याहूनहि चिकाटीनें अध्ययन करूं लागली. परीक्षा तिच्या डोळ्यांसमोर होतीच; तथापि पहिलीच परीक्षा शेवटची ठरण्याचा रंग असल्यामुळें तिचेंहि महत्त्व कमी झालें होतें. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमापेक्षां आम्हीं आपल्याशीं ठरविलेल्या अभ्यासक्रमाकडेच अधिक लक्ष पुरवीत होतों. ज्या जगद्विख्यात ग्रंथकारांचे विचार मी तिला समजावून देत असे, तें कित्येक पदवीधरांसहि थोडे जड वाटले असते. परंतु भाषेची अडचण माझ्या मदतीनें दूर होतांच यमू त्यांच्या उच्च विचारांत किती लीलया अवगाहन करी याचें मला अद्याप आश्चर्य वाटतें. कदाचित् कालिदासानें वर्णिलेलें "स्त्रीणामशिक्षितपटुत्वम्" अशा बाबतींत सामान्य परीक्षा-बहाद्दुरांच्या पुस्तकी-विद्येहून अधिक कुशाग्र ठरत असेल! कांहींहि असो, ज्या विचारांना सामान्यतः गहन व क्रांतिकारक समजण्यांत येतें, असे विचार यमूला अगदींच साहजिक वाटत. पण यमू जसजशी बौद्धिक स्वातंत्र्याचीं अधिकाधिक चिन्हें दाखवी तसतशी तिच्या भावी स्थितीविषयीं मला अधिकच चिंता वाटे!

आमचा हा कार्यक्रम असाच अव्याहत चालणें शक्य नसूनहि तो तसा चालावा असें मात्र आम्हांस वाटे! आणि या बौद्धिक सहजीवनांत खंड पडणार अशी अंधुक कल्पना येतांच तो कार्यक्रम एक प्रकारच्या निर्वाणीच्या वीरश्रीनें चालू होई. या आकस्मिक खंडाची शक्यता उभयतांच्याहि डोळ्यांपुढें असून आम्हांस त्यासंबंधीं बोलण्याचें मात्र धारिष्ट होत नसे. पण दृष्टिआड केलें म्हणून अदृष्ट थोडेंच टळणार? आमचा अप्रिय विषय आम्हांस फार दिवस टाळतां येईलसें

दिसेना. आमचे प्रिय विषय थोड्याच दिवसांत बंद पडणार हेंहि तितकेंच उघड होतें.

नित्याप्रमाणें एके दिवशीं मी यमूकडे गेलों. आधले दिवशीं एका रशियन् कादंबरीचा, विकार व विचार सारखेच हालवून सोडणारा एक भाग, निम्माच टाकून गेल्याबद्दल यमू माझ्यावर रुष्ट झाली होती; त्याची भरपाई करण्याकरितां मी घाईघाईनें थोडा लवकर गेलों होतों. अशा वेळीं माडीवरील गजांच्या खिडकीला डोकें टेकून हातांत माझ्या मदतीशिवाय न समजणारें पुस्तक घेऊन यमू सज्ज असे. आणि " मीं समजावून दिलें त्याच्यापुढील कांहीं वाचून झालें का ? " म्हणून विचारतांच " हो! मधून मधून शब्द अडतात, नाहीं तर मला पुढचें सहज समजेल ! " असें थोडें खोट्या गर्वानें, तर थोडें तिच्या तेजस्वी स्वभावाला सर्वस्वीं अनुकूल अशा स्वाभिमानानें सांगे. पण आज पाहतों तों यमू खिडकींत नाहीं. घरांतील एकेका दालनांतून मी पुढें जाऊं लागलों तों सर्व घरच फिरल्याप्रमाणें दिसूं लागलें. दिवाणखान्यांत मुलांची गडबड अथवा अस्ताव्यस्त सामान दिसेना. भिंतींवरील फोटो अधिक व्यवस्थित लावलेले दिसले. खुर्च्या, टेबलें, बैठक मुद्दाम मांडल्याप्रमाणें दिसत होतीं. सर्वांत आश्चर्याची गोष्ट म्हणजे यमूची सतार यमूचीं खोली सोडून दिवाणखान्यांतील कोपऱ्यांत उभी होती. सारांश; तेथील प्रत्येक निर्जीव वस्तु आज आम्ही रोजच्याहून वेगळ्या कामगिरीवर आहोंत असें जणूं बोलूनच दाखवीत होती.

मी वर गेलों, पण यमू आपल्या खोलींत नव्हती. मी तेथेंच वाचीत बसलों. मी यमूची आई अथवा वडील यांच्यापुढें होतां होईतों जात नसे. बिचारीं दोघेंहि प्रेमळ होतीं आणि माझ्यावर तर त्यांचें अकृत्रिम प्रेम! पण मला मात्र त्यांच्या प्रेमापुढें गोंधळल्यासारखें होई. यमूच्या आईला प्रेम दाखविण्याचा एकच मार्ग ठाऊक! आणि

तो म्हणजे मी दृष्टीला पडतांच माझ्यावर खाण्याच्या पदार्थांचा भडिमार करणें! पण याव्यतिरिक्त तिला माझ्याशीं अथवा मला तिच्याशीं कांहीं बोलतां येत नसे. तीच स्थिति यमूच्या वडिलांची. एखाद्याकरितां सढळ हातानें पैसा खर्च करणें एवढा एकच प्रेम दाखविण्याचा मार्ग त्यांस माहीत होता. एखादे वेळीं मी आजारी आहे असें कळतांच आपल्या एका बड्या डॉक्टर स्नेह्यासमवेत मोटारींतून ते माझ्या खोलींत येऊन दाखल होत. पण एरव्हीं "काय! कसें काय?" यापलीकडे माझें त्यांचें क्वचितच बोलणें होई. यमूचीं भावंडें तर अजून लहानच. त्यांतील सर्वांत लहान भावंडाला यमू जीव कीं प्राण करी. पण मधल्या भावंडांच्या व्रात्यपणामुळें त्यांचें व तिचें बहुधा विरोधी प्रेमच असे. आपल्या खोलींत परवानगीशिवाय पाऊल टाकायचें नाहीं असा तिनें त्यांच्यावर कायमचा हुकूमच बजावून ठेवलेला! यामुळें यमूच्या घरांत यमूखेरीज इतरांशीं माझा क्वचितच संबंध येई. मी घरांत शिरतांच "आहे वर!" एवढेंच, लहान अगर थोर माणसाकडून विचारण्यापूर्वीच मला कळे! याहून अधिक बोलण्याचें कारणच पडत नसे.

माझ्या या वृत्तीमुळें आजहि मला खालीं जाऊन इतर मंडळींकडे चौकशी करण्याचें मनांत आलें नाहीं. मी बराच वेळ बसून राहिलों, तरी यमूचा ठिकाणा नाहीं असें दिसतांच मीं खालच्या चौकांत डोकावून पाहिलें तों वेणीफणीच्या खोलींत यमू आपला घनदाट केशकलाप सोडून आरशासमोर बसलेली. शेजारींच तिची आई जणूं तिच्यावर देखरेख करण्याकरितां उभी. केशरचनेच्या नैमित्तिक विधींत दिसून येणारा यमूचा उत्साह आज दिसत नव्हता. वस्त्राभरणांच्या बाबतींत आईनें ढवळाढवळ केल्यास यमूला मोठा अपमान वाटे. यमूच्या आवडीनिवडी फारशा ठरलेल्या होत्या असें नाहीं, पण आईनें अमुक जिन्नस अंगावर घाल अथवा अमुक तऱ्हेची वेणी घाल

म्हटल्यास मात्र तिचें पित्त खवळे. पण आज पाहतों तों सर्वच नूर वेगळा. यमूला अमुक हवें अथवा नको म्हणून सांगावयाला भिणारी आई आज जणूं काय एखादी सरकारी सनद मिळवून आल्याप्रमाणें अधिकाराच्या शब्दांत प्रत्येक गोष्ट सांगत होती. यमूनें भांग कुठें पाडावा, अंबाडा कसा बांधावा, अंगावर काय घालावें, नेसावें काय व कसें हें सर्व तिनें आगाऊ ठरविलेलें दिसत होतें; आणि विशेष म्हणजे यमूची आज तरी माझ्याविरुद्ध जाण्याची छाती नाहीं असा दृढ विश्वास तिच्या चेहऱ्यावर दिसत होता. यमूचे वडील खालच्या एका खोलींत येरझारा घालीत होते; परंतु त्यांचें लक्ष यमूच्या वेषभूषेकडेच अधिक दिसलें. बिचाऱ्यानें पैशाच्या व्यवधानांत आपल्या चित्रासारख्या कन्येकडे पूर्वी कधीं कौतुकानें डोळाभर पाहिलेंहि नसेल! पण तो आज मात्र गिऱ्हाइकाकडे डोळे लावून बसलेल्या एखाद्या चिंतातुर दुकानदाराच्या दृष्टीनें यमूकडे पाहत होता. आणि यमूची ती चर्या!—यमू या वेळीं पूर्ण निर्विकार दिसत होती. आईशीं वाद घालण्याची तिची नेहमींची प्रवृत्ति आज कुठल्या कुठें नाहींशी झाली होती आणि विशेष म्हणजे ज्या विषयांत दुसऱ्या कुणीहि आपणास शिकवूं नये असा तिचा हेका असे, अशा स्वतःच्या शरीरशृंगाराच्या बाबतींतच आज ती बिनबोभाट दुसऱ्याच्या तंत्राप्रमाणें वागत होती!

अखेर यमूचें नेपथ्यविधान संपलें. एवढ्या महत्त्वाच्या कार्याकरितां सज्ज असून यमूच्या चर्येवर उत्कंठेचा मात्र लवलेशहि नव्हता. कांहीं वेळानें मोटारीचें शिंग वाजलें. यमूचे वडील धावत धावत बाहेर गेले व फिरून येऊन यमूकडे पाहून गेले. त्यांनीं फिरून यमूच्या आईस बोलावून घेऊन कायसें सांगितलें. यमूची आई यमूकडे फिरून निरखून पाहूं लागली. प्रत्येक निरखण्यागणिक यमूच्या निर्विकार चर्येवर निषेधाची अस्फुट रेषा उठे— निदान मला तरी तसें दिसे!—आणि फिरून शून्य दृष्टीनें ती कोणीकडे तरी पाहूं लागे. मातेची दृष्टि!—

त्यांतून यमूच्या मातेची दृष्टि ! बिचारीला स्वतःच्या कन्येचा केवढा अभिमान ! यमूला बरोबर घेऊन कुठल्याहि समारंभाला जातांना तिला किती गर्व वाटावा ! पण आज तिच्या दृष्टींत अभिमानापेक्षां दैन्यच अधिक दिसत होतें. यमूकडे आई व आईकडे यमू अशा दृष्टीनें पाहत होत्या, कीं मायलेकींच्या नितान्तमधुर नात्यांत आज कसली तरी काळीकभिन्न छाया उभी असल्यासारखें दिसत होतें !

शेवटीं यमूच्या आईनें एक वेळ यमूच्या केसांवरून फणी फिरविली व चिंतेनें दबलेल्या आवाजांत तिला कायसें सांगितलें. यमू निर्विकार चर्येनें व निश्चयी पावलांनीं दिवाणखान्याकडे चालूं लागली.

दिवाणखान्यांत काय चाललें आहे, हें मला दिसत नव्हतें व पाहावेंसेंहि वाटत नव्हतें. मोटार आली त्या वेळींहि बाहेर पाहण्याचें मला भान नव्हतें. त्यामुळें आलेली मंडळीहि मी पाहूं शकलों नाहीं. यमू दृष्टिआड होतांच मी खुर्चीवर अंग टाकून वाचण्याचा यत्न करूं लागलों... कांहीं वेळानें सतारीचें दा-दिड-दा ऐकूं आलें. (यमू मला सतार वाजवून दाखवीत असे, त्या मानानें आज किती भिकार वाजवीत होती !) कांहीं वेळानें दिवाणखान्यांत पोकळ औपचारिक हशा व कित्येक अनोळखी वृद्धांचें मोठमोठ्यांदा बोलणें ऐकूं येऊं लागलें. कांहीं वेळानें फिरून मोटारचें शिंग वाजलें. आतां दिवाणखान्यांतील गलबला शांत होऊन स्वयंपाकघरांत आवाज ऐकूं येऊं लागले.

मी अद्याप खुर्चीवरच पडून होतों. फिरून बाहेर पाहण्यास माझें मनच घेईना. मी तसाच निघून देखील गेलों असतों, पण या मंडळींच्या अंगावरून जाण्याखेरीज मार्ग नव्हता. शिवाय यमूचें तोंड पाहण्याचें धारिष्ट नसूनहि यमूशीं न बोलतां जाण्याचें माल जिवावर येत होतें !

अशा स्थितींत मीं किती वेळ काढला, तें माझ्या लक्षांत नाहीं. पण अखेर या तंद्रींतून खुद्द यमू माझ्यासमोर येईपर्यंत मी जागा

झालों नाहीं. जागा होऊन पाहतों तों काय?– तें दृश्य मी विसरण्याचा यत्न करतों पण विसरत नाहीं!– नख-शिखान्त सजविलेली यमू हातांत सतार घेऊन माझ्यासमोर उभी! यमू इतकी करुण-रम्य कधींच दिसली नसेल. करुणास्पद स्थितींत रम्य वस्तु रम्यतर दिसाव्या ही निसर्गाची एक निर्घृण लीलाच म्हटली पाहिजे! पण यमूच्या सुखदुःखाचा विचार क्षणमात्र विसरून– किंबहुना बाकी सर्वच जग विसरून– मीं त्या निर्विकार संगमरवरी मूर्तीप्रमाणें दिसणाऱ्या यमूकडे अनिमिष नेत्रांनीं पाहत होतों. यमूहि— चिंता किंवा खिन्नता यांना कधींच थारा न देणारी यमूहि!—मला पाहून आज इतकी स्तिमित झाली, कीं तिच्या हातांतील सतार गळूनच पडली असती! पण हें एक क्षणभरच. तात्काल यमूनें आपलें नित्यस्वरूप धारण केलें. निदान येतांक्षणींचें स्वरूप तरी बदललें. ती मजकडे पाहून एक वेळ चमत्कारिकपणें हसली व मला कायसें म्हणाली. काय तें मला आतां आठवत नाहीं— अथवा तेंव्हांहि ऐकूं आलेंच नव्हतें म्हटलें तरी चालेल. फिरून मी तिजकडे वेड्यासारखा पाहत राहिलों!

यमूची मूर्ति म्हणजे आनंदाची मूर्ति! यमू दिसतांच आनंदानें मन भरून जावें! यमूचें स्वरूप म्हणजे पावित्र्य आणि सौंदर्य यांचा मधुर संगम! पण तीच मूर्ति पाहून मला आज किती उद्वेग वाटत होता! प्रत्यक्ष विधात्याच्या कौशल्याची साक्ष पटविणारीं तिचीं गात्रें आज किती हीन कार्याकरितां सजविलीं होतीं!...होय, हीन कार्यच! मानवी शरीर— त्यांतून कुमारिकेचें शरीर म्हणजे विश्वांतील पवित्रतम कुसुम होय. त्यानें एखाद्या विक्रेय वस्तुप्रमाणें कोणाहि गिऱ्हाइकापुढें स्वतःला मांडून ठेवावें यासारखी विटंबना कोणती? हृदयसमर्पण हीच ज्याची कमींत कमी किंमत अशा स्त्रीदेहाची बाजारी देवघेव करण्याइतकें हीनकर्म दुसरें कोणतें?........यापुढें मला यमू आनंदाची मूर्ति कशी दिसणार? यमूच्या ईश्वरनिर्मित रम्य मूर्तीवर

मला मानवी घटनेच्या टाकीचे विद्रूप वण दिसूं लागले! आजवर नंदनवनांतील शीतल वायुलहरीप्रमाणें वाटणारी यमू आज मला दुःखमय स्त्री-जातीच्या उष्ण निःश्वासाप्रमाणें भासूं लागली.

"रम्य वस्तु म्हणजे चिरकाल आनंदस्थान होय" असें म्हणणाऱ्या कवीनें रम्य वस्तूला क्लेशनिधान बनविण्याची मानवी कला खास लक्षांत घेतली नसावी!

४

अशा व्यत्ययांनीं केवढाहि चित्तक्षोभ झाला तरी फिरून आमचा नित्यक्रम द्विगुणित उत्साहानें सुरू होई. यमू तर अलीकडे जवळ-जवळ बेहोष झाल्याप्रमाणेंच वागत असे! मला वाटतें, भवितव्याची खात्री व तयारी एकदमच होऊन चुकल्यामुळें तिच्या मूळच्या आनंदी वृत्तीला जास्तच भरती आली असावी! मी एखादे वेळीं उदासवाणा दिसलों म्हणजे तर ती इतका लडिवाळ व्रात्यपणा करी, कीं कधीं कधीं मला राग देखील येई. याउलट, तिचें मन न ओळखतां—किंबहुना तिला मन आहे हेंहि न ओळखतां!— जे तिच्या लग्नाच्या गोष्टींची सांप्रदायिक उत्साहानें चर्चा करीत, त्यांच्यापुढें मात्र ती तिरस्कार-युक्त औदासीन्य दाखवी.

एकदां तर तिनें आपल्या मोहक व्रात्यपणाची कमालच केली! कदाचित् अल्लड चेष्टांचा शेवटचाच प्रयोग म्हणून इतका यशस्वी वठला असेल! त्या दिवशीं सकाळपासून मला अकारण उदास वाटत होतें, आणि त्यांतच संध्याकाळीं कारणाचीहि भर पडली. आम्हां उभयतांच्या एका दूरच्या नातेवाइकाकडून यमूचें लग्न ठरलें अशी

वार्ता मला समजली होती. सांगणाराला ती बातमी इतर चार बातम्यांहून वेगळी नसल्यामुळें 'ठरून कित्येक दिवस झाले!' असेंच त्यानें सांगून टाकलें. बातमी ऐकून मला काय वाटायचें तें वाटलेंच, पण त्याबरोबर एक गोष्ट माझ्या मनाला लागून राहिली. यमूच्या लग्नाची वार्ता, माझ्या यमूच्या जन्मांतील एवढ्या अवस्थांतराची वार्ता मला तिसऱ्याच्या तोंडून कळावी ना? आणि एवढयानेंच झालें नाहीं; यांत वचनभंगहि झाला होता. ज्या वेळीं या अप्रिय विषयावर बोलायचें नाहीं असें मीं ठरविलें, त्याच वेळीं मीं यमूकडून "कांहीं नक्की होतांच तुम्हांला कळवीन" असें वचन घेतलें होतें. यमू आपलें वचन विसरली कीं वचनच मुळीं मनापासून नव्हतें? संबंध तुटण्यापूर्वींच इतक्या तुटकपणें वागण्याची घाई? फिरून माझे निराशेचे विचार माझ्या डोक्यांत थैमान घालूं लागले. यमूचें आणि वचन! स्त्रियांना कसलीं वचनें आणि कसला स्नेह? ज्यांचा जन्म केवळ एकाकरितां— आणि म्हणजेच सर्वस्वीं दुसऱ्याकरितां, अशांनीं वचनें देणें म्हणजे क्षणिक उपचार होय आणि अशांचीं वचनें घेणें म्हणजे कायमचा वेडेपणा होय! स्त्रियांची विद्या, स्त्रियांचें चातुर्य अथवा स्त्रियांचा स्नेह हे शब्दच अर्थशून्य होत!

या विचारांच्या गर्दीमुळें जड झालेलें डोकें खुर्चीवर टेकून मी यमूच्या खोलींत बसलों होतों. यमूची वाट पाहतां पाहतां मी वाट पाहत आहें हेंहि विसरलों. एवढ्यांत यमूनें मला कोठून पाहिलें कोण जाणे. ती माझ्या खिन्नतेवर रामबाण उपाय योजण्याच्या तयारीस लागली. दुपारीं वाळिवाचा पाऊस झाला असल्यामुळें मी त्या दिवशीं ओव्हरकोट आणला होता. माझा गॅलरींतील ओव्हरकोट व धाकट्या भावाची फरकॅप एवढ्या दोनच जिनसांच्या साहाय्यावर यमूनें क्षणांत पुरुषवेष घेतला आणि मुद्दाम पुरुषी चालीचें अनुकरण करीत ती एकदम माझ्या खुर्चीपर्यंत येऊन ठेपली आणि मोठ्या ऐटींत "हॅलो,

चियर् अप" असें म्हणून तिनें जणूं हस्तांदोलनाकरितां आपला नाजुक हात माझ्यापुढें केला. तरीहि मी स्तब्धच! हें पाहून यमूच्या चेष्टांना अधिकच ऊत आला. नवीन प्रयोगाला सुरुवात करणाऱ्या जादुगाराप्रमाणें झटकन् परत फिरून तिनें आपल्या टेबलावरील आम्हां दोघांचेंहि लाडकें शेलीच्या कवितांचें पुस्तक एखाद्या अर्भकाला उचलावें त्याप्रमाणें आबदार उचललें. आणि तोंडानें टेनिसनच्या

"Rose a maid of nineteen years
Set, her book upon his knee
Like summer tempest came his tears
Sweet my child, I live for thee."

या ओळी थोडा फरक करून मुद्दाम माझ्यासारखे उच्चार करून म्हणत माझ्यापर्यंत येऊन तिनें तें पुस्तक खरोखरच माझ्या मांडीवर दिलें! पण आज माझ्या-तिच्या मनःस्थितींत एवढें अंतर होतें, कीं तिच्या विनोदाचा माझ्यावर उलटा परिणाम होऊं लागला. नाहीं तर तिचा आतांचा वेष आणि आविर्भाव इतकीं मोहक होतीं, कीं एखादा पक्का अरसिकदेखील क्षणभर गुंग झाल्याविना राहता ना. एरव्हीं अंमळ जास्त उंच वाटणारी तिची सडपातळ शरीरयष्टि पुरुषवेषांत किती सुकुमार दिसत होती! गोऱ्यापान कपाळावरील काळ्याभोर दाट फुगीर केसांत फरकॅप इतकी बेमालुम मिसळून गेली होती कीं जणूं शरीराचाच भाग! पुरुषी चालण्याची नक्कल उठविण्याकरितां झपझप पावलें टाकतांना, पायांतील जनानी बुटांचा टप्टप् आवाज तिच्या मधुर इंग्रजी शब्दोच्चाराला जणूं ताल धरीत होता. क्षणैक खिन्नता विसरून तिच्या या मोहक बालिश सोंगाचें अवलोकन करीत असतां मला तिच्या आवडत्या पालुपदाची आठवण झाली. ती नेहमीं म्हणे, मी पुरुषाच्या जन्माला आलें असतें तर काय बहार झाली असती! खरोखर यमू पुरुषाच्या जन्माला येती तर... असा वेड्यासारखा विचार माझ्या

डोक्यांत येऊन गेला; पण शोकपर्यवसायी नाटकांतील विनोदी प्रवेशामुळें बाकीचा शोकरस ज्याप्रमाणें अधिक तीव्र वाटतो, तसाच यमूच्या या मोहक चेष्टांचा माझ्या उदास मनावर परिणाम होत होता. तथापि चेष्टा असह्य होऊन मला माझें मौन मात्र मोडावें लागलें. मी उदासपणें उद्गारलों, "यमू, अखेर तूं आपलें वचन मोडलेंसच!"

तिच्या थट्टेनें माझें मन प्रसन्न होण्याचें बाजूसच राहून माझ्या खिन्नतेचें कारण ती स्वतःच ठरल्यावर तिची थट्टा आपोआप बंद पडली. तिच्या आविर्भावांवरून, अस्फुट शब्दांवरून किंबहुना मौनावरूनहि तिला माझा आरोप मान्य नसल्याचें उघड दिसत होतें. तथापि जो विषय निघतांच ती थिजल्यासारखी होई, त्या विषयांतील समज-गैरसमज, खरें-खोटें यांचा निवाडा तिच्या तोंडून मोकळेपणानें कसा होणार? ती म्लानपणें हसून पुनःपुनः निर्वाळा देई कीं, "मीं अद्याप वचन मोडलें नाहीं; वेळ येतांच सांगेन." मग मला कळलें तें कसें? ठरलें नसलें तरी ठरल्यासारखेंच असेल. एक-दोन स्थळें जवळजवळ निश्चित होऊन हुंड्याच्या रकमेंत अडून राहिलें असेल. किंवा उभयपक्षीं चालणारा बाजारी घासाघिशीचा प्रकार चालू असेल. किंवा अगदीं निश्चित होईपर्यंत सांगण्याची चालढकल केल्यास मला सहजच बाहेरून सर्व माहिती कळेल व मग आपल्यावरचा हा अप्रिय प्रसंग टळेल, असाहि तिचा विचार असेल. सारांश, ठरलें नसून ठरल्याप्रमाणेंच होतें.

यामुळें माझ्या मनांतील विषण्णता जाणें अशक्य होतें. यमूचा पहिला नूर अगदींच पालटून गेला व माझा पहिल्याहूनहि गर्द झाला. आम्ही दोघेंहि बराच वेळ कांहींच बोलत नव्हतों. परंतु माझे विषण्ण विचार मला स्वस्थ बसूं देईनात.

"यमू, परवां आपण वाचीत होतों त्याच लेखकानें दुसऱ्या एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं स्नेह अथवा सख्य—Comradeship म्हणून ज्याला म्हणतां येईल तें स्त्रियांच्या बाबतींत शक्य नसतें. एक

त्या आई अथवा पत्नी या नात्यानें पुरुषाला सर्वस्व मानतील, त्याच्याकरितां आपलीं सर्व सुखें बाजूला लोटतील, कीं एक अगदीं परकेपणानें तरी वागतील. याखेरीज स्त्रियांनीं दाखविलेला स्नेह म्हणजे केवळ तात्पुरतें सौजन्य होय." मी माझे उदासवाणे विचार ओकूं लागलों. यमू खिन्नपणें ऐकत होती.

"आणि आपल्या शोपेनहौरचें तर म्हणणें आहे कीं, स्त्री-पुरुषांतच काय, पण स्त्रियांस्त्रियांतहि सख्य म्हणून शक्यच नसतें. सख्य काय तें पुरुषा-पुरुषांतच शक्य आहे!"

यमू फिरून खिन्नपणें हसली. जणूं काय तिला हें सर्व कबूल असूनहि बोलून दाखविलेलें मात्र आवडत नव्हतें. कांहीं वेळानें ती पाहिल्याहूनहि खिन्न दिसूं लागली. मी अखिल स्त्रीजातीला उद्देशून काढलेले उद्गार कदाचित् तिनें आपल्या मनाला लावून घेतले असावे. बसल्या बसल्या तिनें एका वहींतील एक कागदाचा कपटा फाडला व त्यावर पेन्सिलीनें कायसें लिहिलें. लिहून झाल्यावरहि कांहीं वेळ ती अस्वस्थ चित्तानें इकडे तिकडे पाहत होती व मधून मधून जणूं माझा कांहीं अपराध केला असल्याप्रमाणें ती माझ्याकडे पाही. अखेर तिनें हातांतील कागदाचा कपटा झटकन् माझ्यापुढें टाकला व कशाच्या तरी निमित्तानें खालीं पलायन केलें. मला प्रथम याचा अर्थच कळेना. कागदावर फक्त दोन तीनच शब्द लिहिले होते. एक आडनांव, एका गांवाचें नांव आणि या सर्वांच्या खालीं "जवळ जवळ निश्चित" एवढाच मजकूर तिनें इंग्रजींत लिहिला होता. हें वाचल्यानंतरची माझी प्रश्नांची सरबत्ती चुकविण्याकरितां ती खालीं गेली असावी.

थोड्या वेळानें यमू परत आली. या वेळीं तिच्या मनांतील खळबळ तिनें प्रयत्नानें बरीच कमी केली होती. ती हसत हसतच वर आली. एवढ्यांत मीहि माझी उत्कंठा बरीच दबविली. तथापि उत्कंठेबरोबर औदासीन्य कमी करणें मात्र माझ्या हातांत नव्हतें! ...झालें! यमूचें

भवितव्य जवळजवळ निश्चित झालें. एक रम्य काव्य मध्येंच तुटल्या-प्रमाणें मला वाटूं लागलें. यमूच्या चरित्रग्रंथांतील वाचण्यासारखा भाग संपला. उरलेला भाग यमूच्या काय किंवा कोणाहि सामान्य मुलीच्या चरित्रांत काय, कमी-अधिक प्रमाणानें सारखाच. लग्न ठरलें याचाच अर्थ यमूचा सध्यांचा आनंदाचा आणि स्वातंत्र्याचा जीवनक्रम संपला. पण स्वातंत्र्य म्हणजेच जिवन्तपणा आणि जीवन्तपणाचें पहिलें लक्षण-म्हणजे चिवटपणा! हाच चिवटपणा यमूला हें स्थित्यंतर दिसत असूनहि कबूल करूं देत नव्हता. जहागीर जप्त झाल्यानंतर मुद्दाम पूर्वीची राहणी कायम ठेवण्याची धडपड करणाऱ्या जहागिरदारासारखी तिची स्थिति होती. उलट मला तर तिचें हें स्थित्यंतर शक्य तितक्या भडक रंगांत रंगवावेंसें वाटे! लग्न ठरणें म्हणजे माझ्या दृष्टीनें आजची यमू नाहींशी होण्यासारखेंच होतें आणि हें तिला जाणवून देण्या-करितांच कीं काय मीं हातांतील कागदाचा चोळा-मोळा करीत म्हटलें,

"ठीक आहे. यमूताई, येतों आतां." आणि मी जाण्यासाठीं उठलों देखील. माझ्या या सर्वच वर्तनांत एक प्रकारचा आततायीपणा होता. वास्तविक आजच काय पण आणखी कांहीं दिवस यमूंत प्रत्यक्ष फरक असा कोणताच होत नव्हता व म्हणूनच आम्हांला नित्यक्रम चालू ठेवण्यास कांहींच हरकत नव्हती. उलट यमू तर म्हणे अथवा तिचा खोटा स्वाभिमान तिला म्हणावयास लावी, कीं लग्नानंतरहि इतर चार मुलींप्रमाणें मी दाग-दागिने, नटणें आणि मिरवणें यासारख्या उथळ कार्यक्रमांत मुरून जाणार नाहीं. कदाचित् हे कार्यक्रम उथळ वाटण्या-इतका तिचा मनोविकास झालाहि असेल. अथवा कदाचित् ती केवळ माझ्या तोंडापुरतेंहि असें म्हणत असेल, कित्येकदां तर मला वाटे, यमू केवळ माझ्याखातर उच्च वातावरणांत चढण्याचे श्रम घेते. माझ्या-पुरतीच काव्याची अभिरुचि दाखविते. माझ्याखातरच इतर स्त्रियांच्या पोकळ डामडौलाविषयीं तिरस्कार दाखविते. माझ्यापुढेंच परावलंबी

स्त्री-जीवनाविषयीं चीड दाखविते. वास्तविक तिला स्वतःला वडील माणसांच्या भातुकलींतील बाहुली होऊन बोहल्यावर उभें राहण्यांत आनंदहि वाटत असेल!

मी एकदम शेवटचा निरोप घेऊन निघालों असतों तर यमूच्या मनाला लागलें असतें; पण मी बसून काय करणार होतों? तिच्या नियोजित स्थळाविषयीं मीं आणखी कांहीं चौकशी केली असती तर मला माहिती मिळालीच नसती असें नाहीं, पण माझ्या मुख्य प्रश्नास यमू काय उत्तर देणार? बारीकसारीक गोष्टींतहि स्वतःच्या आवडी-निवडी व हट्ट पुरविणारी यमू एका सर्वस्वीं अनोळखी व्यक्तीला पत्करतांना मनाची काय समजूत घालीत होती? इतर कोणत्याहि बाबतींत तिचे हट्ट पुरविणारे आई-बापहि या बाबतींतच तिला केवळ बाहुली समजून कां चालत होते? या सर्व अनिष्ट व अप्रिय गोष्टीं-विरुद्ध अक्षरहि बोलणें पाप वाटण्याइतपत स्थिति कोणत्या सुलतानी कायद्यानें आणली?

आणि लग्नाच्या घटकेपर्यंत ही आतां कोणता उद्योग करणार? पाहावयास आलेल्या शें-दीडशें लोकांपैकीं निश्चित झालेल्या व्यक्तीची चेहेरेपट्टी आठवणार आणि आपल्या कल्पनाशक्तीला ताण देत रात्र आणि दिवस घालविणार! "त्या दिवशीं आलेला तोच हा कीं... रंग गोरा होता इतपत आठवतें... दिसण्यांत थोडा रूक्ष दिसला... माझा स्वभाव त्याच्या स्वभावाशीं जुळेल काय?... त्यापेक्षां त्याच्या आधींच्या शनिवारीं पाहून गेलेला किती...पण छे! आतां हें मनांत आणणें म्हणजे पापच. लग्नापूर्वीं फिरून एकदां पाहतां आल्यास... पण आतां काय याद्या झाल्यादेखील!" अशा विचारांत ती उरलेले तीन-चार आठवडे घालवणार! यापेक्षां लग्न ठरल्यावर तरी उभयतांचा परिचय करून दिल्यास पुष्कळसा मानसिक त्रास वांचणार नाहीं का? पण छे! तें किती गैरशिस्त!

कोणाच्या भीतीनें अथवा जबरदस्तीनें कोण जाणे, यमूला ही कडू गोळी गिळावी लागत होती... अथवा अंतीं कदाचित् गोडहि ठरण्यासारखी गोळी इतक्या कडू अनुपानांतून गिळावी लागत होती. या यमूला मी स्वातंत्र्याची मूर्ति समजत असे ! पण यमू पराधीन आणि तिचे आई-बापहि पराधीन ! स्वतःच्या व स्वतःच्या पोटच्या गोळ्याच्या सुखाची गळचेपी करून ते कोणती देवता संतुष्ट करीत होते ?

५

गंगा सिंधु सरस्वती च यमुना गोदावरी नर्मदा ।
कावेरी शरयू महेन्द्रतनया चर्मण्वती वेदिका ॥
क्षिप्रा वेत्रवती महासुरनदी ख्याता च या गंडकी ।
पूर्णाः पूर्णजलैः समुद्र सरिता कुर्यात् सदा मङ्गलम् ॥ १ ॥

संगीतशास्त्रांत जोगिया, ललत, कालंगडा यांसारखे कांहीं राग करुण-रसाला अनुकूल म्हणून सांगितले आहेत. तथापि कोणत्याहि रसाच्या सिद्धीनें आनंदाची प्राप्ति घडविणें हाच कलेचा हेतु असल्यामुळें, करुणरसोत्पादक राग देखील आनंदाचेंच वर्धन करीत असतात. कोणताहि कलावन्त निर्भेळ दुःखाची अनुभूति घडविणारी कलाकृति निर्माण करीत नाहीं. कारण त्याचें ध्येय आनंद हें असतें. पण कलेच्या क्रीडांगणांतील प्रस्तुत ध्येय बाजूला ठेवून, एकाद्या तानसेनानें केवळ करुणरसानें भरलेली रागिणी रचिल्यास ती सांप्रतच्या अर्ध-करुण रागरागिण्यांइतकी लोकप्रिय होईल कीं नाहीं याबद्दल मला जबरदस्त शंका आहे. शेक्सपियर अथवा सॉफॉक्लिस् यांच्या कित्येक शोक-पर्यवसायी नाटकांस अखेरअखेर इतकें भीषण स्वरूप येतें, कीं

प्रेक्षक आपले अश्रूंनीं भरलेले नेत्र झाकून घेतात. पण अशीं नाटकें आपल्या शास्त्रकारांनीं निषिद्ध ठरविलीं आहेत. संगीताच्या बाबतींतहि सर्वसाधारण माणसांची हीच वृत्ति दिसून येते. पण दुःखाच्या गीतांस मनोरंजनाच्या क्षेत्रांत मज्जाव झाला म्हणून दुःख थोडेंच नष्ट झालें ! आणि जोंवर दुःख नष्ट झालें नाहीं, तोंवर त्याचें गीत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत ऐकावयाला सापडणारच !

मंगलाष्टकें आज ज्या चालींत म्हटलीं जातात, त्या चालीस संगीतशास्त्रांत कोणतें स्थान आहे हें मला सांगतां येणार नाहीं. या सुरांत तीं केव्हांपासून म्हणण्यांत येऊं लागलीं हेंहि मला माहीत नाहीं. तथापि कोणत्याहि कलावंतानें इतकी निर्भेळ करुणरसोत्पादक चाल रचण्याचें धारिष्ट केलें नसतें एवढें मात्र खचित. हे सूर प्रथम कोणी उपयोगांत आणले असतील ते असोत; पण विशिष्ट भावना मनांत निश्चितपणें उभ्या करणें हें संगीताच्या सामर्थ्याचें एक लक्षण मानल्यास– मंगलाष्टकांच्या चालीइतकी सामर्थ्यवान् चाल माझ्या तरी पाहण्यांत नाहीं. कलावन्तांनीं जे सूर भीषण म्हणून टाकले ते अनभिज्ञ पुरोहितांनीं अथवा अजाण वधूबांधवांनीं रूढ केले, असें तर घडलें नसेल ? हा संशोधनाचा प्रश्न सोडून दिला तरी, एवढी गोष्ट प्रत्येकास कबूल करावी लागेल, कीं जे ऐकतांच आबालवृद्धांच्या हृदयांत कालवाकालव झाल्याखेरीज राहत नाहीं असे कोणते सूर असतील तर ते मंगलाष्टकांचेच. कित्येक कदाचित् अशा सुरांस संगीतांत स्थान देण्यासहि तयार नसतील; पण याचेंहि कारण मनोरंजक संगीताहून अधिक सामर्थ्यवान् संगीत ग्रहण करण्याची त्यांची तयारी नसते हेंच होय. रंगभूमीवरील संगीत आकलन करणें इतक्या अल्प सहृदयतेचें काम आहे, कीं तें सामान्य जनांच्याहि आटोक्याबाहेर नाहीं. परंतु मानवी संस्कृतीच्या बाल्यावस्थेंत, भीषण पंचमहाभूतांच्या सान्निध्यांत, हिमालयाच्या गंभीर वातावरणांत,

भक्ति व भीति यांच्या संगमांतून उगम पावलेल्या वैदिक ऋचांच्या संगीताचा भोक्ता, जर्मन संगीतमुनि बेथोवेन् याजसारखा एखादाच महात्मा! अशा उदात्त संगीतास तोड केवळ निसर्गाच्या भयानक संगीताचीच! काळ्याकाभिन्न रात्रीं निबिड अरण्यांत ऐकूं येणारा 'किर्र' असा शब्द अथवा महासागरांतून निघणारा लाटांचा कल्लोळ हेच अशा अलौकिक संगीताची बरोबरी करूं शकतील. अथवा निसर्गाच्या अमानुष संगीताचे सूर मानुष हृदयांतून जर कोठें निघत असतील तर ते मनोरंजनाच्या प्रांतांत नसून आहुतिदान अथवा कन्यादान या-सारख्या गंभीर प्रसंगींच!

हें हृदयविदारक आहुति-संगीत आज सायंकाळीं माझ्या कानीं पडणार होतें. आज गोरज मुहूर्तावर मंगलाष्टकरूपी शोकगीतें जन्मदात्या आई-बापांची यमूवरील सत्ता संपली हें जाहीर करणार होतीं. आज सकाळ-पासूनच अनेक शतकांपलीकडचे "गंगा सिंधु सरस्वती च यमुना" चे स्वर माझ्या कानांत घुमूं लागले होते. यमूच्या घरीं चाललेला एकएक सोहळा माझ्या डोळ्यांपुढून जात होता. यमूची मनःस्थिति मी माझ्या अंतश्चक्षूंपुढें आणण्याचा यत्न करीत होतों. गेल्या कित्येक दिवसांत यमूची व माझी भेट झाली नव्हती. गेले कित्येक दिवस यमू माझी नव्हती—इतकेंच काय पण स्वतःचीहि नव्हती. ती सर्वस्वीं वडील मंडळींची मत्ता होऊन राहिली होती. जणूं काय कांहीं काळ इंग्रजी शिक्षणाच्या हिरवळीवर सोडलेली गायच फिरून दावणीला सापडली होती! लांबलांबहून गोळा झालेली नातेवाईक मंडळी आपापल्या परीनें यमूचें कौतुक करण्यांत कसूर होऊं देत नव्हती. यमूचें जेवणखाण, वस्त्रालंकार वगैरे कोणतीहि गोष्ट तिची एकटीची उरली नव्हती. 'लोक काय म्हणतील', 'तिकडची मंडळी काय म्हणतील' या दोन दृष्टींनीं वडील मंडळी यमूला घालावयाचे निर्बंध ठरवीत होती. यमूच्या मध्यंतरींच्या जीवनक्रमाकडे ही सर्व मंडळी जणूं एक

प्रकारच्या उदार क्षमाशील दृष्टीनें पाहत. आजपर्यंत झालें तें झालें; आतां तरी खऱ्याखुऱ्या श्रुति-स्मृति-पुराणोक्त जीवनक्रमाला सुरुवात झाली पाहिजे अशा दृष्टीनें त्यांचे सर्व सोहळे चालले होते. त्यांच्या नित्य नव्या सोहळ्यांत व कोडकौतुकांत दोन विरोधी वृत्तींचें मिश्रण दिसून येई. एका दृष्टीनें त्यांना वाटे हिच्या खऱ्या जीवनाला आतांशी सुरुवात होत आहे, यापुढें ही आपल्याप्रमाणें चुडा भरणार, आपल्या-प्रमाणें तुळशीला पाणी घालणार, आपल्याप्रमाणें हळदी-कुंकवाला जाणार आणि आपल्याप्रमाणेंच पतीला सर्वस्व मानणार. पण दुसऱ्या दृष्टीनें वाटे, प्रेमाच्या माणसांच्या घरांत मनमोकळेपणानें वावरण्याचे हिचे दिवस संपले. यापुढें पति, सासरची मंडळी व अफाट जग या सर्वांच्या मताची काळजी करून तिला प्रत्येक पाऊल टाकलें पाहिजे. स्वतःच्या व जन्मदात्या आईबापांच्या मताची यत्किंचित् पर्वा न करता नवीन घरच्या मंडळींच्या चालीरीतींप्रमाणें वागलें पाहिजे. इतकेंच काय, पण त्यांचाच अभिमान धरला पाहिजे. या दृष्टीनें पाहतां लग्ना-पूर्वीं कांहीं दिवस चाललेल्या यमूच्या कोडकौतुकाला एक प्रकारें दुखवट्याच्या समारंभाचें रूप येई.

आजचा तर मुख्य दंगलीचा दिवस. यमू घट्ट मनानें एकएक संस्कार करून घेत होती. संध्याकाळच्या मुख्यविधीच्या कल्पनेनेंच तिचें मन इतकें बधिर झालें होतें, कीं एकेका संस्कारांतून ती निवळ निर्जीव यंत्राप्रमाणें पार पडत होती. वास्तविक यापूर्वींच मी यमूच्या घरीं राहावयास जाऊन यमूच्या लग्नाकरितां उभारण्यांत आलेल्या प्रचंड स्वयंसेवक-दलांत नांव दाखल करावयास हवें होतें. परंतु आतां-पर्यंत मी केवळ जाऊन-येऊनच होतों व आजहि माझी गैरहजेरी जाणवूं नये म्हणून शेजारच्या माझ्या एका मित्राच्या घरीं मुक्काम ठेवला होता. मीं कितीहि टाळलें तरी मुख्य समारंभाच्या वेळीं तर मला हजर राहणेंच प्राप्त होतें. माझ्या मित्राच्या घरूनहि मला यमूच्या घरीं मधून मधून

होणारा बँडचा आवाज ऐकूं येई व फिरून माझ्या विचार-मालिकेला चालना मिळे. आतां यमू गौरीहराची पूजा करीत असेल; आतां वाङ्निश्चय चालला असेल...पण हे बाह्य संस्कार झाले, तरी यमूच्या मनाला कोणते संस्कार घडत असतील ? तिच्या मनांत– यमूच्या मनांत– काय चाललें असेल ? ती या दिव्यांतून कशी पार पडत असेल ?

सायंकाळचे सहा वाजले. लग्नमंडपांत इष्टमित्रांची गर्दी होऊं लागली. थोड्या वेळांत नवरदेव येऊन दाखल होणार, व नंतर यमू बोहल्यावर दिसणार ! माझी मनःस्थिति व माझ्या भोंवतालच्या मंडळींची मनःस्थिति यांत केवढी तफावत होती ! स्त्रियांच्या चर्येवरून त्यांची समारंभप्रियता व आस्था दिसून येत होती, तर पुरुषांच्या बेफिकीर गप्पाष्टकांवरून त्यांस हा सर्व प्रकार एक पोकळ अभिनय होता असें दिसत होतें. त्यांच्या गप्पांत विशेषेंकरून पोटाचे व्यवसाय, राजकारण, अथवा लग्नाचा मोसम हेच विषय ऐकूं येत, तर मध्येंच एखाद्याच्या तोंडून वराचें शिक्षण, व हुंड्याचा आंकडा या दोन गोष्टींचा उच्चार होई. मधून मधून यमूच्या रूपाचीहि वाखाणणी ऐकूं येई; तेव्हां मला वाटे, या पोटार्थी अरसिकांस यमूचें गूढ सौंदर्य काय समजणार ? सर्वांच्याच चर्येवरून हा अर्धा तास मजेंत घालविण्या-करितां ते जमले आहेतसें दिसत होतें. नवरा येणार, लग्न लागणार, आपण जाणार, या गोष्टी त्यांस इतक्या सहज व निश्चित वाटत होत्या, कीं कोणत्याच प्रकारची अस्वस्थता अथवा 'पर्युत्सुकता' त्यांच्या चर्येवर दिसत नव्हती. उलट, मला हा अर्धा तास जणूं सृष्टीच्या उलथापालथीचा काल असल्याप्रमाणें वाटत होतें. आणखी अर्ध्या तासांत होणारें सर्व होणारच ना ? आणखी कांहीं मिनिटें संपण्याचा अवकाश कीं यमू म्हणजे यमू नव्हे ना !

मुहूर्ताची वेळ झाली. बोहल्याजवळ जिव्हाळ्याच्या स्त्री-पुरुषांची एकच गर्दी दिसूं लागली. बाहेरील दृश्याहून हें दृश्य किती भिन्न !

येथें गडबड असूनहि आतां एक प्रकारची स्मशानशांतता नांदत होती. बोहल्याभोंवतालच्या स्त्रियांच्या चर्येवर एक प्रकारची खिन्नता दिसत होती. वरपक्षाकडील कांहीं स्त्रियांच्या चर्येवर मात्र एक प्रकारच्या विजयाची ऐट दिसत होती. तथापि भोंवतालचें खिन्नतेचें वातावरण त्यांच्या ताठरपणास फारसें पोषक नसल्यामुळें त्यांनाहि हळूहळू भोंवतालच्या गांभीर्याची बाधा होत होती.

या गंभीर देखाव्याकडे पाहत असतां यमू केव्हां येऊन अन्तर्पाटापुढें उभी राहिली हें माझ्या ध्यानांतहि आलें नाहीं.

यमूचें तोंड मला दिसत नव्हतें. तिचें तोंड अंतर्पाटाकडे होतें व पाठ ज्यास ती आज कायमचें सोडीत होती अशा माहेरच्या गणगोताकडे होती. गतायुष्याकडे पाठ आणि भावी आयुष्यावर धर्मानें व समाजानें धरलेला पडदा असेंच कांहींसें तें दृश्य मला वाटलें! यमू जवळजवळ भानावर नसल्यासारखीच होती. न बांधतांहि ती बांधल्याप्रमाणें उभी होती. यमूसारखी मूर्तिमंत चपला, आज निर्जीव मूर्तीप्रमाणें उभी राहिलेली, हेंच मुळीं किती अघटित वाटे! भोंवतालचे सर्व स्त्रीपुरुष, वृद्धतरुण, आतेष्ट, आपण आज एका अत्यंत प्रिय वस्तूवरील हक्क सोडीत आहों या भावनेनें विव्हल दिसत होते. इतकेंच काय, पण वरपक्षाच्या मंडळींशीं तुलना केल्यास वधूकडील सर्वांच्या चर्येवर थोडीशी मानखंडनेची छटा दिसत होती. आबालवृद्धांच्या मनांत भावना एकच, पण ती झाकण्याच्या तऱ्हा मात्र अनेक दिसून येत होत्या. ज्यांना सर्वांत अधिक मनोवेदना होत असणार ते वधूचे आईबाप इतके गंभीर दिसत होते, कीं गांभीर्य अणुमात्र कमी होईल तर त्यांस मुक्त-कंठानें रडावेंच लागेल असें त्यांच्या चर्येवरून उघड दिसत होतें. सदा बेफिकीर व हसतमुख दिसणारे कित्येक तरुण आप्त आज इतके कावरे-बावरे व अस्वस्थ दिसत होते, कीं त्यांना पाहूनच एखाद्याला भडभडून आलें असतें. प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या

रूपानें यमूविषयींचें प्रेम व्यक्त करण्याचा यत्न करीत होता. यमूचे कित्येक दूरचे आप्तेष्ट आज आप्तेष्ट म्हणून मला प्रथमच दिसत होते. ज्याच्याशीं माझें एकदां सिनेमागृहांत जागेबद्दल भांडण झालें होतें असा एक चंगीभंगी तरुण कावऱ्याबावऱ्या चर्येनें व दाटलेल्या कंठानें यमूला कायसें सांगतांना पाहून मला दुःखांतहि क्षणभर मौज वाटली. तो यमूचा एक चुलतभाऊ होता! कोणी यमूच्या कानांत कांहीं सूचना देण्याकरितां पुढें होत, तर कोणी तिची मंडवळी सावरण्याकरितां तिच्या ओलसर केशकलापास स्पर्श करीत, तर कित्येक पोक्त स्त्रीपुरुष तिला धीर देण्याकरितां तिच्या पाठीवरून हातहि फिरवीत. मला वाटे यांनीं क्षणभर औपचारिक लज्जा सोडल्यास हे खास यमूला पोटाशीं धरून मनसोक्त रडतील!

आणि हें किती सत्य होतें याची साक्ष, ज्यांना रडण्याची तितकीशी चोरी नाहीं अशा या पाहा यमूसारख्याच अल्लड कन्यका देत आहेत! या सर्व यमूच्या शाळेंतील मुली होत्या. यमूच्या जवळ उभें राहण्यास सापडावें म्हणून त्या एकमेकींस अगदीं चिकटून उभ्या होत्या. त्यांच्या सुकुमार गालांवरील टवटवी पार निघून गेली होती. त्यांचे विशाल नेत्र अश्रूंच्या ओघांमुळें करुणरम्य दिसत होते. यांपैकीं कित्येकींस मी यमूकडे येतांच कबूतराप्रमाणें भुर्रकन् उडून जातांना पाहिलें होतें, एवढीच माझी त्यांची ओळख. पण आज या अनोळखी मुली मला किती जवळच्या वाटत होत्या? जणूं काय आम्ही सर्व एकाच बुडत्या होडींत एकमेकांस बिलगून बसलों होतों! त्यांतील कित्येक ऐटबाज मुली, भावनेच्या आवेगांत कमरेचा हातरुमाल तसाच विसरून कोऱ्या करकरीत जरीच्या पातळाच्या पदरानें झटकन् डोळे पुसून, अश्रु लपविण्याचा यत्न करीत होत्या. तर कित्येकींनीं तो नाद अजीबात सोडून उघडउघड रडण्यास सुरुवात केली होती. यमूच्या वर्गांत नसलेली व यमूहून वयानें बरीच लहान अशी, यमूच्या

एका मैत्रिणीची धाकटी बहीण तर इतकी बेसुमार रडत होती, कीं तिची समजूत घालण्याच्या धांदलींत यमूची मैत्रीण क्षणभर स्वतःचें दुःखहि विसरली. मैत्रिणीच्या वियोगाच्या दुःखांत या कन्यका आपल्या भावी स्थितीच्या विचारांचीहि भर घालीत होत्या कीं काय कोण जाणे ! मला तर त्यांच्याकडे पाहून " इमे अपि कन्यके प्रदेये " या कण्वाच्या वाक्याची थोड्या वेगळ्या अर्थानें आठवण झाली !

वास्तविक आमच्या दृष्टीला यमूखेरीज दुसरें कांहींच दिसलें नसतें, पण आतां यमू म्हणजे एकटी यमू नव्हे ! यमूच्या भावी सुखदुःखाची मूर्ति अंतर्पाटापलीकडे उभी होती. आजतागायत सर्वस्वीं अपरिचित पण केवळ अपरिहार्यत्वामुळें क्षणांत आपलीशी वाटूं लागलेल्या त्या अनोळखी व्यक्तीकडे आम्ही किती मिश्रभावनांनीं पाहत होतों ! तो साधारण सुस्वरूप होता हें पाहून सर्वांसच पहिलें समाधान वाटत होतें; पण तें समाधान क्षणांत नाहींसें होऊन आमची दृष्टि बाह्यांगावरून त्याच्या अंतरंगाकडे वळे. याचा स्वभाव कसा असेल ? आमची यमू याला आम्हांस वाटते तितकी बिनमोल वाटेल काय ? पण क्षणांत वाटे आपण होऊन चालत आलेल्या रत्नाची किंमत कमी होणेंच अधिक संभाव्य !

वधूपक्षांतील स्त्री-पुरुष समानदुःखाच्या रज्जूंनीं एकमेकांशीं अधिक निगडित होत असतां, यमूला त्यांच्यापासून तोडून परक्या घराशीं मंत्राच्या साहाय्यानें बांधण्याकरितां ब्राह्मण अधीर झाले होते. " शुभ-मंगल सावधान ! "च्या पहिल्या आरोळीनें त्यांनीं आमच्या व्याकुळ मनास पहिला धक्का दिला; व आपल्या भावनेविनाच कम्पित झालेल्या आवाजानें " गंगा सिन्धु सरस्वती च यमुनाऽऽ "चे करुणालाप आळविण्यास सुरुवात केली. आम्हां सर्वांचे नेत्र एकाच ठिकाणीं खिळले होते. आम्हां सर्वांच्या हृदयांत एकच करुण मूर्ति होती. आम्हां सर्वांचे हात मंगलाक्षता टाकण्याचें एकच कार्य करीत होते. आम्हां

सर्वांचे उष्ण निःश्वास जणूं एकाच हृदयांतून निघत होते. आतां वियोगाची कल्पनाहि क्षणभर दृष्टीआड होऊन आम्हां सर्वांच्या चित्तांत यमूच्या अभीष्ट चिंतनाखेरीज दुसरी कसलीच कल्पना नव्हती. "कुठेंहि सुखी अस" हा एकच विचार आमच्या मनांत स्फुरत होता.

क्षणांत अंतर्पाट दूर झाला व यमूनें वराच्या गळ्यांत माळ घातली. आतांपर्यंतची शांतता असह्य झाल्यामुळेंच कीं काय कोण जाणे, वाद्यांचा व बोलण्याचा एकच कल्लोळ उठला. इतका वेळ मनाला पडलेल्या ताणाची प्रतिक्रिया म्हणूनच कीं काय कोण जाणे, सर्वांचेच चेहरे फिरून उल्हसित दिसूं लागले. भावनांचें राज्य संपून क्षणांत त्यांची जागा उपचारांनीं घेतली.

मी मात्र आतां माझी नसलेल्या यमूला धर्म व समाज यांच्या तावडींत तशीच सोडून थोड्याच वेळांत "मीं पाहिला हा कसला विधि पाहिला ?" याचा विचार करण्याकरितां त्या कोंदट वातावरणांतून दूर निघून गेलों.

६

त्या दिवशीं रात्रीं मी एका विलक्षण विषण्णतेचा अनुभव घेत होतों. मला वाटत असलेलें दुःख केवळ वियोगाचें नव्हतें. वियोगाचें दुःख शेक्स्पियर म्हणतो त्याप्रमाणें खरोखर फार गोड असतें; पण मला माझ्या प्रिय यमूचा वियोग झाला असें वाटत नसून, विनाश झाला असें वाटत होतें. छे! केवळ विनाशहि नव्हे. कारण यमू एकदम नाहींशी झाली असती तरी मला आज वाटत होत्या तितक्या विचित्र यातना झाल्या नसत्या. यमू आहे तीच राहून तिच्यावर सक्तीनें एक कृत्रिम जीवनक्रम लादला जात होता आणि एकट्या यमूच्याच दुर्दैवानें कोठें भागत होतें? दुःखांतहि स्थिर अथवा दुःखामुळेंच तीव्र झालेली माझी चिकित्सक बुद्धि मला यमू एक नसून हजारों आहेत असें सांगूं लागली. एका यमूच्या जन्माची कहाणी म्हणजेच अखिल स्त्री-जातीच्या जन्माची कहाणी होय. या विचारानें माझें डोकें भणाणून गेलें. यमू म्हणे, "मी पुरुषाच्या जन्माला आलें असतें तर!" पण मला आज वाटूं लागलें, या असहाय मुलीप्रमाणें एखाद्यानें मला माझे आई-बाप, घर-दार, चाल-रीत, इतकेंच काय पण ज्या नांवानें माझे प्रेमळ इष्ट-मित्र

व आई-बाप मला संबोधीत आले व ज्याचा मला एक प्रकारचा अभिमान वाटतो, तें माझें नांवहि एका क्षणांत सोडून दे म्हणून सांगितलें तर मला काय वाटेल? या सर्वांचा मोबदला म्हणून मला एक श्रीमंत घराण्यांतील मुलगी मिळूं लागली तरी मी माझें स्वत्व गमावण्यास तयार होईन काय? मग या गरीब मुली, या भयंकर गोष्टीला कशा तयार होतात? याबद्दल मोबदला म्हणून त्यांना जन्मभर पोसण्यासारखा एक नवरा मिळतो हें खरें; पण तेवढ्याकरितां या सर्व गोष्टींवर पाणी सोडतांना त्यांना काय वाटत असेल? 'धिक्कार असो या स्त्रीजन्माला' असें नसेल का वाटत? त्यांना बोलून दाखवितां येत नाहीं म्हणून त्यांना हें भयंकर स्थित्यंतर सुखकारक वाटत असेल असें माझ्यानें तरी म्हणवत नाहीं आणि तसें असेल तर लग्नांत आढळून येणारी ही रडारड कां? वराचे आई-बाप नाहीं कोठें रडत?

काय? ही 'स्वत्वहत्या' त्यांच्या भावी सुखाला अवश्य आहे? कोण जाणे! असेल कदाचित्; पण तरी काय? ज्यांना पतिलाभ, पुत्रलाभ व अन्नलाभ घडावा म्हणून इतक्या भयंकर अटी मान्य कराव्या लागतात, त्यांचें जीवन कष्टमयच म्हटलें पाहिजे. आणि जन्मदात्या आई-बापांना कन्यादान म्हणजे काय वाटत असेल? हा विधि त्यांना 'मंगल' वाटत असेल काय?

अशा विलक्षण मनःस्थितींतच मला लग्नांतील पुढील एक एक सोहळा पाहावा लागणार होता. वास्तविक यापुढील कोणताच विधि मी यमूचा म्हणून पाहण्यास तयार नव्हतों. कारण यमूचें काय व्हावयाचें तें झालें, अशीच माझी कल्पना होती; परंतु यमूच्या दानानें उघडलेल्या डोळ्यांनीं लग्नांतील एकएका विधीचें अंतरंग पाहण्याची इच्छा मात्र मला आवरत नव्हती. आणि म्हणूनच हा अप्रिय विधि मी पाहूं तरी शकलें. पण विधि पाहणें म्हणजे यमू पाहणें! आणि लग्न लागल्यापासून यमूचें तोंड पाहण्याची मला एक प्रकारची भीति वाटत

होती. लग्नाच्या वेळेपासून यमूचें काय चाललें असेल? ती मनांतल्या मनांत स्वतःचें रूपांतर करीत असेल; ती आपलें पहिलें व्यक्तिमत्व विसरण्याचा यत्न करीत असेल. पण व्यक्तिमत्व म्हणजे काय? तिचा सरळ ताठ बांधा जाऊन त्याचे ऐवजीं ती थोडीच कुब्जा होणार होती? तिचे सतेज निर्भय डोळे काय एका दिवसांत अवनत आणि अर्धमीलित होणार होते? तिचा धवलवर्ण जाऊन त्याऐवजीं काय फिकट राखी रंग येणार होता? तिच्या आजवरच्या अनिरुद्ध वाढीचें प्रतीकच कीं काय अशा तिच्या विपुल केशकलापाच्या वैभवांत एका दिवसांत काय फरक दिसणार? छे! पण या सर्व बाह्यवैभवाचें जणूं उगमस्थान असें तिचें स्वच्छंद मन मात्र एका रात्रींत आपल्या वैभवास मुकलें असेल. ती दुःखांत असेल काय? छे! तिला माझ्याप्रमाणें दुःख करावयास थोडाच वेळ होता? ती आपल्या चर्येवर नववधूला अनुरूप असा आविर्भाव आणण्याचा यत्न करीत असेल. कालपासून नातेवाईक झालेल्या स्त्री-पुरुषांसमोर ती आदर दाखविण्याचा यत्न करीत असेल, तिच्या छोट्याछोट्या नवीन नातेवाइकांबद्दल एका दिवसांत प्रेम उत्पन्न व्हावें असा तिचा प्रयत्न चालू असेल. आणि सर्वांत अवघड गोष्ट म्हणजे नवरा व सासू-सासरा यांचेपुढें ती लज्जेचा मधुर रंग दाखवीत असेल. यमूच्या रम्य मुखावर लज्जेची लाली! वास्तविक यमू फारच क्वचित् लाजे. कारण तिचा स्वभाव मूळचा धीट व त्यांतच कांहींशा फाजील स्वाभिमानाची अथवा पिळाची भर पडलेली! यामुळें लाजणें हा ती जणूं कमीपणा समजे. पण किती केलें तरी हा मुद्दाम आणिलेला बाणा. तो कायमचा कसचा टिकतो? व जेव्हां ती आपला पीळ व निश्चय विसरून स्त्रीस्वभावास अनुसरून लज्जित होई तेव्हां ती किती रम्य दिसे! छे, पण ही लज्जेची दुर्मिळ लाली केवळ वधूचा आचार-धर्म म्हणून ती आपल्या चर्येवर आणूं शकेल काय? आणीलहि

स्त्रिया जात्याच अभिनयकुशल असतात. किंबहुना त्यांचें जन्मजात परावलंबित्व त्यांस खोटा अभिनय शिकवितें. लज्जा म्हणजे मुग्ध हृदयांत सहज स्फुरलेल्या आदराचें रम्य बाह्य स्वरूप. पण हीच लज्जा रूढीचा एक भाग बनल्यावर तिचें सौंदर्य काय उरलें? कुणाबद्दल आदर, कुणाबद्दल प्रेम, तर कुणाबद्दल लज्जादरमिश्रित प्रेम एका रात्रींत वाटूं लागणें शक्य आहे काय? त्यांतून यमूसारख्या स्वतंत्र बाण्याच्या व पीळदार मनाच्या कुमारिकेस हे मधुर भाव ओढून-ताणून आणतांना किती अवघड वाटत असेल? कीं यमूलाहि याचें कांहींच वाटत नसेल? तसें असेल तर खरोखरच धिक्कार असो त्या स्त्रीजन्माला कीं ज्यांत परावलंबी जिण्याचा खोटा अभिनय इतका स्वाभाविक वाटतो!

होय! यमूहि तशीच आहे. ती पाहा आपल्या जुन्या मैत्रिणींच्या व नव्या नातेवाइकांच्या नर्मविनोदांत धन्यता मानीत आहे. जणूं ती या प्रसंगाची वाटच पाहत होती. तिच्यांत एकदम फरक दिसेल म्हणून मी तिच्यासमोर जाऊं धजत नव्हतों. पण फरक कांहींच नाहीं हें पाहून तर मला त्याहूनहि धक्का बसला! तिची उज्ज्वल कांति व तिचें हास्यवदन जशींच्या तशींच! काल दुःखांत बुडालेल्या तिच्या मैत्रिणी आज जणूं तिचा एक प्रकारचा हेवा करीत आहेत कीं काय असें वाटे. त्यांच्या बोलण्यांत कोणतेहि विषय आले तरी त्यांचें पालुपद यमूचें नूतन गृहिणीपद हेंच असे. मधून मधून "आतां काय, यमूला आमची कसची आठवण राहते?" अशा तऱ्हेच्या नर्म शब्दांनीं त्या तिला टोंचीत व यमूहि हास्ययुक्त मौनानें त्यांचें बोलणें जणूं मान्य असल्याचें दाखवी. पूर्वीच्या नात्यांना मागें टाकणारें नातें जणूं अक्षतांच्या मंत्रानेंच निर्माण झालें होतें! मध्येंच वरपक्षाकडील एखादी पोक्त स्त्री तिला कांहीं काम सांगे; व शब्द उच्चारलेहि जाण्याच्या आंत यमू उठून तें करून टाकी. काम क्षुल्लकच असे. कधीं कधीं तर एखाद्या पाहुण्यास "ही

पाहा नवरी" म्हणून दाखविण्याहून अधिक नसे; तथापि आपण,—वरपक्षाच्या मंडळींनीं—तिला हाक मारतांच ती लगबगीनें उठून आज्ञा पाळते हें पाहूनच त्यांना एक प्रकारचा गर्व वाटत होता. कित्येक तिला तिच्या नांवानें हाक मारीत. कित्येकांस माहेरचें नांव उच्चारण्यांतहि कमीपणा वाटे व नवीन तर अद्याप ठेवलें नव्हतें. त्यामुळें केवळ "मुली" या संबोधनानेंच त्यांस भागवावें लागे. यमूहि लगेच आपल्या मैत्रिणींच्या कानांत "चुलतचुलत सासूबाई!" असें अगदीं हलक्या आवाजांत सांगे. या वृद्ध स्त्रियांना, या उपवर मुलींना व आमच्या नवपरिणीत यमूला आज होत असलेल्या हर्षाचें पूर्ण स्वरूप मला आकलन करतां येत नसलें तरी तो फार प्राचीन काळापासून चालत आलेला होता एवढें खास! कशानें का होईना या गरीब मुलींचे अश्रु थांबले हें पाहून मला समाधान वाटे. तरी ज्याच्या कल्पनेनें त्या काल रडत होत्या त्याच्याच प्रत्यक्ष दर्शनानंतर त्यांनीं हसावें याचा मला अचंबा वाटत होता.

मुख्य विधि पार पडल्यामुळें सर्वांसच हायसें वाटत होतें व आतां हौसेच्या प्रकारांना सुरुवात झाली होती. कित्येक वृद्धमंडळींच्या तोंडून पूर्वींचे कित्येक हौसेचे प्रकार आतां कमी होत चालले म्हणून दुःखोद्गार निघत होते, तर कित्येक पूर्वींचे कांहीं ना कांहीं तरी प्रकार झालेच पाहिजेत म्हणून आग्रह धरून बसले होते. यमूच्या सासरची मंडळी "नव्या चालीची" या सदरांत मोडत होती! पण तें कां, हें मात्र मला पुरतेंसें उमगलें नव्हतें. कारण लग्नसमारंभांत नवीन प्रकारचें असें कांहींच नव्हतें. हुंडा, करणी वगैरे सर्व गोष्टी पूर्वापार चालत आल्याप्रमाणें याहि लग्नांत दिसत होत्या. पण अखेर कोणाकडूनसें मला समजलें कीं, मुलाकडची कित्येक मंडळी ओवळ्यानेंच जेवावयास बसली होती व यमूच्या एका कॉलेजांत शिकणाऱ्या दिरानें जेवतांना

च्त्रिाहुतीहि घातल्या नाहींत; एवढ्याच बाबतींत वरपक्षाकडील सुधारणा दिसून आली !

पण या सुधारलेल्या मंडळींची स्थिति अशिक्षितांहूनहि थोडी चमत्कारिक झाली होती. वरपक्षीय म्हणून मिळणारा मोठेपणा त्यांस नको होता असें नाहीं (वधूपक्षाकडील मंडळींस कमी लेखतांना ते कोणत्या सुधारणावादाचा अवलंब करीत कोण जाणे !) व कित्येक पोरकट सोहळे पाहण्याची हौसहि त्यांस कमी दिसत नव्हती. तथापि कोणी जुन्या चालीचें म्हटलेलें मात्र त्यांस खपत नव्हतें. वधूकडच्या मंडळींनीं आपलीं जुनीं व नवीं दोन्हीं मतें गुंडाळून ठेवलीं होतीं. या सर्व मतामतांच्या गलबल्यांत आपले सर्वच आवडते प्रकार बुडतात कीं काय, अशी कित्येक जुन्या मंडळींस भीति पडली होती. “ विड्या तोडणें, घास घालणें तर काय, नाहींच; पण निदान...!” असें म्हणून ही मंडळी आपली एकएक योजना पुढें मांडीत व ती नापास झाली म्हणजे त्यांचें बोलणें, कां कोण जाणे, मुलीच्या इंग्रजी शिक्षणाकडे वळे. वस्तुतः विड्या तोडणें तरी मुलीनें नको म्हटल्यामुळें थोडेंच राहिलें होतें ! पाहणारांनाच कसेंसें वाटल्यामुळें तें रहित झालें होतें. पण मला विशेष मौज ही वाटली कीं, एखाद्या नाटक कंपनीनें एखादा महत्त्वाचा प्रवेश वगळल्यास प्रेक्षकांना जितकें नुकसान वाटणार नाहीं इतकें नुकसान या मंडळींना वाटत होतें. अखेर एका धार्मिक विधीच्या निमित्तानें या मंडळींस आपल्या डोळ्यांचें पारणें फेडतां आलें !

तो विधि म्हणजे कंकण सोडण्याचा. नवरी कंकण सोडणार ही वार्ता वऱ्हाडी मंडळींत अथवा प्रेक्षक मंडळींत हां-हां म्हणतां पसरली. बैठकीच्या खोलींत उभें राहण्यास जागा नाहीं इतकी गर्दी झाली. मुलीला पाचारण करण्याविषयीं भटजींचें फर्मान सुटलें. कांहीं वेळानें नखशिखान्त दागिन्यांनीं मढविलेली यमू मंद पावलांनीं येत असलेली दिसूं लागली. त्या दागिन्यांच्या गजबजाटानें ती फारशी शोभिवंत दिसत होती असें

नाहीं. तिच्या विशिष्ट आवडी माहीत असल्यामुळें मला तर तिनें हे दागिने आवडीपेक्षां कर्तव्य म्हणूनच घातले आहेत हें उघड दिसत होतें. किंबहुना ती क्षणभर सासरच्या सोन्यामोत्यांची तिजोरी बनली होती असें म्हटलें तरी चालेल. वस्त्रांच्या बाबतींतहि तिचीं एरव्हींचींच वस्त्रें उंची असल्यामुळें त्यापलीकडे मजल मारणें सासरच्या मंडळींस शक्य नव्हतें. तथापि एका गोष्टींत मात्र तिच्या अंगावरील वस्त्रें विशेष दिसत होतीं, आणि तीं म्हणजे तिच्या आवडीपेक्षां वेगळ्याच प्रकारचीं असण्यांत! सारांश, यमूचा आजचा साज कोणाच्या तरी हुकुमाबरहुकूम होता हें तिला नेहमीं पाहणारांस सहज दिसून येण्यासारखें होतें.

यमू येतांच तेथील पोक्त मंडळींनीं "अशी बैस, तशी बैस" वगैरे सूचनांचा भडिमार केला. सर्वांचे डोळे यमूकडे लागले होते. यमू या वेळीं बेफिकीर दिसत होती. तरी या सर्व प्रकारांतून पार पडण्याकरितां तिला बराच निग्रह करावा लागला होता, हें उघड दिसत होतें. वस्तुतः कंकण सोडणें हा विधि अगदींच साधारण आहे. पण भोंवतालच्या वृद्धांच्या आधाशी नजरेमुळें त्याला एक प्रकारच्या ग्राम्य कसरतीचें स्वरूप आलें होतें. यमू नवऱ्यासमोर येऊन बसतांच सभोंवारच्या मंडळींची थोडी निराशा झाल्यासारखें दिसलें. त्यांना एक प्रकारचा धक्काच बसला. कारण यमू त्यांच्या अपेक्षेप्रमाणें लाजत अथवा घाबरत नव्हती. तिची मान गुढघ्यांत गेली नव्हती, तिच्या नजरेंत या प्रकाराबद्दल तिरस्काराचें पाणी खेळत होतें. नवऱ्याकडे अथवा वृद्धप्रेक्षकांकडे पाहतांना ती पूर्ण बेपर्वा दिसत होती. यामुळें त्या वृद्धांची निम्मी निराशा झाली. तिनें कंकणहि लाजतबिचकत न सोडतां अगदीं सहज व अगदीं थोडक्या वेळांत सोडलें. यामुळेंहि विशेष लढत न दाखवितां पांच मिनिटांत कुस्ती आटपल्यास तालीमबाजांना जी निराशा वाटते तशाच प्रकारची निराशा तिच्या वृद्ध

प्रेक्षकांच्या चर्येवर दिसत होती. मध्येंच एखादा कुजबुजे “अहो, या इंग्रजी शिकलेल्या मुली!”

काम होतांच यमू एखाद्या गर्ल्‌गाइड्प्रमाणें ताठ उभी राहिली. पण तिच्या प्रेक्षकांनीं तिला एका नवीनच कायद्याच्या कलमांत अडकविलें. नांव घेतल्याशिवाय जायचें नाहीं! वास्तविक कंकण सोडण्याच्या आधींच त्यांस तें आठवावयाला हवें होतें. पण यमूचा प्रवेशच त्यांच्या अपेक्षेपेक्षां झपाट्यानें झाल्यामुळें त्यांचा नाइलाज झाला. पान चघळीतचघळीत या पोरखेळांचा हट्ट घेणाऱ्या वृद्धांकडे यमूनें ज्या जालीम नजरेनें पाहिलें, तींत मला औपचारिक लज्जेच्या राखेखालीं दडलेला यमूच्या स्वत्वाचा अंगार पाहून थोडें समाधान वाटल्यावांचून राहिलें नाहीं.

७

यमूबद्दल मला अनुकंपा वाटत होती; तिच्या आईबापांची मला कींव येत होती; उथळ प्रेक्षकवजा वऱ्हाडीमंडळीबद्दल तिरस्कार वाटत होता. पण खुद्द नवरदेवाबद्दल काय वाटत होतें हें माझें मलाच उलगडत नव्हतें ! त्याच्याविषयीं कांहीं ठाम वाटण्यासारखा पुरावाच माझ्यापुढें नव्हता. ज्या समारंभाला मी एक प्रकारच्या बलिदानाचा समारंभ समजत होतों, त्यांतील बलीचा खुद्द स्वीकार करणाराच तो होता यांत शंका नाहीं. आणि या दृष्टीनें पाहतां वास्तविक तो माझ्या रोषास पात्र व्हावयास हवा होता; तथापि आरंभापासून अखेरपर्यंत त्याजविषयीं मला रोष तर वाटला नाहींच, पण उलट कींवच वाटत होती. वास्तविक मला त्याजविषयीं कांहीं निश्चित वाटण्यास त्याला या प्रकाराविषयीं काय वाटत होतें हें मला समजावयास हवें होतें.

त्याला काय वाटणार ? माझ्या प्रश्नाचा अर्थ— त्याला वेगळें तें काय वाटणार ?— मनुष्यच यंत्र तयार करतो व मनुष्यच त्यांत यंत्र बनतो ! कित्येक शतकांच्या अवधींत आम्हींच हें विवाहविधींचें यंत्र उभारलें आहे व त्यांत सापडतांच आम्हीच यंत्र बनतों. एखादी

प्रेमळ माउली वरमाईच्या जागीं उभी राहतांच एकदम कशी नख-शिखान्त बदलते! एखादा सालस मुलगा नवरदेव बनतांच मूळस्वभाव विसरून किती झटपट नवरेपणानें वागूं लागतो! हा सर्व त्या पुराण-विधियंत्राचा प्रभाव होय.

आणि असें न होईल तरच आश्चर्य! कोणत्याहि मनुष्याची वृत्ति लग्नसमारंभांत कां बदलणार नाहीं? जन्मापासून झालेल्या कोणत्याहि सन्मानाहून आज त्याचा विशेष सन्मान होत असतो. इतर कोणताहि सन्मान एखाद्या कृत्याबद्दल—फार तर एखाद्या गुणाबद्दल—असूं शकेल. पण आजचा सन्मान त्याच्या बौद्धिक, सांपत्तिक, शारीरिक वगैरे यच्चयावत् सर्वच गुणांबद्दल असतो म्हटलें तरी चालेल. त्याच्या केवळ अस्तित्वालाहि यापुढें स्वतंत्र किंमत आहे. त्याचा उत्कर्षापकर्ष तर राहोच; पण त्याच्या केवळ अस्तित्वावर जिचें व पर्यायानें जिच्या घराचें सौभाग्य अवलंबून आहे अशी एक व्यक्ति आजपासून निर्माण होणार. त्याला स्वतःला आजवर माहीत असलेल्या त्याच्या गुणांचें तर आज चीज होणारच; पण शिवाय त्यांत आणखीहि कांहीं गुणांची भर पडणार. तो बिजवर नाहीं, त्याला आई सावत्र नसून सख्खी आहे, त्याला व्यसन नाहीं, त्याला फार भाऊ नाहींत, त्याला कर्ज नाहीं या सर्व गोष्टींची गुणांत गणना नाहीं असें कोण म्हणेल? तथापि आजवर त्यानें या 'गुणां'चा विचार केला नव्हता; पण आज यांपैकीं प्रत्येक गुणाची त्यास जाणीव आहे व त्याला विसर पडूं लागल्यास उभयपक्षाचें गणगोत त्याच्या गुणसमुच्चयाची वेळीं-अवेळीं उजळणी करीत आहेत. आणि या सर्व भावरूप गुणांचें केवळ शाब्दिक वर्णन कितीहि केलें तरी फिकेंच पडणार म्हणून कीं काय कोण जाणे, आज त्याच्या गुणसमुच्चयाची रोख किंमतहि जाहीर होत आहे. पसतीसशें रुपये! त्याच्या तारुण्याची, पदवीची, इस्टेटीची किंमत याहून कमी कशी पत्करेल? याहून कमी

म्हणण्याचा अवकाश, कीं आज जिला तो अर्धांगी म्हणत आहे तिला केव्हांच नकार देऊन त्यानें दुसरी मिळविली असती!

त्याच्या सौजन्यालाहि यापुढें स्वतंत्र महत्त्व प्राप्त होणार. कारण त्याच्या सौजन्यावरच एका– आपल्या आईबापांच्या लाडक्या– मुलीचें सुख अवलंबून आहे आणि विशेष महत्त्व असण्याचें कारण म्हणजे त्यानें छळण्याचें मनांत आणल्यास त्याला जाब विचारण्याची कोणाला-च छाती नाहीं. उलट कित्येक तो त्याचा पुरुषार्थच समजतील. त्याच्या वडिलांच्याच किंबहुना अधिक दर्जाच्या एका श्रीमान् गृहस्थाच्या मुलीच्या सुखदुःखावर केवढी ही हुकमत!— पण त्यांत अधिक तें काय? त्याची किंमतच तेवढी मोठी आहे. त्याच्या शरीराकडे, संपत्तीकडे व पदवीकडे बघूनच मुलीच्या आईबापांनीं तिला त्याच्या स्वाधीन केली आहे. अशा शेंकडों मुलींचे बाप हेलपाटे घालीत होते व त्यांतील एकच त्यानें पतकरली आहे. अर्थात् एवढी मोठी हुंड्याची रक्कम व कुलशीलवान् मुलगी हेंहि पण त्याच्या गुणांचेंच अल्पस्वल्प मोल होय!

मुलीच्या आईबापांनीं त्याला **नवर'देव'** म्हटलें आहे व या अलौकिक पदाला योग्य असाच सन्मान त्यांनीं केला पाहिजे. मुलीच्या सर्व गणगोतानें त्याचा मान केला पाहिजे. पण त्यांतल्या त्यांत आईबापांनीं तर आपल्या चर्माचे जोडे करून त्यांच्या पायांत घातले तरी तें कमीच होईल. कारण त्यांच्या लाडक्या मुलीचा जन्म त्यांच्या हातांत आहे. त्यांनीं त्याजविषयींचें प्रेम अथवा आदर किंवा दरारा कोणत्याहि रूपानें दाखवावा. त्याची पूजा करावी, त्याचे पाय धुवावे, त्याला अत्यंत आदबीनें संबोधावें, त्याच्या आईबापांचे व गणगोताचे पाय धुवावे, त्यांना "आम्हां गरिबांना पदरांत घ्या" असें म्हणावें,–पण या सर्वांबरोबरच सर्वसामान्य नवरदेवांना व त्यांच्या आईबापांना पटणारा आदराचा मार्ग म्हणजे पैशाची पिशवी सैल

सोडणें आणि परोपरीच्या व अनंत सांप्रदायिक नांवांनीं प्रसिद्ध अशा देणग्या देऊन या सर्वांस खूष करणें हें वधूकडच्या मंडळींचें कर्तव्यच आहे. वराकडील मंडळींचें काम म्हणजे, कमी काय पडतें इकडे बघणें. आणि कमी पडणारच! त्यांच्या सोन्यासारख्या मुलाचा मुलीकडच्यांनीं याहूनहि मान करावयास नको काय ?

होय ! हा समारंभच असा आहे कीं वराला व त्याच्या गोताला असें न वाटेल तरच नवल. मग यमूच्या नवऱ्याला याहून वेगळें तें काय वाटणार ? तो एन्जिनियरिंगची शेवटची परीक्षा पास होता. त्याच्या वडिलांची नागपुराकडे बड्या श्रीमंतांत गणना होत होती. तो प्रथम वर होता. तो गौरवर्ण व अव्यंग होता. अशा स्थितींत हुंड्यासह यमू त्याच्या पायावर लोटांगण घालीत आल्यास तो त्याला केवळ आपला हक्कच आहे असें वाटणें साहजिक होतें. वरपक्षाकडील मंडळींच्या तोंडून यमूहून अधिक चांगल्या, अधिक थोराच्या, व अधिक हुंडा देणाऱ्या मुलींची यादी मला यमूच्या वडिलांच्या देखत ऐकावयास सापडली होती; व त्याच बैठकींत हा वर मिळाल्याबद्दल यमूच्या वडिलांनीं आपल्या भाग्याचें अभिनंदन केलें होतें ! अशा स्थितींत नवरदेवाला काय वाटत असणार ? पण मला हेंहि कबूल केलें पाहिजे कीं इतर नवरदेवांच्या मानानें मला यमूचा नवरा समंजसच दिसला. रुसण्याफुगण्याचा पोरकटपणा त्यानें दाखविला नाहीं. तो कोणासहि टाकून बोलतांना दिसला नाहीं. वधूपक्षाची मंडळी त्याची फारच 'साधा' म्हणून वाखाणणी करीत होती व वरपक्षाची मंडळी आपणांस पुढारी नेमस्त मिळाल्यामुळें आपल्या मागण्या नेमस्त कराव्या लागत आहेत म्हणून खट्टू दिसत होती. आणखी खरोखरीच तो सर्वच दृष्टींनीं नेमस्त दिसला. तथापि या सुस्वभावी नेमस्ताच्याहि वागणुकींत 'नवरदेव' पणाची म्हणून वेगळी झांक

दिसून आल्याखेरीज राहत नव्हती, हें पाहून विवाहसमारंभरूपी यंत्राच्या सामर्थ्याविषयीं मला कौतुक वाटल्यावांचून राहिलें नाहीं!

गोष्ट क्षुल्लकच; पण ती अद्याप जशीच्या तशी माझ्या डोळ्यापुढें उभी राहते! लग्नांतील पहिली गडबड संपल्यावर एके दिवशीं जेवणानंतर आम्ही सर्वजण पत्ते खेळत बसलों होतों. ज्या खोलींत आम्ही खेळत होतों त्या खोलीस–नवरा मुलगा तेथें असल्यामुळें–एखाद्या राजधानीचें अथवा देवस्थानाचें महत्त्व प्राप्त झालें होतें. मधूनमधून बायका डोकावून जात; मुलें बोटें दाखवून जात; तर वृद्ध औपचारिक विचारपूस करून जात. भरगच्च जेवण झालें असूनहि मध्येंच एखादी —केवळ दूरान्वयानेंच सासू ठरलेली–प्रेमळ सासू जांवयांना फराळाचें देण्याचा प्रयत्न करून जाई! मला तर वाटूं लागलें, जांवयांना यापूर्वीं पंधरा दिवस अगर यापुढें पंधरा दिवस उपोषणच असावें. म्हणून त्यांजवर फराळाच्या जिनसांचा इतका मारा होत असावा! अशा जांवई-छायेंत आमचा डाव रंगांत आला असतां आमच्या डावांतीलच एका पोक्त गृहस्थांची सुमारें अकरा-बारा वर्षांची मुलगी मधेंच डोकावून गेली. आमच्या सद्‌गृहस्थांना राहवेना. आपली हुशार मुलगी बसलेल्या मंडळींना पुरती दिसली नसेल अशा शंकेनेंच कीं काय, त्यांनीं तिला परत बोलावून मुद्दाम तिच्या लग्नाची चर्चा सुरू केली. ती केवळ पोर! त्यांतूनहि तरतरीत व इंग्रजी शाळेंत जाणारी. तिनें अर्थातच 'मला लग्नच करायचं नाहीं!' हें पालुपद कायम ठेविलें होतें. तेव्हां तिच्या वडिलांनीं तिला टोमणा मारण्याकरितां म्हटलें, "अग चल! म्हणे लग्नच करायचं नाहीं! तुझी यमूताईसुद्धां आजपर्यंत असंच म्हणत होती!"

सद्‌गृहस्थांनीं हे शब्द उच्चारतांच आमच्या खोलीच्या दाराशीं ही चेष्टा ऐकण्याकरितां जमलेल्या यमूच्या उपवर मैत्रिणींकडे जांवईबुवांनीं

ज्या विजयी मुद्रेनें पाहिलें तिच्या अर्थाचा मी अद्याप विचार करीत आहें...... !

तरीहि समारंभाच्या या नायकाविषयीं मला राग अथवा तिरस्कार मात्र केव्हांच वाटला नाहीं. उलट माझ्या त्या वेळच्या भावनेचें मीं आतां पृथक्करण केल्यास मला तींत खेद व कींव यांचाच भाग अधिक होता असें वाटतें. अशा उमद्या प्राण्यानें या बनावट सोंगांत सांथ करून आपल्या जन्मांतील एक बहुमोल अनुभव गमावला नव्हता काय? एखाद्या मुग्ध कन्यकेच्या हृदयावर नैसर्गिक साम्राज्य गाजविण्याचा ज्याचा अधिकार त्यानें तिला बांधून घातल्यावर तिनें केलेल्या जुलुमाच्या रामरामांत धन्यता मानावी ना? कदाचित् या यमूचेंच हृदय त्यानें काबीज केलें असतें. पण आतां त्याला तें कोठून लाभणार? सांपळ्यांतल्या सावजाची कुठें शिकार होत असते? समाज व धर्म यांच्या बाणांनीं आधींच मारलेल्या प्राण्याचें शरीर ताब्यांत घेण्यांत, हृदय जिंकण्याचा आनंद कुठून येणार?

आणि या दृष्टीनें पाहिल्यास त्याच्या विजयी मुद्रेमागें मला धर्मयुद्धाची प्रभा दिसेना, व वडील माणसांनीं दिलेल्या लुटुपुटीच्या वस्तूंनाच खऱ्या मानून फसणाऱ्या अर्भकाविषयीं वाटावी, त्यासारखी मला त्याची कींवच वाटूं लागली !

८

पण माझ्या मनांत नवरदेवाविषयीं कांहींहि चाललें असलें तरी माझ्या कानांत मात्र अव्याहत त्याची व त्याच्या प्रभावळीची स्तुतीच पडत होती. कोणी म्हणे, " मुलगा बरीक छान आहे ! " तर कोणी म्हणे " सासू विचारी सज्जन आहे ! " यद्यपि मी या उद्गारांना प्रतिकूल नव्हतों, तथापि या प्रशंसेचें मूळ हातीं न लागल्यामुळें मला अचंबा वाटल्यावांचून राहत नसे. मी म्हणे, "अद्याप यांनीं काय पाहिलें आहे ? कीं ही सर्व स्तुति केवळ दिखाऊ आहे ?" पण तसेंहि नव्हतें. दूरच्यांचे कोण जाणे, पण जवळची मंडळी तरी सासूच्या व मुलाच्या सौजन्याची केवळ वरपांगीं स्तुति करीत नव्हती. त्या स्तुतींत खऱ्याखुऱ्या समाधानाचा, किंबहुना कृतज्ञतेचा अंश दिसे. यामुळें तर मी जास्तच बुचकळ्यांत पडे. मला वाटे, इतकें सौजन्य यांना दिसलें तरी केव्हां ?

पण याचेंहि उत्तर या कृतज्ञ स्तुतिपाठकांच्याच शब्दांत सापडे. अर्थात् तें मला पटे असें मात्र नाहीं. काय त्या सौजन्याच्या खुणा ! अमुक वेळीं नवरा रुसला नाहीं; अमक्याकरतां सासू तमक्याच्या विहिणीसारखी अंगावर आली नाहीं ! वरातीच्या दुसरे दिवशीं

मुलीची मावशी गांवाला निघतेवेळीं सासरच्या मंडळींनीं मुलीला तास दीड तास माहेरीं राहूं दिलें. परत नेतांना टांग्यांतून नेलें त्याचें भाडेंहि इकडून घेतलें नाहीं!... छे! छे! छे!! मला वाटे ही स्तुति कीं निंदा? इतपत साध्या माणुसकीबद्दल ज्यांची अलोट स्तुति होते त्यांस अर्थातच ही मंडळी एक वैरी तरी समजत असावी किंवा राक्षस तरी समजत असावी. मला या मंडळींच्या वृत्तीची संगतीच लागेना. काळ्या रात्रीं एखाद्या चोरानें लुबाडलेलें द्रव्य आपण होऊन परत केलें; अथवा सर्पाच्या जबड्यांत हात दिल्यानंतरहि त्यानें दंश केला नाहीं; तर मनुष्य ज्या साश्चर्य कृतज्ञतेनें सद्गदित होईल तीच कृतज्ञता या मंडळींच्या ठिकाणीं मला दिसत होती! आणि मी ईश्वरसाक्ष सांगतों, त्यांच्या या कृतज्ञतेहून मला माझ्या मनांतील अस्फुट तिरस्कारच पुरवला असें वाटे. मी वरपक्षाच्या मंडळींना माझ्यासारखींच माणसें समजत होतों. म्हणून मला तीं क्वचित् उणीं पडल्यासारखीं वाटत; पण बाकीची मंडळी त्यांस मुळांतच नरराक्षस किंवा हिंस्रपशु समजत असावी म्हणून त्यांना त्यांच्या यत्किंचितहि माणुसकीचें नवल वाटत होतें. दुसरें काय?

अक्षता पडल्यापासून माझें समारंभांतील औत्सुक्य कमी झालें असलें व मनांतल्या मनांत मीं यमूचा विषयच सोडला असें कितीहि म्हणत असलों तरी एक गोष्ट जाणण्याची मला आतुरता होतीच. अर्थात् मी तिला आतुरता म्हणण्यास मात्र तयार नव्हतों. मी तें माझें औदासीन्यच समजत होतों! तथापि ज्या गोष्टीचें मला आतां सोहेर-सुतक न उरल्यामुळें मी स्वतःला पूर्ण उदासीन समजत होतों ती समजल्या-वांचून मला चैन नव्हतें आणि ती म्हणजे लग्नसोहळा संपतांच यमू जाणार कीं राहणार? यासंबंधीं मला पक्कें कांहींच समजेना; कारण ज्यांना विचारावें त्यांना स्वतःलाच या बाबतींत कांहीं ठाऊक नसे. "काय तिचीं माणसें म्हणतील तें खरें!" हा त्यांच्या सांगण्याचा

निष्कर्ष. तथापि लग्नानंतर आठ दिवस तरी यमू माहेरींच राहणार असें जवळजवळ निश्चित असल्यासारखें होतें. कारण एक तर यमूचा नवरा नोकरीच्या खटपटीकरतां तूर्त पुण्यासच राहणार होता; व दुसरें म्हणजे यमूची केवळ जीव कीं प्राण अशी मैत्रीण—विमल प्रधान—हिचें लग्न याच आठवड्यांत खुद्द पुण्यांत होणार होतें. अर्थात् अशा वेळीं यमू पुणें सोडून कशी जाणार? पहिल्या कारणाचा मला अधिक आधार वाटत होता. तर यमूच्या मुग्ध मैत्रिणी दुसरें कारण प्रबल समजत होत्यासें दिसलें. कोणत्या का कारणानें होईना तूर्त यमू जात नाहीं म्हणतांच— उदासीनतेचें पांघरूण घेतलेला पण आंतल्या आंत अर्धामुर्धा होणारा!— माझा जीव खालीं पडला. पण छे! यमू आणखी आठ दिवस दूर जात नाहीं यामुळें का मला समाधान वाटत होतें? मला समाधान वाटत होतें तें वेगळेंच. यमू आज निघाली म्हटलें, कीं मला आजच तिला निरोप देण्याचें कटु कर्तव्य करावयास हवें, आणि आतां हें आजचें मरण आणखी आठ दिवसांवर गेलें! यांतच मला आनंद वाटत होता.

पण माझें दैव इतकें बलवत्तर नव्हतें. मांडवपरतण्याच्या दुसरे दिवशीं काय झालें कोण जाणे, यमूचें जाणें अचानक ठरलें. मी गेलों त्या वेळीं यमू केवळ निरोप घेण्याकरतां घरीं—छेः चुकलों, माहेरीं!— आली होती. विमलचें लग्न टाकून इतक्या तातडीनें निघण्याचें ठरलें; यामुळें यमूच्या मैत्रिणींचा बराच विरस झालेला दिसला. अखेर मला त्यांच्याकडून समजलें कीं, यमूच्या नणंदेचें लग्न ठरल्यामुळें असा बेत झाला. प्रथम नणंदेचें लग्न याचा अर्थच माझ्या ध्यानांत येईना. कारण यमूची एक नणंद विधवा होती व दुसरी अगदींच परकरी होती. पण हें लग्न म्हणजे, यमूच्या एका चलाख मैत्रिणीच्या भाषेंत सांगायचें झाल्यास—"छिंदवाड्याच्या कीं बेझवाड्याच्या—आते-नणंदेचें कीं मावस-नणंदेचें होतें. यमूच्या मैत्रिणींना अर्थात् या नणंदेचें नातें व ठिकाण

दोन्हीहि विमल प्रधानच्या मानानें सारखींच दूरचीं वाटत होतीं. पण यमूच्या सज्जन सासूचें मत मात्र "कोण ही विमल प्रधान? जातीची ना गोताची! तिच्यासाठीं सख्ख्या मावस-नणंदेच्या लग्नाला न जाणं कसं गोड दिसेल?" असें होतें.

यमूच्या आईचेंहि मत यमूच्या सासूप्रमाणेंच होतें. तिनें तर म्हणे यमूच्या सासूला परस्पर सांगूनहि टाकलें होतें, यमूचें "खरें" मत! "हा सगळा तिच्या शाळेंतल्या मुलींचा आग्रह आहे. तिच्या मनांत कांहीं इथें राहायचें नाहीं!" हेंच तें खरें मत! यमूला तर बिचारीला मतहि नव्हतें, आणि मनहि नव्हतें!

९

“ हन्त ! अन्तर्हिता वनराज्या शकुन्तला ! । ”

—शाकुन्तल.

यमू सासरीं गेल्याला पांचसहा दिवस झाले होते, तरी तिची खुशाली कळण्याकरतांहि मी तिच्या घरीं जाऊं शकलों नव्हतों. एक तर यमूच्या घरीं मी सर्वांसच हवासा असलों तरी तिच्याकडेच म्हणून साधारणतः जात असे. घरचीं सर्व माणसेंहि मी केव्हांहि गेलों तरी प्रथम यमूकडे वर्दी देत आणि यमूची व माझी गाठ घालून देईपर्यंत त्यांना माझ्या समागमाच्या खऱ्या आनंदास जणूं सुरुवातच झाली नाहींसें वाटत असे. आणि त्यानंतर जरी कधीं कधीं सर्वच माझ्या सहवासाचे समभागी होत तरी यमू येईपर्यंत माझ्याशीं बोलण्यास कोणासच पुरता हुरूप येत नसे. सारांश, यमूच्या पश्चात् माझी भेट घेण्याचा त्या घरावर अद्याप प्रसंगच आला नव्हता असें म्हटलें तरी चालेल.

तरी यमूच्या घरीं जाण्याविषयीं आतां माझें औत्सुक्य मंद झालें होतें असें मात्र म्हणतां येत नाहीं. उलट, यमूच्या अभावीं त्या

घराकडे पाठ फिरविण्यांत आपण एक प्रकारें स्वार्थीपणा—कृतघ्नपणा करीत आहों, असें वाटून माझ्या मनांत तिकडे जाण्याविषयीं एक अस्थिर अधीरपणा उचल करूं लागला आणि न कळत नाइलाजानें एके संध्याकाळीं माझे पाय त्या बाजूला वळले.

यमूच्या घरीं—यमू नसलेल्या त्या घरीं—तरीहि माझें स्वागत जिव्हाळ्यानें—अधिकच उत्कटतेनें—झालें. मी त्या मंडळींना हवासाहि होतों आणि नकोसाहि होतों. यमू त्यांच्यामध्यें उभी नव्हती म्हणूनच मी नको होतों आणि यमू आतां आमच्यामध्यें नाहीं हें सांगण्याकरितांच त्यांना मी हवाहि होतों. यमूचीं भावंडें—कीं ज्यांच्या आनंदांत, मस्तींत आणि मस्करींत आल्यागेल्याचा आवाजहि बुडून जाई! —तीं बंड भावंडें आज किती गरीब आणि दीन दिसत होतीं! तीं यमूशीं मस्ती करीत, भांडणहि करीत—पण तीं कधीं यमूविषयीं विचार करतील, किंबहुना कशाविषयीं तरी विचार करतील ही कल्पनाहि कांहीं दिवसांपूर्वीं कोणाला शक्य वाटली नसती! लग्नानें मुली एका दिवसांत प्रौढ दिसूं लागतात असें म्हणतात; पण यमूचीं भावंडेंहि मला एका आठवड्यांत प्रौढ बनल्यासारखीं वाटलीं आणि आई तर मुलांचा, मुलींचा, घरादाराचा—घरच्या प्रत्येक वस्तूचा—अभिमान बाळगणारी ती अभिमानी गृहलक्ष्मी!— मला जन्मांत प्रथमच वयस्क झाली—निदान होईल! —अशी दिसली.

त्या सबंध घरांत यमूखेरीज कोणांतच माझ्याशीं समानधर्म नाहीं अशी त्या सर्वांप्रमाणेंच माझीहि भावना होती. पण समानधर्मी नसलेल्या आम्हांतहि यमूनें न कळत कसा एक समानधर्म उत्पन्न केला होता, आपल्या बंधनानें कसें बांधून टाकलें होतें, हें ती गेल्यावर आम्हांला कळून आलें. मी जातांच यमूच्या भावंडांनीं यमूच्या खुशालीच्या पत्रांतील ओळन् ओळ मोठ्या हर्षानें व कौतुकानें तोंडपाठ म्हणून दाखविली. वस्तुतः सासरच्या गाडाभर वऱ्हाडाबरोबर

गेलेली यमू! तिच्या खुशालीची आणि पोंचण्याची का मोठी काळजी होती? पण आपली ताई मोठें साहसच करीत आहे; सुख असो, कीं दुःख असो— आमच्यावांचून एकटीच भोगीत आहे, अशा चर्येनें तीं लहान लहान तोंडें नवलानें, अधीरतेनें व खेदानें आपल्या दूर गेलेल्या ताईची वार्ता मला निवेदन करीत होतीं. तिच्या जाण्याच्या दिवशींची बारीकसारीक गोष्टहि—आपण काय म्हणालों, ताई आपल्याला काय म्हणाली, आई ताईला काय म्हणाली, ताईनें कपडे कोणते नेले, पुस्तकें कोणतीं नेलीं—कोणतीं नेलीं नाहींत—प्रत्येक गोष्ट त्या दिवशीं किती ऐतिहासिक महत्त्वाची झाली होती! या गमन-वर्णनांत लहानमोठीं सर्वच अहमहमिकेनें भाग घेत होतीं. क्वचित् एकमेकांस दुरुस्तहि करीत होतीं! या गमनवर्णनांत स्वतःच्या भावनांचाहि रंग भरीत होतीं आणि त्या रंगाचा भर मुख्यत्वेंकरून यमूच्या प्रत्येक कृतीचा गौरव करण्याकडेच होता. जणूं काय यमू-विषयींचा अभिमान दाखविण्यांत, पोरपणींच्या भांडखोरपणामुळें आजवर कसूर झाली, तिची भरपाईच चालली होती.

अखेर तें वियोगाचें काळसर वातावरण दूर होऊन त्या बाळ-मंडळींनीं नेहमींच्या वृत्तीनें वल्गना व मस्ती करावी म्हणून मीं कांहीं तरीच विचारावयाचें म्हणून यमूच्या छोट्या तोरेबाज बहिणीस विचारलें– "काय ग लिले, पण अखेर तूं रडलीस कीं नाहीं?—"

"छट्!" लिली जणूं आपलें रडें फिरून अचानक येईल अशा घाईनें उद्गारली!—"छट्, मी मुळींच रडलें नाहीं; आणि ताईहि पण रडली नाहीं!"

लिली रडली कीं नाहीं हें तिचें तोंडच सांगत होतें! पण तिच्या ताईविषयीं मात्र—माझ्या यमूविषयीं मात्र—मला जी माहिती होती तीवरूनहि ती फारसें खोटें सांगत नसावी. लबाड लिलीकडून

स्वतःविषयीं खरें कळण्याची अपेक्षा नको म्हणून मी तिच्या बंडखोर भावाकडे वळलों. " आणि तूं रे ? "

" आपण रडलों बुवा ! " बिचारा एकदम खरेंच सांगून गेला आणि माझ्यासमोरच रडण्याच्या बेतांत आला.

मला वाटलें, पुरुष रडतातहि क्वचित् आणि रडें लपवितातहि क्वचित् ! पण विषय बदलण्याचा माझा प्रयत्न पूर्णपणें फसत आहेसें पाहून सर्वांबरोबर मीहि फिरून एकदां उघड यमूविषयीं बोलण्यास सुरुवात केली.

अगदीं आपल्याच आणि फार चांगल्या अशा माणसाविषयीं बोलण्याचें प्रत्येकाच्या किती मनांत असतें आणि तेंच तेवढें सतत सान्निध्यामुळें कसें राहून जात असतें हें मला त्या दिवशीं कळून आलें. यमूशीं मी वर्षानुवर्षें बोलत होतों; पण यमूविषयीं बोलण्याची माझी तहान राहिलेली होती. म्हणूनच मजपुढें फारशीं न ठरणारीं हीं मुलें मला त्या दिवशीं हवीं होतीं आणि म्हणूनच मीहि त्यांना यमू घरीं नसूनसुद्धां तेथें हवा होतों. हा वेळपावेतों निःशब्द श्रवणाचें काम करणारी यमूची आई आतां हळूहळू या सामुदायिक स्मरण-समारंभांत सामील झाली आणि लवकरच त्या समारंभास गुणगानाचें स्वरूप येऊं लागलें.

एका दृष्टीनें हा प्रकार त्या घरांत थोडासा अपूर्व होता. बालिश स्पर्धेमुळें यमूच्या भावंडांनीं कोणाहि एका भावंडाची स्तुति आजवर निर्विघ्नपणें पार पडूं दिली नसती; तर कांहींसें अहंकारामुळें व कांहींसें शिस्तीच्या कल्पनांमुळें यमूच्या आईनेंहि यापूर्वी या विषयावर बोलणें होऊं दिलें नसतें. आजवरचा तिचा अपत्याभिमान मुका होता. तिला आपली वडील मुलगी इतकी आवडती वाटत असे, इतकी गुणी वाटत असे कीं, आपला तो आवडता विषय जणूं लोकांपुढें काढण्यासच तिची तयारी नसे. मुलांविषयींच्या

गर्वांत आनंदाचें मिश्रण असतें; तर मुलींविषयींच्या नाजूक अभिमानावर भीतीचें दडपण असतें. तो लोकांना दाखवावा तर न जाणो त्यास गालबोटहि लागावयाचें अशा भीतीनें मुलीच्या लग्नापर्यंत स्त्रिया तो पोटांतच साठवितात कीं काय कोण जाणें! पण नंतर एक दिवसांतच तो अनावर होतो, पोटांतून ओठांवर येतो, आणि तरीहि मुलांविषयींच्या अनिर्बंध अभिमानाची सर त्यास येत नाहीं. भीतीचें दडपण नाहींसें होतांच विरहाचें जहर त्याची गोडी कमी करते!

तथापि त्या दिवशीं यमूच्या गुणगानास मात्र विरहाच्या जहरानें अधिकच गोडी आली होती. त्या ठिकाणीं जमलेले आम्ही सर्वजण यमूचे गुण ओळखीत होतों व चाहत होतों. तरी आईच आपली मुलें ओळखूं शकते याचा प्रत्यय मला तरी त्या दिवशीं आला. आजवर यमूच्या वांट्यास फक्त धाक येत असे तर आज तिच्या वांट्यास फक्त स्तुति येत होती. आणि ज्या लहान भावंडांनीं आजवर यमूच्या आड उभें राहून धाक चुकविला त्यांस आज वाखाणणीहि चुकवावी लागत होती. यमूची आई "बिचाऱ्या" यमूच्या गुणांबरोबरच या "चोरां"चे अवगुणहि जणूं विरोधी पार्श्वभूमि म्हणून रंगवीत असतां ते छोटे चोर तोंड न उघडतां केवळ चोरट्या पण ओळखीच्या नजरेनें कबुलीजबाब देत! आईच्या अभिमानी मुद्रेहूनहि यमूच्या भावंडांच्या बालिश शरमिंधेपणाच्या आविर्भावाची आठवण होऊन मला अद्यापहि मौज वाटते!

आणि खरोखरच यमू त्या घरांतील लहानमोठ्यांस, मुलांमुलींस, घरच्यांस, पाहुण्यांस एकत्र बांधणारी एक फुलवेल होती. ती लहानांहून मोठी पण मोठ्यांहून लहान असल्यामुळें उभयतांकडूनहि उपद्रविली जाई. उभयतांसहि ती वेळप्रसंगीं मदत करी. ती सासरीं जाईपर्यंत प्रत्येक गोष्ट तिच्यावांचून कशी अडते याची कोणासच पुरती कल्पना आलेली नव्हती; पण ती घरांतून जातांच घरांतील हरएक हालचाली

थांबल्या; इतकेंच नव्हे, तर घरांतील चैतन्यच नाहींसें झाल्यासारखें भासलें. माणसामाणसांतील प्रेम, प्रत्यहींच्या कार्यक्रमांतील उत्साह, या सर्वांचें बंधनच जणूं तुटल्यासारखें वाटूं लागलें व त्याचाच एक परिणाम म्हणून यमूविषयीं बोलणें एवढा एकच व्यवसाय सर्वांस उरला– आणि तोच सर्वांस एका जागीं आणण्यास प्रभावी ठरला!

पण यमूच्या अनेक अंगांचें वर्णन होतां होतां तिच्या आईनें जेव्हां तिच्या मजविषयींच्या जिव्हाळ्याविषयीं मलाच निर्वाळा देण्यास सुरुवात केली तेव्हां मात्र मला त्या खिन्नतेच्या क्षणींहि मनांतून हसूं लोटूं लागलें; पण तेंहि अपरिहार्यच होतें. यमूचें मजवरील अकृत्रिम प्रेम इतकें सर्वपरिचित होतें कीं, त्याला वाचा कधींच फुटली नव्हती! आणि तेंच जणूं अजाण-सुजाण सर्वांसच जाणवत होतें. म्हणूनच साधें खुशालीचें पत्र असो, कीं सूक्ष्म स्वभावचित्र असो; त्या सर्वांचें वर्णन मला पाहून अधिक उमाळ्यानें बाहेर येत होतें.

होय! आपणांपैकीं प्रत्येकास, तुम्हांस, मला, सर्वांना नुसतें प्रेम करावेंसें वाटतें असें नव्हे, तर तें अखेर जगजाहीरहि करावेंसें वाटतें!

१०

I know it will not bring relief
Yet, Oh ! to see her once again !

यमू आपल्या मातापितरांचें घर सोडून गेल्यानंतर मी त्या घराकडे वळलों तो यमूकरितां नव्हे, तर त्या घराकरितां. मंगलाष्टकांच्या पहिल्या करुणस्वराबरोबरच आनंदाचा विषय या नात्यानें माझें-यमूचें नातें तुटलें आणि चिंतनाचा विषय हें नातें सुरू झालें. त्या शुभ गोरजमुहूर्तावर, सर्व समाजासमवेत मीं काय पाहिलें याचा विचार करण्याकरितां मी माझ्या गुदमरलेल्या जीवास स्वतःच्याच पंखाखालीं घेऊन टेकडीच्या पायथ्याकडे मोकळ्या हवेंत गेलों होतों. तसाच, आजहि बऱ्याच दिवसांनीं त्याच मनःस्थितींत, त्याच धूसरशा गोरजकालीं त्याच रस्त्याकडे मी मंद पावलांनीं वळत होतों. निर्झराचा आवेग आणि रानपांखरांचा स्वच्छंदपणा पोटांत घालून यमू नववधूची भूमिका कशी काय वठवीत असेल— त्या अपरिचित अभिमानी वरपक्षीय परिवारावर नम्रता, लज्जा आणि ममता यांचा

वर्षाव करण्यांत कितपत यशस्वी होत असेल, वाद्यांच्या निनादांत आणि गुरुजनांच्या सान्निध्यांत ज्या नववराच्या गळ्यांत तिनें हार घातला त्याच्या गळ्यांत आतां हातहि......!

छे! पण मला सर्वच गोष्टी कठीण वाटत असल्या तरी कांहीं गोष्टी तर अचिन्त्यच वाटत. त्यांचा विचारच मी टाळीत असे. मला त्या अप्रिय वाटत होत्या असें नव्हे– त्या अशक्य वाटत होत्या. मला केवळ भौतिक नियमांनींहि त्या अशक्य वाटत. एखादी नदी सतरा वर्षें समुद्राकडे वाहतांना पाहावी आणि एका दिवसांत पर्वतावर परतण्याचा अट्टाहास करतांना दिसावी तसें मला होत असे. माझा माझ्या मनश्चक्षूंवर विश्वास बसत नसे व मी तो विचारच अशक्यप्राय म्हणून सोडून देत असे.

यमूचें घरहि अलीकडे— यमू नव्हती म्हणून नव्हे, तर— या विचारांनीं मीं सोडलें होतें. वस्तुस्थितीपासून केवळ भावनातरंगांतून लांबवर वाहवत जात होतों. मला हें कळावयास हवें होतें कीं, वैशाखांत विवाहित झालेल्या शेंकडों मुली त्यापूर्वींच विजयी मुद्रेनें आपल्या माहेरगांवीं दाखल झाल्या होत्या, वसंत संपून ग्रीष्म आला होता; उन्हाचा व वाद्यांचा कडकडाट संपून मेघांचा व विजांचा कडकडाट सुरू झाला होता. टेकडीच्या वाटेच्या बाजूबाजूनें जलसंचय अंधारांतहि मधेंच चमकत होते. ऋतुपालटाबरोबर सृष्टीच्या रूपांतहि बदल झाला होता. मी मात्र माझ्या वैशाखी वृत्तींतच अद्याप तरंगत होतों! जणूं भोंवतालच्या सृष्टींतून आपल्या यमूला अलग करून अधांतरीं भावनांच्या आकाशांत तारकेप्रमाणें स्थापून मी तिजवर विचार चालविला होता. न जाणों ती एवढ्यांत सासरीं रुळलीहि असेल, रमलीहि असेल आणि कदाचित् विजयी मुद्रेनें माहेरीं परतहि आली असेल!...... मला कशाचीच खबर नव्हती. मी जणूं त्या जगांतच नव्हतों!

पण मी केवळ विचारमग्न होतों; एवढेंच नव्हे, तर थोडासा उदासीनहि होतों. यमू आली असली तरी मला नको होती. मला तिच्या दर्शनाची एक प्रकारची भीति वाटत होती. माझा विचार संपेपर्यंत– कोडें सुटेपर्यंत– मला यमूचा चेहरा माझ्यासमोर नको होता. त्यामुळें माझें कोडें अधिकच बिकट होईल असें मला वाटे आणि तरीहि माझी यमू म्हणून नव्हे, तर माझ्या बुद्धीचें कूट, जीवाचें रहस्य म्हणून तरी एकदां यमूला पाहावेंच असेंहि मनांत येई!...पाहिली, पाहत आहें असेंहि वाटे!

मनुष्याच्या इच्छा आणि भीति मूर्तस्वरूप घेऊन आभासाच्या रूपानें त्याच्यासमोर उभ्या राहत असतील तर यमूच्या मनोमय दर्शनास दुहेरी कारण होतें आणि म्हणूनच कीं काय कोण जाणे मला अंधारांत समोरून यमू येत असल्याचा भास झाला. मीं दिवसाउजेडीचा जनसम्मर्द टाळण्याकरितां मुद्दाम उशिरां फिरावयास जात होतों. लोकांची फिरून परत येण्याचीहि वेळ टळून गेली होती. मधूनमधून एखादाच माझ्यासारखा एकान्तलोलुप जीव मंदगतीनें सहलतांना दिसे, तर प्रेमसंवादाच्या भरांत वेळाचें भान विसरलेले स्नेही अथवा दांपत्यें घाईघाईनें परततांना दिसत. पण छे! आवाज अस्पष्ट येत असला तरी चालण्याची ऐट माझ्या तंद्रींतहि मला स्पष्ट सांगत होती कीं, हा आभास नव्हे! मी क्षणभर स्तिमितच झालों. पुढें होऊन यमूची भेट घ्यावी कीं, मागें परतून तिला टाळण्याचा प्रयत्न करावा या विचारांत माझे पाय जागचे जागींच स्थिर झाले. मी माझी गति थांबविली तरी यमू अधिकाधिक नजीकच येत आहे हें पाहून मी वेड्यासारखा आश्चर्य करीत होतों. (आणि निश्चल राहिल्यानें भवितव्याचीहि गति खुंटवितां येईल, असें समजणारा वेडाच नाहीं तर काय?)

यापुढील प्रकार मला पुरतासा स्मरत नाहीं. यमूनें अर्थात् मला अंधारांतहि ओळखलें. ती काय म्हणाली तें मात्र नक्की

स्मरत नाहीं; पण तिला येऊन बरेच दिवस झाले तरी मी भेटलों नाहीं, याबद्दल तिनें सरोष आश्चर्य दाखविलें इतकें मात्र पूर्ण आठवतें. मी कांहींसें समर्थनवजा बोललों. अंधार बराच झाला होता. यमू झपाट्यानें पुढें चालूं लागेल व भेट होऊनहि— (अंधाऱ्या वेळीं झाल्यामुळें)–दर्शन टाळण्याचें साधेल असें पाहून मला त्यांतल्या त्यांत हायसें वाटत होतें. यमूचें पाऊल पुढें पडलेंहि होतें. एवढ्यांत माझ्या मागून– अर्थात् यमूच्या समोरून– येणाऱ्या मोटारीचा झगझगीत प्रकाश जणूं विजेप्रमाणें तिच्या अद्याप अदृश्य अशा मुखावर आणि माझ्या हृदयावर एकदमच पडला !......यमू चालूं लागली... यमू गेली आणि माझ्या हृदयांत अवशिष्ट असलेली अल्पतर शांतिहि बरोबर घेऊन गेली !

ती चर्या, ती मूर्ति, तें शरीर यमूचेंच काय ? माझ्या यमूचेंच ? नाहीं ! माझ्या हृदयांत अखंड वास्तव्य करणारी मूर्ति ही नव्हे; पण नसेल तर काय बिघडलें ? मला यमूचें दर्शन नकोच होतें ना ? छे ! या नको असलेल्या दर्शनानें मला हवें असलेलें दर्शन कायमचें बिघडविलें, नष्ट केलें !

यमूच्या गात्रागात्रांत, फार काय मुलायम तेजोमय अंगकान्तींतहि आकस्मिक, अनैसर्गिक क्रान्ति झाली होती. तिच्या निसर्गरम्य जीवन-प्रवाहांत जणूं बलात्कारानें प्रतिरोध व व्यत्यय करण्यांत आला होता. तिचें वक्षःस्थल, तिचा कटिभाग, तिच्या हृदयाचे रंग दाखविणारें तिचें पारदर्शक केतकीसारखें अंग या प्रत्येकाचा आकार व मेळ मला विसकटल्याप्रमाणें भासला. अन्तर्पटाआड अदृश्य झालेली यमू कोणत्या अदृश्य व अमंगल शक्तींच्या आधीन झाली या विचारानें माझ्या मनांत अधिकच प्रलय मांडला. यमूचें मुखकमल टवटवीत असो कीं म्लान असो, राग-लोभांनीं आरक्त असो कीं खेळकर वृत्तीच्या शीतल झुळकेनें हालणाऱ्या निर्मळ जलाशयाप्रमाणें दिसो—

यमूचें मुख म्हणजे यमूच्या मनाचें चित्र अशी आजवर स्थिति होती. आणि आज? आज प्रथमच यमूचें मुख म्हणजे यमूच्या शारीरिक-स्थितीचें चित्र आणि—यमूच्या शारीरिक स्थितीचें चित्र म्हणजे आनच्या सामाजिक स्थितीचें चित्र— असा मला तरी भास झाला.

सासरची पहिलीच खेप करून आलेल्या प्रौढ वधूच्या शारीरिक क्रांतीकडे मीहि इतरांप्रमाणें उथळ शृंगारहास्याच्या दृष्टीनें पाहिलें नसेल असें नाहीं. होय! नूतनोपभोगाचीं चिन्हें मुखमंडलावर धारण करून कौमार्यसमाप्ति प्रसिद्ध करणाऱ्या नूतन वधूची मस्करी करून करमणूक करणाऱ्या तरुणांत मीहि अनेकवार सामील झालों होतों. पण माझ्या यमूच्या स्वतंत्र व पवित्र जीवनप्रवाहालाहि कलुषित करण्याचें सामर्थ्य सृष्टींतील एखाद्या प्रबळ पण गढूळ प्रवाहाला असेल अशी माझी मला कल्पनाहि नव्हती! रत्नांवर आणि तारकांवरहि कलंक दिसूं लागले तर——तेजा! तुझ्या पूजकांनीं तुला कुठें झाकावें?

यमू झगझगीत प्रकाशांत अदृश्य झाली आणि अंधकार-सागरांतील माझा संचार फिरून चालू झाला! पाय पहिल्याप्रमाणें चालूं लागले; पण विचारांचा ताल बिघडला तो बिघडला! त्या विद्युत्क्षणापूर्वींचे-हि माझे विचार सुखदायक नव्हते— तरी त्यांचे करुण स्वर माझ्या हृदयाच्या, माझ्या कल्पनासंगीताच्या सुरांत मिळून जाणारे होते... मी माझाच निषेध करूं लागलों. माझीच समजूत घालूं लागलों. माझ्या विकाराप्रमाणेंच विचारांचाहि मला अभिमान होता. माझें विचारी मन मला विचारूं लागलें—

यमूच्या मनोमय मूर्तीशीं मी इतकें आसक्त कां व्हावें? माझ्या प्रिय वस्तु तरी सदैव एकरूपच राहिल्या आहेत काय? वर्षावर्षाला, महिन्या-महिन्याला व्यक्ति आणि वस्तु नवेंनवें रूप धारण करीत नाहीं काय? सायंकाळीं सहल करण्याचें माझें हें आवडतें स्थळ, तेंदेखील आज आपलें वर्षाकालीन नूतन रूप दाखवीत नाहीं काय? आणि यमू—माझी

यमूदेखील मी अनेक अवस्थांत पाहिली नव्हती काय? आजच्या!—छे कालच्या! अव्याज, मनोहर यमूच्या किती तरी विविध अवस्था माझ्या मनश्चक्षूंपुढें येऊन गेल्या! कालप्रवाहांतून उलटें पर्यटन करतांकरतां अल्लड, हूड—परकर नेसणारी—भावाबरोबर क्रिकेट खेळणारी, परकर खोवून झाडावर चढणारी यमूहि मला दिसली. मनांत स्थापन केलेल्या माझ्या यमूपेक्षां किती भिन्न! —पण छे! हा माझा वेदान्त मला आज दिसलेल्या यमूचा स्वीकार करण्यास सामर्थ्य देऊं शकत नव्हता!

काय तिचें लावण्य कोणी हिरावून नेलें होतें? तिचा मनोहर अनिर्बंध पदन्यास, तिचा प्रमाणबद्ध उन्नत बांधा, तिची टवटवीत तांबुस अंगकान्ति, तिचें धीट मनमोकळें हास्य आणि विधात्याच्यां उदार हस्ताचाच द्योतक असा तिचा घनदाट केशकलाप हें सर्व यौवनवैभव आहे तसेंच होतें—किंबहुना अधिकच झालें होतें...पण छे! यमूच्या आजवरच्या स्थित्यंतरांत निसर्गाचा हात, दैवी स्पर्श प्रतीत होत होता. आज एकाच क्षणांत झगझगीत प्रकाशाच्या झोतांत दिसलेल्या यमूच्या नूतन रूपांत —मला समाज, रूढि, मनुष्य, कशाकशाचा स्पर्श दिसला हें माझें मलाच उमजेना. त्या स्वतंत्र, पवित्र ईश्वर-निर्मित जीवनप्रवाहांत मला कांहीं तरी गढुळल्याप्रमाणें दिसूं लागलें. रूढ बंधनांचे जुनाट दोर, कल्पनांचीं जीर्ण पत्रें, भीतीच्या कृष्णछाया—या सर्वांची भर त्या प्रवाहांत आहे कीं काय असें मला क्षणभर वाटलें. छे! भर—कीं भेसळ—आणि ती कशाची हा प्रश्नच मीं स्वतःस विचारण्यास तयार नव्हतों. मला जें पावित्र्याचें आणि स्वातंत्र्याचें निधान वाटत होतें, त्यावरहि प्राकृतबंधनें व यःकश्चित् व्यक्ति इतक्या सहजासहजीं अधिराज्य चालवूं शकतील ही कल्पनाच मला वज्राघाताप्रमाणें वाटूं लागली.

मीं स्वतःला स्वातंत्र्याचा मोठा कैवारी समजत होतों असें नव्हे, तरी समाजजीवनाला स्त्रीजीवनावर प्राप्त झालेले अमर्याद अधिकार मला

यापूर्वी इतके कधींच प्रतीत झाले नव्हते. एका मनोहर आणि पवित्र फुलझाडाचा आत्मविकासाचा ऋतु संपून शरीरार्पणाचा ऋतु सुरू झाल्याची ग्वाही त्याचे गात्रन् गात्र देत होते! त्या अभिमानी आईच्या मानी मुलीनें शरीरासह आत्मसमर्पण केल्याचें मला दिसलें; पण स्वतःला तिनें कोणत्या शक्तीला इतक्या सहजासहजीं वाहिलें हें मात्र उमगेना......यमूनें आपलें उन्नत शरीर अवनम्र केलें खरें; पण तें कुणापुढें?—नवीन गृहापुढें कीं श्वशुरादिकांपुढें, कीं पतीपुढें, कीं सौभाग्य नामक शब्दापुढें; मला कांहींच सांगतां येईना! अशा कांहीं शक्तीपुढें ती नमली होती कीं, ज्यांचा स्पर्श तिच्या बोलण्यांत, शरीरकांतींत, चर्येंत, सर्वत्र दृग्गोचर होत होता. मला—माझ्या पुरुषबुद्धीला—प्राणार्पण म्हणजे काय हें सांगतां आलें असतें; पण हें आत्मार्पण—शरीरार्पण—सर्वस्वार्पण म्हणजे काय, कसें आणि कोणापुढें हें कांहींच सांगतां येईना!

यमूच्या मनःस्थितीबद्दल विचार तिच्या विवाह-दिनापासूनच माझ्या मनांत गर्दी करीत होते. विवाह म्हणजे केवळ दोन माणसांचा संबंध नसून समाजसंबंध; आणि समाज म्हणजे अनेक शतकांतील आकांक्षा आणि भीतिबंधनें व संस्कार यांचें एकत्र प्रतिबिंब. एकीकडे निर्झरा-प्रमाणें स्वच्छंद अशी माझी यमू आणि दुसरीकडे एक जुनाट तटबंदी या दोहोंच्या दरम्यान माझें मन अनेकदां कुंठित होत होतें. पण या तटबंदीचा आणि बंधनांचा संबंध मी आजवर नववधूच्या मनापर्यंतच पोंहोचवूं शकलों होतों; पण ही लाट तिच्या देहापर्यंत पोंहोचते हा विचारच मला सुचला नव्हता.

पण माझी विचारशृंखला ध्यानांत येण्यास माझे आणि यमूचे संबंध पुनः एकदां थोडेसे सांगितले पाहिजेत.

११

“ We were as twinned lambs, that did frisk i' the Sun,
And bleat the one at the other : what we changed
Was innocence for innocence; we knew not
The doctrine of ill-doing, no, nor dreamed
That any did.................”

—*The Winter's Tale*

यमूच्या व माझ्या स्निग्ध आणि सोज्ज्वळ, गूढ आणि गंभीर, आनंदी पण आर्त अशा स्नेहसंबंधांविषयीं मीं आतांपावेतों इतकें सांगितलें असूनहि अद्याप कांहींच सांगितलें नाहीं असें मला वाटत आहे. कारण आमचे संबंधच असाधारण होते. माझें मन यमूच्या मनाशीं सख्ख्या भावाहूनहि अधिक पाशबद्ध, प्रत्यक्ष आई-बापांहूनहि अधिक भीतिग्रस्त, प्रियकराहूनहि अधिक संशयी आणि पाठच्या बहिणीहूनहिं जास्त एकरूप झालेलें होतें. यमूचें सुख म्हणजे तिच्या आप्तबांधवांचें सुख असेल पण यमूचें दुःख म्हणजे माझें दुःख होतें. किंबहुना यमूलाहि न कळणाऱ्या यमूच्या वेदना प्रथम मला व्यथित करीत.

पण आजची माझी व्यथा यमूच्या दुःखानेंहि उत्पन्न झाली होती, असें माझें मन मला सांगेना. निसर्गरम्य सुरूच्या झाडाप्रमाणें वाढतांना दिसणाऱ्या यमूच्या शरीरावरहि निसर्गबाह्य शक्तींनीं हस्तक्षेप केल्याचें मला दिसत होतें; पण यमूच्या सुखदुःखावर या आघातांचा कोणता परिणाम झाला होता हें मलाहि ठाऊक नव्हतें. यमू कदाचित् सुखीहि असेल... आणि तरीहि मी तिच्या आजच्या स्थितीनें दुःखी होत होतों, आणि याचाच अर्थ यमूच्या मनाप्रमाणेंच शरीरावरहि मी नकळत कांहीं हक्क सांगत होतों हें माझें मलाहि माहीत नव्हतें.

ज्याला कामुक प्रेम म्हणतात तें मला यमूविषयीं कधींहि वाटलें नव्हतें, अशी माझी समजूत अद्यापिहि आहे. मग यमूनें शरीरार्पण केलें किंवा यमूच्या मुग्ध लावण्यराशींत संसारवायूनें विकृत वीचि उत्पन्न केल्या तर त्यानें माझ्या हृदयसागरांत वादळ कां व्हावें?... यमूच्या वाढत्या वयांतील अनेक हास्यविनोदाचे प्रसंग माझ्या डोळ्यांपुढें येऊन गेले. तिच्या–माझ्या स्नेहाला कामचेष्टांचा संपर्क न व्हावा याविषयींची माझी दक्षता आणि फाजील दक्षता म्हणजेहि कामुकतेचीच कबूली याची जाणीव देण्याकरितां व्रात्य यमूनें केलेले बालिश अतिप्रसंग,... यांच्या अनेक आठवणी माझ्या सुप्त मनास जागृत करूं लागल्या! मला आठवूं लागलें कीं, यमूचा लाघवीपणाहि माझ्या लाजाळूपणाहून अधिक निर्लेप व निष्पाप असे!

पण मी आज चित्रगुप्तापुढें जाब द्यावयास उभा नाहीं व पापपुण्याचीहि मी यमूच्या सुखापुढें कदर ठेवीत नाहीं. यमूचें सुख हेंच माझ्या संवेदनांचें उगमस्थान आणि सुखदुःखाचें कारण. यमूच्या रम्य तनुलतिकेच्या दर्शनानें किंवा स्पर्शनानें मला सुख झालें होतें कीं नाहीं? हा प्रश्न मी उगीच वेड्यासारखा छेडीत होतों. आजचा प्रश्न यमूच्या शरीरानें मी सुखी कां व्हावें हा नसून दुःखी कां व्हावें, हा होता.

आज यमूच्या दुःखानेंच मला दुःख होत होतें काय? होय! यमूच्या सुखदुःखाशीं मी इतका एकरूप झालों होतों कीं, मला न कळतां यमूला सुख होणारच नाहीं—ज्यांत मी समभागी नाहीं असें यमूचें सुखच असूं शकणार नाहीं असें मला वाटत होतें. उलट, यमूचें शरीर पाहून मला व्यथा होत आहे तर यमूच्याहि मनास तिच्या शरीरार्पणानें व्यथा झाली असली पाहिजे असेंहि मला वाटूं लागलें.

यमूचा आनंद व यमूच्या आकांक्षा माझ्या इतक्या परिचयाच्या होत्या कीं, मला नकळत तिचें मन व शरीर एखाद्या मोठ्या स्थित्यंतराचें वांटेकरी व्हावें हें मला शक्यच वाटेना; कीं यमू दुसऱ्याची झाली म्हणून माझ्या गुप्त प्रेमाला आज धक्का बसत होता? नाहीं! यमू स्वतः तर पूर्वींप्रमाणेंच स्वतंत्र, निर्भय आणि अभंग दिसत नव्हती काय? पण मला यमूचें हें आत्मार्पण प्राचीन रजपुत कन्यांनीं स्वजनांच्या दुःखनिवारणार्थ केलेल्या आत्मबलिदानासारखें वाटत होतें. तिच्या त्या एकच क्षण झालेल्या भेटींत मला तिचें म्लान धैर्य आणि निर्वाणीचें हास्य दिसून आल्याचें आठवलें आणि तिच्या शरीरांतील स्थित्यंतरहि मला यवनाक्रान्त हिंदभूच्या अतिक्रान्त शरीराप्रमाणें वाटूं लागलें.

यमूच्या शरीरापासून सुखाचा अभिलाष माझ्या निर्मळ मनानें केला नव्हता. तरी यमूच्या शरीराचें स्वातंत्र्य नष्ट झाल्याचें न कळण्याइतकें मात्र माझें मन अलिप्त नव्हतें हें खोटें नाहीं. ज्या स्वच्छ व स्वच्छन्द जीवन-प्रवाहांचें अवलोकन माझ्या मनानें केलें होतें त्यापासून मी अलिप्त असलों तरी तो प्रवाह गढूळ झाला आहे, हें न समजण्याइतका मी अलिप्त नव्हतों. तो स्वतंत्र, रम्य प्रवाह आज कोणत्या आडरानांत शिरला? त्या स्फटिकवत् ओघांत आज कोणता गढूळ रंग दिसूं लागला? या प्रश्नांनीं माझें मन व्यथित झालें.

माझी यमू शरीराप्रमाणें मनानेंहि बदलली नसेल, तर अद्यापहि माझ्या शंकांचें निरसन करील.

१२

तुमहीने दर्द दिया और तुमही दवा देना—

माझ्या मनांतील काहुराला एकान्त, पूर्वस्मृति अथवा पुस्तकें यांपैकीं कोणीच उत्तर देऊं शकत नव्हतें. आणि ज्ञान व तत्त्वज्ञान यांनीं हात टेकले कीं, यमूचें अज्ञानच त्याला वाट दाखवूं शकतें हा माझा आजवरचा अनुभव होता. पण आज यमू हेंच कूट आणि यमू हेंच उत्तर; यमू हीच व्यथा आणि यमू हाच उपचार; यमू हेंच गांव आणि यमू हीच वाट अशी माझी स्थिति होती. आणि म्हणूनच यमू हीच भीति व यमू हीच आशा अशीहि माझी दशा झाली होती.

मागील क्षणिक दर्शनानंतर कित्येक–आठवडे–महिनेहि लोटले होते ! यमूचे बरेच निरोप येऊनहि मी यमूकडे जाण्याचें टाळीत होतों; पण यापुढें शिष्टाचार म्हणून तरी मला ही टाळाटाळ बंद करणें जरूर होतें. आषाढ संपून श्रावण सुरू झाला होता; संपत आला होता. ही मंगळागौर होतांच यमू फिरून सासरीं जाणार होती व म्हणून तिचे विशेष निकडीचे निरोप येत होते. मागल्याप्रमाणेंच आज मी बऱ्याच उशीरां फिरावयास निघालों होतों आणि मागल्याप्रमाणें–

किंबहुना नेहमींप्रमाणें– यमूवरच विचार करीत होतों. एवढ्यांत मनांतील अमूर्त यमूशीं चाललेला माझा मूक संवाद प्रत्यक्ष सृष्टींतील यमूचे निकडीचे निरोप आठवून मध्येंच तुटला. मला आठवलें कीं, आज मंगळवार आहे. हाच तो मंगळवार! आजची मंगळागौर होतांच यमू सासरीं जाणार. आज भेट टाळणें म्हणजे अजिबात भेटच टाळल्यासारखें होईल!

यमूच्या घरीं जमणाऱ्या आप्तेष्ट स्त्री-पुरुषांची गर्दी टळावी म्हणून मी बऱ्याच उशीरां यमूच्या घराकडे वळलों. मला फराळ वगैरेची इच्छा नव्हती व नाइलाज होऊन त्याहि सोहळ्यांत सापडलोंच तर निदान एकटा सापडावा म्हणून सर्वांचे फराळ उरकले असतील इतपत उशीरां निघालों. यमूच्या घरानजीक पोंहोचतांच माझी योजना सफल होत असल्याचें पाहून मला समाधान वाटूं लागलें. यमूच्या घरीं मंडळींची गर्दी नाहींसें पाहून फराळाचा सोहळा टळून गेला असें मी मनांत समजलों व निर्धास्तपणें घरांत प्रवेश करता झालों. मी परस्पर बाहेरच्या जिन्यानें यमूच्या माडीवर दाखल झालों. घरांत सर्वत्र शांतता दिसत होती. यमूच्या खोलींतहि मला फारसा फरक दिसला नाहीं. पुस्तकांची जागा मात्र आतां कपडे, फोटो, वगैरेंनीं घेतली होती. यमूचा लग्नापूर्वीचा फोटो अद्यापहि पूर्वीच्या जागीं होता हें पाहून यमू येईपर्यंत तरी माझी अस्थिरता कमी झाली. मधून यमूचीं पोरकीं पुस्तकें चाळींत–तर मधूनमधून, यमूच्या जुन्या फोटोकडे पर्याकुलपणें नजर टाकीत मी यमूची वाट पाहात बसलों होतों. वस्तुतः आज यमूनें वर येण्यापेक्षां मी खालीं जाणेंच युक्त होतें; तरी झालेल्या स्थित्यंतरांत मी सामीलच नव्हतों म्हटलें तरी चालेल.

थोड्या वेळानें यमूचीं पावलें, पूर्वींच्याच अनिरुद्ध आवेगानें जिन्यावर वाजूं लागलेलीं पाहून मला माझ्याच अस्थिरतेची व भीतिग्रस्ततेची

लाज वाटली. क्षणभर पूर्वीचेच दिवस परतल्याची समजूत करून घेऊन मी क्षणिक उत्साहानें सावरून बसलों.

" मंगळागौरीला आला नाहींत ? "—यमू रागापेक्षां क्षमेच्याच स्वरांत विचारती झाली.

मी थोडा बुचकळ्यांत पडलों. थोडा उशीर झाला असला तरी मी मंगळागौरीलाच आलों होतों अशी माझी समजूत होती. म्हणून मीं हसून म्हटलें, " कां ? आलों आहे ना ?...थोडा उशीर झाला असेल ! "

" थोडा कां ? बराच उशीर झाला ! " यमू हसत होती व हसण्यास तिला मजप्रमाणें प्रयासहि पडत नव्हते—" तुम्हांला चांगला एक आठवडा उशीर झाला आहे ! "

मी आश्चर्यचकित झालों व यमूचे निरोप आठवूं लागलों. अखेर वस्तुस्थिति अशी आढळून आली कीं, मी आलों त्याच्या आधींच्या मंगळवारीं यमूची मंगळागौर होती व आलों त्या दिवशीं यमू आपल्या मैत्रिणीकडे मंगळागौर जागविण्यास चाललेली होती ! माझ्या औदासीन्याची व भीतीची जागा विस्मयानें व लज्जेनें घेतल्यामुळें माझी थोडी सोयच झाली म्हटलें तरी चालेल.

" इंदूकडेच जायचें आहे; उशीर झाला तरी चालेल ! " असें म्हणून यमूनें माझी उडालेली तारांबळ थोडी कमी केली. औपचारिक प्रश्न व फराळाचा आग्रह वगैरे संपल्यावर आमच्या खऱ्या बोलण्यास सुरुवात झाली.

माझी तारांबळ केवळ विसरभोळेपणामुळें व भलत्याच वेळीं आल्यामुळें उडाली नसून तिचीं कारणें फार खोल आहेत हें यमूच्या लक्षांत न येणें अशक्यच होतें. किंबहुना माझ्या अन्तरंगांतील गोंधळामुळेंच हा बाह्यवर्तनांतील गोंधळ उडाला होता, हें ती जाणून होती. तसेंच माझी मानसिक अस्वस्थता म्हणजे मूळची माझी नसून

यमूच्या सुखदुःखाचाच ती परिणाम होती हेंहि तिला पूर्ण अवगत होतें आणि तरीहि रेग्याहून डॉक्टर विव्हळ, अशी आजची स्थिति जाणून यमूच्या जात्याच खोडकर मनास थोडी मौजहि वाटत होती. कदाचित् तिचें दुःख, स्वतःचें व अधिक नजिकचें असलें तरी आतां शिळें झालें होतें व माझें कल्पनेचें, विचाराचें—केवळ दुसऱ्याचें असलें, तरी अद्याप ताजें होतें. तिचें दुःख, भोगून परिचयाचें झालें होतें, तर माझें अपरिचयामुळेंच असह्य वाटत होतें. कसेंहि असो, जिच्या दुःखानें मी दुःखी होतों, ती आजहि मजहून सुखी होती—निदान हसतमुख होती.

आणि म्हणूनच तिच्या नूतन स्थितीविषयींचें माझें कुतूहल अधिकच वाढलें होतें. आजच्या कोणत्याहि आतिथ्यांत अथवा उपचारांत माझें चित्त नाहीं, हें यमूच्या केव्हांच लक्षांत आलें होतें. तथापि ज्या दुःखावर तिनें केव्हांच विजय मिळविला होता त्याला आजच्या रात्रीं प्रधानस्थान देण्यास ती मुळींच तयार नव्हती. उलट, जें पूर्वींहि... होय! त्या गेलेल्या रम्य दिवसांतहि! —आम्हां दोघांमध्यें कृष्ण-मेघांप्रमाणें आडवें येई— व जें आज तर आडून एकान्त ऐकणाऱ्या वैऱ्याप्रमाणें आम्हां दोघांच्याहि पाठीशींच उभें होतें, तें अवगुंठित अन्तःशल्य बाजूला केल्याखेरीज हसणेंच काय पण मोकळेपणानें रडणें-देखील मला अशक्य होतें.

आणि मला आतां मोकळेपणानें रडणेंच हवें होतें. आतां मी तेवढ्या-करितांच यमूकडे आलों होतों. नाहीं तर माझ्या यमूचें आतां, काय अवशेष उरलें होतें ?

होय! हाच तो प्रश्न कीं जो जिव्हेच्या अग्रावरहि होता आणि हृदयाच्या गाभाऱ्यांत लाख पडद्याआडहि होता, आतां यमूचें अवशेष काय उरलें होतें ?... जें उरलें होतें त्याला यमू हें नांव देतां येईल काय?... जें विरून गेलें होतें त्यानंतरहि यमू यमूच राहिली काय?...

माझ्या मनाच्या कोपऱ्यांतील सूक्ष्म स्पंदनाहि अनुभवणारी यमू माझ्या अन्तरंगांत उठलेल्या या दुर्दम्य वादळांतून कोरडी राहील हें शक्यच नव्हतें. तिचें हृदय दुःखाच्या लाटेनें गारद केलें होतें. पण शरीर भिजूं न देण्याची तिनें शिताफी चालविली होती. कितीहि क्षोभ झाला तरी अश्रूंना वाट न देण्याची तिची ती एक नेहमींची तऱ्हा होती आणि म्हणूनच उभयतांच्याहि ओठांवर असलेली गोष्ट अखेर मलाच उच्चारावी लागणार होती.

पण हा उद्गार सोपा नव्हता. मोठ्या सुखाप्रमाणेंच मोठ्या दुःखाला शब्दरूप उद्गार देणें सोपें नसतें. पण हें केवळ दुःख असतें तर मी शब्दांच्या फंदांत पडतोंच ना? दुःखाला परमेश्वरानें खास निष्कंटक अशी द्रवरूप वाट करून ठेवलेली आहे; पण हें दुःखहि होतें आणि कूटहि होतें; म्हणूनच शब्दांनीं वाट केल्याखेरीज अश्रूहि बाहेर येणें कठीण होतें.

पण, म्हणजे या शल्यरूप कूटाला साजेसे शब्द सापडणें सोपें होतें असें मात्र नव्हे! ...

"यमू! ..." अपरिहार्य पण असह्य अशा निःशब्दतेनंतर मीं ह्रा एकच शब्द उच्चारला! आणि तो एकच शब्द या वेळचें अपूर्व व असह्य हृद्गत व्यक्त करूं शकणार होता. वेदान्ताच्या अद्वैतांत सर्व शब्द अपुरे म्हणूनच ॐकारासारख्या एखाद्याच—बाह्यतः अर्थशून्य शब्दास महान् अर्थ प्राप्त होतो; तसा आमच्या निःशब्द स्थितींतहि एक द्वाक्षरी शब्दच प्रणवाप्रमाणें प्रभावी ठरत असे. तो म्हणजे......

"य–मू!"—

हा आमच्या प्रेमाच्या अद्वैतांतील ओंकार किती गूढ आणि किती विविध अर्थांचा वाहक होता! आनंद व दुःख, संतोष व रोष, जिज्ञासा व प्रत्यभिज्ञा, फार काय—प्रश्न आणि उत्तर या सर्वांचेंच कार्य करण्यास हीं दोन मंत्राक्षरें पुरेशीं ठरत.

आणि आजहि त्यांनीं आपलें कार्य केलें. आतांपावेतों माझ्या सर्वव्यापी दुःखाला आपल्या विजयी दरबारांत प्रवेशच न देणारी यमू क्षणांत माझ्या दुःखसाम्राज्यांत सामील झाली. विजयी मुद्रेची कृत्रिम तटबंदी तिनें जणूं आपल्या हातांनींच पाडून टाकली; आणि या तटबंदीपलीकडील वाताहतीच्या दृश्यांतच माझ्या प्रश्नाचें निम्में उत्तर, शब्द न उच्चारतांच मिळालें.

होय ! यमूहि दुःखी होती. केवळ माझ्या दुःखातिरेकामुळें नव्हे, तर यमूच्या विजयोत्साहादि मूळप्रकृतीच्या अस्तामुळेंच— ती दुःखी होती. म्हणजेच पूर्वीची यमू अवशेष नव्हती. कारण आनंद नाहीं तर यमू कसची ? विजय नाहीं तेथें यमू नाहीं... आणि यमू आहे तेथें विजय आणि उत्साह मूर्तिमंत आहेत. यमूहि इतर चार मुलींप्रमाणें या गढूळ जीवनांत रुळेल काय ? ...रमेल काय ? ...हें शक्य आहे काय ?... या मला त्रस्त करणाऱ्या प्रश्नांचें उत्तर मला यमूच्या केवळ निःश्वासानेंच मिळालें.

आणि या उत्तरानेंच यमू यांतूनहि अवशेष आहे हें सिद्ध केलें. होय ! सामान्य स्त्रियांप्रमाणें वाटेल त्या प्रवाहांत समाविष्ट झाली— दिलेल्या जीवनांत रमली, वाढलेल्या अन्नाची वांटेकरी झाली, तर माझी यमू कुठें राहिली ?...आतां तिच्या दुःखी होण्यामुळेंच ती— ती माझी यमू— अद्यापहि शिल्लक आहे हें प्रतीत होऊन मला दुःखांतहि सुख वाटलें !

...प्रिय वस्तु सुखी असणें म्हणजे परमसुख होय... प्रिय वस्तु दुःखी असणें म्हणजे परमदुःख होय !

पण प्रिय वस्तूच्या परम दुःखापलीकडेहि एक दुःख असतें आणि तें म्हणजे ती वस्तु नष्ट होणें !

आणि ज्या स्थितींत दुःख व्हावें तींत सुख होणें म्हणजेच नष्ट होणें........आणि या अर्थानें माझी यमू अवशिष्ट आहे कीं पूर्ण

नष्ट झाली हाच तो हृदयस्फोट करणारा अस्फुट प्रश्न—हाच तो प्रश्न, कीं जो माझ्या देवतेच्या देवालयाकडे माझे पाय आज कित्येक आठवडे वळूं देत नव्हता—हाच तो प्रश्न—कीं जो मला सहस्र शल्यांप्रमाणें व्यथित करीत होता. हाच तो प्रश्न कीं जो उद्गारण्यास अखिल शब्द-भांडार मला अपुरें पडत होतें. हाच तो प्रश्न, कीं जो माझ्या चर्येच्या रेषेरेषेंत त्या दिवशीं लिहिलेला दिसता. आणि हाच तो प्रश्न, कीं ज्याचा 'य-मू' या दोन सर्वार्थवाचक मंत्राक्षरांनीं स्फोट केला!

होय! अनंत संस्कार, रूढि, संस्था, नियम, आदींच्या तटांनीं बद्ध अशा समाजरूपी तटिनीच्या गढूळ प्रवाहांतूनहि वर डोकें काढणारी अशी ती माझी यमूच होती. ती अद्याप यमूहि होती आणि कदाचित् अद्याप माझीहि होती!...

क्षमस्व!... मी माझे विचार प्रामाणिकपणें, ईश्वरसाक्ष मनांत आले तसे निवेदन करीत आहे.

१३

"You think women, women like me, are happy because you see us laugh. But to laugh is our trade. We are paid for that.

And I swear to you, often we ask nothing better than just to sit and cry.

And you talk of *choosing* ! you poor child. Do you suppose we women *choose* ?

—*M. Brieux*

यमूनें माझा प्रश्न, माझी मनःस्थिति, फार काय– गेल्या कित्येक महिन्यांतील माझ्या मनांतील खळबळ एका क्षणांत ओळखली होती. पूर्वींहि ती तिच्या लक्षांत आली नसेल असें नांहीं; पण तिनें आपल्या कठोर निग्रहाच्या तटावर त्या सर्व खळबळींचे आघात सहन केले होते. आज मात्र माझा अधिक कोंडमारा होऊं नये म्हणूनच कीं काय, माझ्या अंतःसागराच्या लाटांना तिनें आपल्या अंतरंगांत वाट करून दिलेली होती.

मुलाला बराच वेळ घरीं ठेवून गेलेली आई घरीं परत येतांच इतरांस मुलाचा फक्त आकांत डोळ्यांपुढें दिसतो; पण आईला त्याच्या आकांताचीं अनेक कारणें एकदम लक्षांत येतात व त्यांपैकीं प्रथम कोणत्याचें निराकरण करणें तें ती जात्याच ओळखते. आई बाहेर गेली, यापेक्षां 'मला टाकून गेली' हेंच त्या मूक संतापाचें कारण असतें आणि त्यांतच तें भुकेलेलेंहि असेल, रडून थकलेलेंहि असेल, आईच्या पश्चात् चालतांना पडलेंहि असेल, त्याला त्यांपैकीं कशाचीच जाणीव नसेल; पण "आई मला टाकून गेली" हें मात्र त्याच्या लक्षांतून जाणार नाहीं.

माझ्या मनोवेदनांचें निदानहि यमूनें हेंच केलें व एखाद्या वत्सल आईच्या उपजत बुद्धीनेंच केलें. यमूच्या दुःखानें मीं दुःखी असेन; पण मला 'टाकून' यमू दुःखी झाली... मला न दाखवतां दुःख का होईना, अनुभवतां येईल असें समजली, यानेंच मी अधिक दुःखी झालों होतों; हें क्षणांत यमूच्या लक्षांत आलें आणि म्हणूनच माझ्या वरील बोलण्याचा भार आपणांकडे घेऊन ती आपण होऊनच माझ्या मनांतील प्रश्नांचीं उत्तरें देऊं लागली.

"मी तुम्हांला फसवीत आहे अशी तुमची समजूत होणें साहजिक आहे. मी दुःखी असून सुखी आहे असा बहाणा करतें असें तुम्हांला वाटेल. कदाचित् मी सुखी असून दुःख गिळल्याचें सोंग करीत आहें असेंहि वाटलें असेल. मी इतर मुलींप्रमाणेंच अज्ञ व अल्पमति असून आजवर तुमचें बौद्धिक रंजन करण्याकरितां सर्वज्ञतेचें सोंग केलें असेंहि तुम्हांला, माझ्या अलीकडच्या या लग्नवेषापासून वाटलें असेल. फार काय, मी इतर मुलींप्रमाणें नवरानवरीच्या खेळाला आतुर होतें व आतां त्यांतच दंग आहे असेंहि क्षणभर तुमच्या मनांत आलें असेल!

"आणि उलट आज माझ्या या सौभाग्याभरणासह लग्नचुड्याच्या

हातांनींच डोळे पुसतांना पाहून तुम्हांला मी वस्तुतः अत्यंत दुःखी असून महिन्यांत पंचवीस समारंभ साजरे करतें हा एक अघटित अभिनय वाटेल. पण या दोहोंपैकीं दोन्हीहि खोटें आहे. मी इतर मुलींप्रमाणें आईबापांनीं मांडलेल्या लग्नाच्या खेळांत रमून जाणें तर अशक्यच होतें; पण तुम्हांला कदाचित् आश्चर्य वाटेल, कदाचित् वाईट वाटेल— स्वातंत्र्याच्या माझ्या सर्व कल्पना शाबूद असूनहि मी सासर म्हणजे दुःखसागर आणि नवरा म्हणजे— नवल वाटूं देऊं नका! यमू लग्नानंतरहि इतक्या स्पष्टपणेंच बोलत असते– नवरा म्हणजे दुष्मन् असेंहि समजत नाहीं!"

यमू आपल्या वीररसाच्या भूमिकेंत होती. लग्नापूर्वीं अनेकदां तिनें आपले शहाणपणाचे शब्द मला ऐकविले होते. तिच्या शहाणपणांत शहाणपणापेक्षां शौर्यच अधिक असे आणि शहाणपण हें शौर्याचेंच पण नरम अंग आहे या इंग्रजी तत्त्वाची उलटी बाजू यमूच्या स्वभावांत दिसून येत असे. शौर्य हेंच यमूचें शहाणपण होतें. पण शौर्य आणि शहाणपण दोन्हीलाहि मी तूर्त राजी नव्हतों, हें माझ्या अधीर चर्येवरून यमूच्या लक्षांत आल्याखेरीज राहिलें नाहीं व त्याचें निराकरण तिनें तितक्याच अधीरपणें करून टाकलें.

"होय! पण माझ्या व्याख्यानांची तुम्हांला सवय असली तरी माझ्या मौनाची तितकीशी नाहीं; आणि म्हणून मला त्याचा जाब प्रथम दिला पाहिजे. लग्नाच्या वाटाघाटी चालू झाल्यापासून तों लग्नाचे छप्पन समारंभ संपेपर्यंत, जवळजवळ या घटकेपर्यंत — कारण या मंगळागौरी म्हणजे विस्मृति शोधणाऱ्या आधुनिक वधूकरितां रूढिरूप श्रुतिस्मृतींनीं घालून दिलेले लग्नाचे स्मृतिदिनच म्हटले तरी चालेल! मला कडक नैष्ठिक मौन पाळावें लागलें होतें. पण तें प्रतारणा म्हणून नव्हे, तर पथ्य म्हणूनच तुमची यमू पाळीत होती. फार काय जें नव्या किंवा जुन्या कायद्यांनाहि हिरावून घेतां येणार नाहीं, जें

रूढीला, धर्माला, फार काय धर्माच्या देवालाहि नष्ट करतां येणार नाहीं, असें विवाहित मुलींचें एकमेव रडण्याचें समाधान तेंहि मीं स्वखुषीनें झिडकारलें होतें; यामुळेंहि तुम्हांला गूढ पडलें असेल. पण इतकें कर्तव्यनिष्ठुर दिसणारे माझे आईवडील— तेंहि मी रडलें नाहीं तोंवरच शूर आहेत हें मी जाणून होतें. फार काय सासरच्या माणसांचाहि वरपक्ष, अभिमान आणि आनंद माझ्या सहकार्यावरच अवलंबून होता. सारांश, या विवाहनाटकांत राक्षसपात्र्यांप्रमाणें नाचणारीं मोठीं माणसें हीं पाठ केलेल्या नकलेचीं बाहुलीं होतीं. नकलेबाहेरचीं अक्कल अशी मजजवळच होती आणि म्हणूनच हें नाटक न बिघडूं देण्याची जबाबदारी मजवर होती. मीं तोंड किंवा डोळे उघडले असते तर या मंडळींची, हें नाटक वठविण्याची ताकद नव्हती !

" तुम्हांला आश्चर्य वाटत आहे... तुम्ही पूर्वींप्रमाणेंच मला हुशार पण वेडी, प्रेमळ पण लहरी, शूर पण गर्विष्ठ... समजत असाल; पण मी सर्व सांगेन तर मी तुम्हांला वेडी वाटणार नाहीं अशी मला खात्री आहे... मी तुम्हांला सर्व सांगूं शकेन कीं नाहीं याची मात्र मला शंका आहे... क्षमा करा...! "

यमूच्या शौर्याची, शहाणपणाची व हुशारीची मला अनेकवार कल्पना आलेली होती. अनेकप्रसंगीं ती लोकांच्या कल्पनेच्या मानानें व तिच्या वयाच्या मानानें अकल्पित पोंच व पोक्तपणा दाखवी. तरी मध्यंतरींच्या घटना तिच्या शक्तीबाहेर असल्यामुळें तिनें निमूटपणें सहन केल्या अशीच माझी कल्पना होती. पण याहि परिस्थितींत यमू आपलें समर्थन धिटाईनें करतांना पाहून मला आश्चर्य वाटलें. तूर्त तरी तिच्या नेहमींच्या धिटाईचाच तो भाग म्हणून मीं ऐकून घेत होतों.

" ज्यांच्या शब्दाप्रमाणें गेले कित्येक महिने मी पाऊल टाकीत आहे, त्यांनाच पराधीन बाहुलीं ठरविणाऱ्या मला तुम्ही शब्दशूर

म्हणून हसाल; पण हे लोक दोन्हीकडून दुबळे होते. एकीकडून त्यांस लौकिकाचें बंधन होतें, तर दुसरीकडून यमूच्या प्रेमाचें बंधन होतें. ती यमूच धीर सोडती, तर त्यांची दोहींकडून कुचंबणा झाली असती. माझें दुःख, माझा असंतोष, माझा विरोध दिसण्याचा अवकाश कीं, लग्नसमारंभास निराळ्याच समारंभाचें स्वरूप आलें असतें. सारांश, या पराधीन माणसांचा उत्साह, लौकिक, कठोरपणा, गर्व या सर्वांचीं सूत्रें–निदान कार्य बिघडविण्यापुरतीं तरी 'स्वाधीन' अशा माझ्या हातांत होतीं. तीं माणसें लौकिकाच्या आणि प्रेमाच्या यंत्रांत सापडलेलीं होतीं. लग्नविधीच्या यंत्राबाहेरून हात देणारी मींच होतें आणि म्हणूनच माझी ताकद त्यांच्याहून अधिक होती असें मी अजूनहि म्हणतें, त्याचें आश्चर्य वाटूं देऊं नका...... !

" सामर्थ्य आणि शहाणपण यांत सर्वांहून अधिक असून यमू लग्नाला तयार झाली, त्या अर्थी ती लग्नांत सुख मानीत होती कीं काय असें वाटून तुम्हांस अधिकच आश्चर्य वाटत आहे; पण तुम्हांला फक्त यमूचें लग्न दिसत आहे. यमूला अनेक मैत्रिणींचीं लग्नें दिसलीं आहेत व सर्व जगाचीं लग्नें आई-वडिलांच्या तोंडून—विशेषतः आईच्या तोंडून– ऐकावीं लागलीं आहेत.

" इतकी हुशार आणि स्वातंत्र्यप्रिय असून मीं इतक्या तावडतोब लग्नाला कशी तयार झालें याचेंच तुम्हांला आश्चर्य वाटत आहे; पण हुशारी आणि स्वातंत्र्यप्रेम यांमुळेंच माझ्यावर लग्नाचा प्रसंग इतक्या लवकर ओढवला. तुम्हांला वाटतें कीं, तुम्हीं तुमच्या यमूला सर्वांत अधिक ओळखतां; पण माझ्या आईलाहि तोच गर्व आहे आणि माझें प्रांजल मत विचाराल, तर आईला माझी ओळख तुमच्याहूनहि अधिक आहे. कारण, आईच आपलीं मुलें ओळखूं शकते........ !

" ज्या गुणांमुळें माझें तुम्हांला कौतुक वाटे, त्यामुळेंच आईला माझी भीति वाटे. ज्यामुळें तुम्हांला माझें लग्न लवकर होऊं नये असें वाटे;

त्यामुळेंच आईला तें तावडतोब व्हावें असें वाटे. तुम्हांला तुमची यमू इतर मुलींप्रमाणें नाहीं असें वाटे; आईलाहि तसेंच वाटे आणि म्हणूनच शक्य तेवढ्या लवकर तिला लग्नानें बांधून टाकावीशी वाटे!

"मी मूळचीच फार शहाणी असें तुम्ही चेष्टेनें का होईना समजतांच; पण आईनें मला अलीकडे अधिक शहाणी केली. नुसत्या गेल्या सहा महिन्यांतच तिनें मला जगाची— विशेषतः बायकांची— इतकी माहिती सांगितली कीं, तेवढया विषयांत तरी मी तुम्हांला अगदीं अज्ञान–अगदीं पोर समजूं लागलें आहे. तुम्हांला बायकांची माहिती नाहीं. इतकेंच नव्हे, तर तुमच्या यमूचीदेखील पुरती माहिती नाहीं, असें मी म्हणेन... !"

इतक्या कठीण अनुभवानंतर आणि आजच्या हृदयद्रावक भेटींतहि यमूचा बालिश बढाईखोरपणा आपला प्रभाव दाखवीत आहे हें पाहून हसावें कीं रडावें हेंच मला समजेना. कारण हे शेवटचे उद्गार तरी मी खरे समजण्यास तयारच नव्हतों.

"माझी आई अगदीं जुन्या चालीची आहे, असें तुम्ही तरी म्हणणार नाहीं आणि मला तर तिनें नव्या चालीनें चालण्यास पूर्णपणें मुभा दिलेली तुम्ही पाहातच होता. तिला मी बी. ए. झालें असतें तरी हवें होतें. इतर आमच्या नात्यापैकीं कित्येक मुली इतक्या शिकल्याहि आहेत— त्यांचीं लग्नेंहि उशिरां झालीं आहेत; पण फार शिकून कीं थोडें शिकून, उशिरां कीं लवकर, श्रीमंताशीं कीं गरीबाशीं, पण मुलींनीं स्वतः शाहण्या होण्यापूर्वीं लग्न करावें हाच माझ्या आईकडून मला कळलेल्या शहाणपणाचा इत्यर्थ होय!

"हा शहाणपणा मला पटविण्याकरितां मला तिनें इतक्या वेड्या मुलींच्या गोष्टी पटविल्या कीं, मी त्या ऐकूनच वेडी होईनसें मला वाटूं लागलें. निदान मला एवढें तरी पटलें कीं, मी शहाणी झाल्या-वर या मंडळींच्या मतानें लग्न करणें अशक्य आहे आणि म्हणजेच मी यांच्या अखंड दुःखाला कारण होणें शक्य आहे!"

फार मोठ्या गोष्टीला यमू चेष्टेचें स्वरूप देत आहे असें मला वाटूं लागलें.

१४

यमूनें गेल्या बऱ्याच दिवसांत घडलेल्या पण मजपासून लपविलेल्या गोष्टींचें निवेदन पुढें चालू केलें. आईनें सांगितलेल्या बहुतेक गोष्टी तिची नेहमींची अतिशयोक्ति लक्षांत घेऊनहि अगदीं खऱ्या होत्या.

"आमचे नातेवाईक ग्वाल्हेरपासून धारवाडपर्यंत पसरले आहेत. रूप, पैसा आणि निकोप प्रकृति या बाबतींत आम्ही सर्वच सारखे आहोंत. आणि त्यांतच अलीकडे स्वातंत्र्य आणि शिक्षण यांची भर पडल्यामुळें लग्नाचे सर्व तऱ्हेचे नमुने नातेवाईक आणि स्नेही येवढ्यांत मिळून आईला सहजच सापडले. नागपूर येथील काकांच्या मुलीनें शिकवणीस ठेवलेल्या मास्तराशीं लग्न केलें. नाशिकच्या मावशीची मुलगी एका जाडजूड हरदासाबरोबर पळून गेली. मुंबईचे एंजिनियर काका सुधारकी विचाराचे; तर त्यांच्या बी. ए.च्या वर्गात असलेल्या मुलीनें एका पंचेचाळीस वर्षे वयाच्या प्रोफेसरशीं प्रीतिविवाह केला. त्याला पहिलीं सहा मुलें आहेत आणि त्याची प्रीति तर एवढी दांडगी कीं, लग्नाच्या पूर्वीच त्यानें अहमदाबादच्या एका गुजराथी व्यापाऱ्याच्या मुलीला गव्हर्नेस म्हणून नोकरी आपल्या प्रीतीच्या पत्नीकरितां

पाहून ठेवली होती! आतां नवरा मुंबईत, तर बायको अहमदाबादला! असा संसार चालला आहे. तिच्याच बहिणीनें कापडाच्या एका व्यापाऱ्याशीं लग्न केलें. तुम्हांला तें प्रार्थनासमाजाजवळचें वस्त्रभांडार माहीत असेल. त्यांतील दोन आण्यांच्या पातीवर शेठ बनलेला तो रानडे त्याच्या दुकानांत जातांजातां "तो मला वाटेल तो माल नुसत्या चिठीवर पाठवतो." "पैसे हवे तेव्हां द्या म्हणतो." वगैरेचीच तिला केवढी फुशारकी वाटूं लागली. अखेर तिनें त्याच्याशीं लग्न केलें. त्याच्या बाकीच्या गुणदोषांची चर्चा करण्याचें कारणच नाहीं. कारण त्याची पहिली बायको जिवंत आहे!

"सुधारक आणि स्वातंत्र्यवादी यांच्या या कथा; तर अगदीं सरळसरळ वागणारांचेंहि सुख त्याच नमुन्याचें आहे. माझी आतेबहीण अकोल्याच्या वैद्यांची नात तुम्हीं पाहिलीच आहे! तिच्यापुढें मीदेखील रूपाचा गर्व विसरतें. तिचें लग्न मुंबईच्या एका एम्. डी. डॉक्टरशीं झालें आणि तीनच वर्षांनीं त्यानें तिला टाकली! कां, तर त्याच्या बहिणीला ती आवडत नाहीं आणि हा तर त्या विधवा बहिणीच्या मुठींत! तात्पर्य काय, कीं बायकांच्या नशिबांच्या एकएक तऱ्हा आईनें इतक्या अनंत वेळां आणि इतक्या नजीक पाहिल्या होत्या कीं, आपल्या मुलीला स्वातंत्र्य देण्यास ती कधींच तयार होणें शक्य नव्हतें!

"आईच्या प्रवचनांनीं माझ्या मनावर एवढाच परिणाम झाला कीं, आपल्या नशिबाबद्दल मला मोठीशी उमेद राहिली नाहीं. केव्हां तरी वाईटच व्हायचें; मग फार दिवस आशा पोसून नंतर तिला बळी देण्यापेक्षां आशेची बालहत्याच मीं पत्करली.

"ज्यामुळें तुमच्या मनाला धक्का बसला तें मीं अशा निर्वाणीमुळें पत्करलें आणि एकदां मन घट्ट केल्यावर माझें मन किती निष्ठुर बनतें याची तुम्हांला कल्पना आहेच!

" ज्या स्त्रिया चालीविरुद्ध जाऊन पुरुषसहवास मिळवितात त्याहि गुलामच होतात आणि ज्या चालरीत राखून लग्न करतात त्याहि गुलामच होतात; पण चालीविरुद्ध जाणाऱ्या गुलामहि होतात आणि बहिष्कृतहि होतात आणि ज्या चाल राखतात त्या एकाची गुलामगिरी पत्करून सर्वांचा लोभ राखतात. अर्थात् सर्वमान्य लग्न करणें हाच आम्हां दुर्दैवी जीवांचा सर्वांत मोठा शहाणपणा होय!

यमू आपल्या बुद्धिवैभवाच्या आतषबाजीमागें एक मोठी जखम दडवीत आहे याविषयीं मला अधिकाधिक खात्री वाटूं लागली.

" यमू! तूं लग्नाला मन घट्ट कसें केलेंस, प्रत्येक भावी वरापुढें निगरगट्टपणें कशी बसत होतीस, अंतरपाटापुढें डोळ्यांवर कातडी ओढून कशी उभी राहिलीस हें सर्व मीं पाहिलें; पण, यमू! प्रत्यक्ष वैवाहिक जीवनाचा पहिला दिवस तूं कसा सोसलास हें मला अद्यापहि कल्पनातीत वाटतें. भोंवतालच्या जगाच्या दुःखाच्या कल्पनेनें तुझें मन इतकें बधिर झालें काय, कीं पाप-पुण्य, प्रेम–भाडोत्रीपणा, सुख-दुःख, एक पुरुष आणि दुसरा पुरुष सर्व तुला सारखेंच वाटूं लागलें?...... यमू! तुझें शौर्य आणि शहाणपण, या दोन्हीचाहि अनुभव असून आणि तुझें नवीन शहाणपण आतां हेंच मीं ऐकलें असून मला तूं एका धरून आणलेल्या परपुरुषाच्या स्वाधीन गर्वस्थान असें आपलें पवित्र शरीर कसें केलेंस हें अद्यापहि गूढ वाटतें!"

१५

"लग्नाची तयारी झाली म्हणजे शरीराहुतीची तयारी झाली असें खासच नव्हे!" यमू माझें म्हणणें मान्य करून म्हणाली, "किंबहुना लग्न पत्करलें, तरी त्या सर्वस्वीं परक्या पण निःशंकपणें मजवर हक्क सांगणाऱ्या वरपक्षीय घरांत मला प्रथम इतकें असह्य वाटे कीं, कदाचित् मी वेडी होईन अशीहि भीति वाटे. तेथील सर्वांच्याच, आणि विशेषतः बायकांच्या दृष्टींत मला इतका किळसवाणा भाव दिसे कीं, वाईट कामाकरितां मुली विकत आणण्याच्या खटल्यांचीं वर्णनें मला आठवत. हिला अमुक कामाकरितां आणली आहे व तें आतां शक्य तेवढ्या लवकर उरकण्यास हिला पढवावयाची हाच त्यांच्या एकंदर कार्यक्रमांचा इत्यर्थ होता.

"पण या सर्व भाडोत्री साधनांवर अवलंबून असलेल्या वराची तर मला कींवच आली. दुसऱ्यांनीं अडवून मारून जेर केलेल्या जनावरावर निशाणबाजी करण्यांत मर्दुमकी समजणाऱ्या त्या अज्ञान वीराला निदान खऱ्या शौर्याची जाणीव द्यावी असें अर्थातच मीं मनांत ठरविलें. फार काय, या सूडाच्या बुद्धीमुळेंच ज्याचें मला दर्शनहि नको होतें त्याच्या एकान्ताची मी वाट पाहूं लागलें!

" मी सासरीं पोंहोचल्यापासून तिसऱ्याच दिवशीं घरांतील पोक्त बायकांच्या चर्येवरून मला आज कांहीं विशेष घडणार असें दिसूं लागलें. त्यांनीं जेवणानंतर दुपारीं मला पाण्याचा तांब्या घेऊन माडीवर त्यांच्या खोलींत धाडलें. ते खुर्चीवर बसले होते. मी त्यांच्या जवळच्या टेबलावर तांब्या ठेवण्याऐवजीं दाराजवळच्याच खिडकींत ठेवला आणि खिडकींतून बाहेर पाहत उभी राहिलें. चुकून माझी दृष्टि समोरच्या मोठ्या आरशाकडे गेली; तर माझ्या चेहऱ्यावरील निर्वाणी निश्चय, आणि धिक्कार पाहून माझी मलाच भीति वाटली. मी कदाचित् भलतेंसलतें बोलेन; असें कांहीं बोलेन, कीं त्यामुळें एवढ्या विधिपूर्वक आणि समारंभपूर्वक केलेल्या लग्नाचें जणूं विसर्जनच होईल असें मला वाटूं लागलें. शिवाय ही दुपारची वेळ, एखाद्या ताबेदार कोवळ्या पोरीचें कौमार्य विच्छिन्न करण्यास सोईची असली तरी, रूढीच्या दोरीनेंच स्वर्गाला टेकलेल्या धनिक बाळाच्या डोळ्यांत अंजन घालण्यास सोईची नव्हती. मधेंच कांहीं व्यत्यय आल्यास मला माझ्या शिकारीला जीवदान द्यावें लागलें असतें. उलट त्या अजाण शिकाऱ्यास सध्यां मुभा देऊन आपलें श्वापद किती तापट आहे याची कल्पना आली तरी तूर्त मला पुरे होती. या सर्व विचारांत सूडभावहि होता व कर्तबगारीची घमेंडहि होती. माझ्यांतील गर्वाचा भाग कधीं कधीं जणूं वासनेचें रूप धारण करतो. नूतन पतीच्या एकान्तांत जाऊन पोंहोचलेल्या तरुणीचीं अखिल गात्रें कामविकारानें जशीं भरून यावींत तशी मी दर्पानें भरून गेलें होतें. आणि त्याच धुंदींत मीं त्यांच्याकडे एकवार बघितलें मात्र !—कीं, भीतीनें दबलेले त्यांचे विकार एकदम उत्तेजित झाले आणि ज्याला मला हाक मारण्याचीहि प्राज्ञा नव्हती तो खुर्चीवरून उठून मजकडे येऊं लागला !

" तुम्हांला, मीं मन घट्ट कसें केलें हें सविस्तर सांगितलें तरी हे प्रकार सांगण्याचें खरेंच माझ्या मनांत नव्हतें; पण वाईट गोष्टी

प्रत्यक्ष घडत असल्यावर त्या सांगण्यांतच अधिक वाईट तें काय ? आतां यमूचा जन्म वाईट गोष्टी करण्याकरितांच आणि त्या निर्लज्जपणें सांगण्याकरितांच आहे. नका माझ्या पावित्र्याचीं वर्णनें करूं ! माझें पावित्र्य भोगून भोग्य झालें आणि माझा अभिमान जळून जाऊन सूडभावनेचा समंध बनला ! आतां मी माझ्या भीषण भावना आणि किळसवाणे अनुभव कशाला लपवूं ?

"ते जवळ येत आहेतसें पाहतांच मीं त्यांच्याकडे तोंड फिरवलें व स्तब्ध उभी राहिलें. ते मजपर्यंत आले. त्यांच्या चर्येवरून असें दिसत होतें कीं, त्यांना माझ्या तोंडापाशीं आपलें तोंड आणावयाचें आहे; पण माझी त्यांना अद्यापि भीति वाटत होती. त्यांनीं माझा हात धरला. तो इतका निर्जीव झाला होता कीं, जर ते शुद्धीवर असते तर त्यांना आपण एखादें लाकूड तर हातांत घेतलें नाहीं ना असें वाटलें असतें !

"बसणार नाहींस का ?" असें तें कामुक लाचारीनें व घाबरलेल्या आणि ओशाळलेल्या आवाजानें म्हणाले.

"उभी आहे तीच ठीक आहे. बसायचें तर आहेच !"

मी असें बोलेन व तेंहि अशा स्वरांत बोलेन अशी त्यांना माझ्या तुच्छतादर्शक चर्येवरूनहि कल्पना आली नव्हती असें दिसलें. माझा हात त्यांच्या हातांतून आपोआप गळाला. आतां मी निसटेन असें वाटूनच कीं काय, ते मजपासून दूर पण माझ्या जाण्याच्या वाटेंत उभे राहिले. पळण्याचें मला तरी कारण नाहीं असें दाखविण्या-करितांच कीं काय, मी पण खिडकींतच, बसलें व बाहेर पाहात तुमच्या तोंडून अनेकदां ऐकलेली टिळकांची कविता गुणगुणूं लागलें—

"हा एक कक्षेंत छावा गजाचा दुर्जींमाजिं हा सिंह केंकावतो ! ।
हा जाहला अर्धमेला भयानें लपोनी महाव्याघ्र डोकावतो ॥
हे पर्वतांचे उभे क्षुद्र धोंडे, महासागरांचें पुढें पल्वल ।
बोला हवें तें मला काय त्याचें ? पुरें जाणतों मीच माझें बल ॥"

यांतील वीरश्रीचे शब्द बाहेर उमटत नसले तरी, नुसते सूरच माझ्या मनांतील तुच्छता व्यक्त करण्यास पुरेसे होते.

सुमारें अर्ध्या मिनिटांत तेच खालीं गेले. मला हसूं आलें. मीहि दुसऱ्या जिन्यानें खालीं जाऊन जावेच्या लहान मुलाला जवळ घेऊन झोपाळ्यावर बसून मोठमोठ्यानें गाणें म्हणूं लागलें.

“ या माझ्या पहिल्याच चकमकीचा त्यांच्यावर काय परिणाम झाला, मला माहीत नाहीं; पण मला मात्र रात्रीच्या न टळणाऱ्या प्रसंगा-करितां धैर्य आलें. मी तुम्हांला नेहमीं “ मी मोठी आहें, मला सर्व कांहीं कळतें ! ” म्हणून म्हणत असे; पण मला कळणारीहि गोष्ट अप्रिय असल्यास तिच्यावर मला पुरता विचारच करतां येत नसे. मी कोणी पाहायला आलें म्हणजे मन घट्ट करून पुढें बसें; पण पाहण्या-पुरतीच. कारण, त्यामुळें त्याच्यापुढें ठरलेलेंच जें लग्नाला उभें राहणें तें ठाऊक असूनहि मला त्याची कल्पना येत असे असें मात्र नव्हे. किंबहुना वधूपरीक्षेला बसूनहि लग्नाला मात्र उभें न राहणें शक्य आहे अशी मला अंधुक आशा वाटे. तसेंच सकाळच्या अतिप्रसंगाचा अर्थ न कळण्याइतकी मी लहान होतें असें नव्हे; पण त्यावरून त्याच्यापुढच्या प्रसंगाची खात्री मात्र अद्यापि माझी मलाच करून देतां येत नव्हती.

अखेर दिवस संपला आणि सायंकाळ झाली. दिवसभरांतहि घरांतील पोक्त बायकांची वर्तणूक माझ्याशीं थोडी बदलली होती. मी दुपारीं “ तशीच ” आलें—छे !... माझ्या आधीं तेच खालीं आले. याचा अर्थ त्यांच्या ध्यानांत आला होता. मी कांहीं कुरूप नव्हतें; तेव्हां त्याचा अर्थ एकच होत होता. “ एवढ्या मुली ! यांना केस फिरवायचे समजतात, रस्त्यांत हसायचें समजतें; पण घरांत यांच्या कपाळाला आठ्या ! ” असें सासूबाईंनीं म्हणतांच घरांतील पिढीजात

मोलकरणीनें एक घाणेरडी म्हण म्हटली. ती ऐकून मला तिच्या वाकड्या कमरेंत लाथ घालावीशी वाटली.

"रात्रीं जेवण होतांच घरांतील वातावरण पुनः कुंद झालें. विशेष जहांबाज नसलेली मंडळीदेखील कांहीं तरी बेत करीत होती; कशाची तरी वाट पाहत होती असें दिसलें. अखेर माझ्या विधवा आतेसासूनें मला लुगडें बदलायला सांगितलें. नंतर एवढ्यावरून सगळें कळा-वयाला हवें होतें असें दर्शवून, किंचित् चिडून त्या म्हणाल्या, "केसबीस काय तेवढे बाहेर जातांनाच फिरवायचे वाटतं?"

"मी कांहींच बोललें नाहीं. लगेच त्यांनीं मला मसाल्याच्या दुधाचें भांडें व पाण्याचा तांब्या घेऊन वर जाण्यास फर्माविलें. मला वर जाण्याची किळस वाटत होती; पण खालीं तें किळसवाणें काम जमवून आणण्याचा मक्ता घेतलेल्या या भाडोत्री बायकांच्या थोबाडां-ची तर मला त्याहूनहि किळस आली होती. मी तीं दोन्ही भांडीं घेऊन तडक वर निघालें. त्यामुळें आपलें बोलणें प्रभावी ठरलें असें समजूनच कीं काय, माझी आतेसासू स्वतःच फणी घेऊन मजकडे आली; व माझ्या केसांवरून फणी फिरवीत म्हणाली, "हं, असंच समजुतीनं वागावं. तूं कांहीं वेडी नाहींस. तुला सगळं समजतं!" असें म्हणून नव्याला हसणाऱ्या त्या म्हातारीनें माझ्या कानांवर केसांचे फुगे काढले! मला त्याचें त्या किळसवाण्या वेळींहि हसूं आलें आणि त्यामुळें तर त्या म्हातारीला अखेर धाकाधाकानेंच मी खुषींत आलें असें वाटलें!"

१६

अबलाजीवन ! हाय तुम्हारी यही कहाँनी ।
आँचलमें है दूध और आखों मे पानी ! ॥

" मी वर गेलें. खोलीचें दार उघडेंच होतें. मीं भांडीं खिडकींत ठेवलीं. दारांत त्यांच्या लांबरुंद पुरुषी वाहाणा होत्या. त्यांकडे कशानें कोण जाणे, माझें लक्ष गेलें. त्यांची व माझ्या नाजुक बुटांची व कोवळ्या गोऱ्यापान पायांची तुलना मनांत केली गेली असेल. क्षणभर मला माझ्या नाजुक पायांना कुणा पुरुषाचे राठ पाय चिकटले आहेतसेंहि वाटलें व अंधारांत पायाला कांहीं ओलसर ओंगळ प्राणी चिकटावा त्याप्रमाणें मीं माझा पाय झाडला !

" त्यांना कदाचित् दुपारच्या प्रकारानंतर मी लगेच त्याच दिवशीं वर आलें याचें नवल वाटलें असावें. पण सकाळच्याइतका आत्मविश्वास तरी त्यांस वाटत नव्हता. तेवढयांत मी अस्थिर होऊन पाय झाडतांच त्यांनीं तेवढेंच निमित्त करून " काय? काय झालें ?" म्हणून विचारलें. मी शांतपणें " कांहीं नाहीं " म्हणून स्वस्थ उभीं राहिलें. " आतां तरी इकडे येणार का ?" असें त्यांनीं एकदोन

मिनिटें स्तब्ध राहून थोडें वैतागूनच विचारलें. मी कांहीं न बोलतांच पलंगाशेजारीं खुर्ची ओढून घेऊन धड खालीं नाहीं, धड त्यांच्याकडे नाहीं असें कुठें तरी अधांतरीं पाहत बसलें. थोडा वेळ असाच गेल्यावर त्यांनीं जें धोरण स्वीकारलें तें पाहून मला थोडें बरें वाटलें. त्यांनीं शांतपणें, जणूं आम्ही एकमेकांच्या कुशलसमाचारार्थंच आलों होतों अशा भूमिकेवरून, माझ्याशीं बोलावयास सुरुवात केली. मला जवळजवळ त्यांची कींवच आली. त्यांचा तरी काय दोष ! माझ्या मनाला धक्का बसून, भावनांना जखम होऊन का होईना, मी शहाणी झालें होतें व रूढ गोष्टींकडे डोळे उघडून पाहूं लागलें होतें; पण हा श्रीमंताचा गोरागोमटा मुलगा कॉलेजांतून बाहेर पडला आणि हुंड्याच्या राशीवर अन्तर्पाटापुढें उभा राहिला. त्याला स्त्री-हृदय आणि त्यांतून तुम्हीं शहाण्या केलेल्या यमूचें हृदय कसें कळावें ? ते आपलें—तुम्हीं तें फ्रेंच नाटक वाचतांना काय म्हणालांत तसें Marital Rights (वैवाहिक हक्क) बजावूं लागले. त्यांचा काय दोष ? नसेल दोष, पण म्हणून मी माझ्या सबंध जन्माची दिशा त्यांच्या अज्ञानी हाकेसरशी बदलूं काय ?... ते बोलूं लागले याचा मला फार आनंद झाला. मला तेंच हवें होतें. मला त्यांचें तरी थोडें ऐकायचेंच होतें आणि माझें तर त्यांना ऐकावें लागणारच होतें !

"तुझ्या मनांत कधीं लग्न करायचें होतें ?"...

पहिल्या प्रश्नावरून त्यांना न बोलतांच बरेंच ध्यानांत आल्याचें पाहून मला फार समाधान वाटलें. शिवाय किळसवाणे अतिप्रसंग तूर्त तरी टळल्यामुळेंहि माझा चेहरा हळूहळू फुलूं लागला होता. पण खरें सांगूं तुम्हांला, पहिल्याच भेटींत मला —यमूला— 'तुला' म्हणूं जाणाऱ्या त्या श्रीमंत नवरदेवाचा मला राग येण्याऐवजी कींव आली. जी गोष्ट हिमतीनें हृदयाचें मोल म्हणून मिळवायची, ती अशी

आयती—आणि पुरुषाच्या जन्माला येऊन हे घेतात तरी कशी ? पुरुषाची अधिकाराची हांक काय, कीं स्त्रियांची नैसर्गिक लज्जा काय, कीं छातीची धडधड काय...केवढे मान, केवढीं भाग्यें असतात हीं ! तीं वडिलांनीं परस्पर खरेदी करून आणलेलीं ज्यांना परवडतात ते पुरुष तरी कसले आणि त्यांची विद्या तरी कसली ? म्हणे हे शांकुतल वाचतात !—आणि महाभारतकालीन समाजस्थितीवर लेख लिहितात !

" कांहीं असो ! त्या समाधानामुळें आणि प्राथमिक विजयामुळें मी मोकळेपणानें बोलूं तरी शकलें. नाहीं तर दुपारच्याप्रमाणें खालीं उतरलें असतें तर– आणि मी खास उतरलें असतें !– त्या घरांत त्या दिवशीं साप निघाल्याहूनहि अधिक खळबळ उडाली असती. घरांतल्या कर्त्या बायका खालीं जिन्याशीं कान देऊनच बसल्या होत्या."

" तसंच कांहीं नाहीं ! " मी थंडपणें म्हणालें.

" तुझ्या मनांत पुढं शिकायचं होतं ? " त्यांनीं विचारलें.

" असे काय मोठे आमच्या शाळेंत शिक्षक आहेत कीं, पुढें न शिकण्यानें मला पश्चात्ताप व्हावा ? आणि तसं पाहिलं तर माझं शिक्षण अद्यापहि आणि इथेंहि चालूच आहे ! "

" तुझ्या मनांत पुढें कांहींहि करायचं असो. 'हें' करायचं मात्र खासच नव्हतं ! "

" 'हें' म्हणजे ? "

" लग्न आणि बायकोपण ! "

" तुम्ही म्हणतां तें खोटं नाहीं ! "

" मी म्हणतों तेंहि खरं आणि तूं म्हणतेस तेंहि खरं ! तूं मला वाटलीस त्यापेक्षांहि हुशार दिसतेस; तरी एकंदर प्रकारांत माझं काय चुकलं हें तुलाहि सांगतां येणार नाहीं ! "

" मी हुशार आहें हेंच चुकलं ! "

" मग हें तुझं चुकलं ! "

" माझं हुशारपण ही माझी चूक; पण हुशार मुलीशीं लग्न केलंत ही तुमची चूक!"

" यानंतर कांहीं वेळ ते स्तब्ध होते. अखेर माझ्या खुर्चीपासून बरेंच अंतर सोडून ते अस्थिरपणें येरझारा करूं लागले. मला त्यांची कींव आली. खरें म्हणजे ते अगदीं संभावितपणेंच वागत होते; तर उलट मला कुणीहि कजागच म्हटलें असतें. पण परिस्थितीनेंच माझ्या चांगुलपणाची, मायाळूपणाची आणि दिलदार अंतःकरणाची गठडी बांधली आणि परिस्थितीनेंच त्यांच्या बेजबाबदार आयुष्यावर पांघरूण घालून गबाळ विचारकल्लोळाला दीनपणाचें अनुकंपनीय रूप दिलें."

" कांहीं वेळानें ते म्हणाले, " बरं! माझी चूक दुरुस्त करण्याला कांहीं इलाज?"

" मी स्तब्ध बसलें. ठोशाला ठोसा देतां येतो; पण शरण आलेल्याला फांशीं फर्मावणें निदान यमूच्या रक्तांत तरी नाहीं. आणि काय सांगूं, (यमू अश्रु लपविण्याकरितां खिडकीकडे पाहूं लागली.) माझ्या औदार्यानेंच अखेर मला तें किळसवाणें शरीरार्पण करायला लावलें. देवा, मला इतकी उदार कां केलीस?...इतकी दया कां दिलीस?..."

यमूचें सर्व अंग कापत होतें. आम्ही दोघेंहि स्तब्ध होतों. खालून यमूच्या मैत्रिणीकडून मोटार येऊन हॉर्न देत होती. यमूनें माझ्याबरोबर आपल्या घरींच मंगळागौर जागविण्याचें ठरविलें. यमूकडून स्वतःच्या अभिमानी हृदयाची विटंबना ऐकण्याची माझी इच्छा नव्हती. पण हें दुःख कोठें तरी ओकणें तिलाहि आवश्यकच होतें आणि तिला माझ्याखेरीज हृदयाविष्करणाला जागाच नव्हती.

यमू मन आवरून पुढें बोलूं लागली, " मीं जें बोलत आहें तें बोलण्याची मला शरम वाटते; पण शरीर बलात्काराला बळी होऊन

भ्रष्ट झाल्यावर जिभेची आणि कानांची गय कशाला करूं? मीं जगाला मेलेंच आहें. लोकांना विकलेल्या तोंडावर खोटें हसें आणूनच मी जन्म काढणार; पण तुम्ही जगांत असून जगाला धक्के देऊं शकाल. निदान एका कुमारिकेचें नशीब तरी तुमच्या हवालीं आहे. आणि शिवाय माझ्या दुःखानें मीं तुम्हांला दुःखी न करीन तरच तुम्हांला अधिक क्लेश होतील हें जाणूनच मी बोलत आहें !

"मला त्यांची कींव आली आणि मी म्हणून गेलें कीं, 'तुमची चूक दुरुस्त करणें तुमच्या हातीं नाहीं आणि झाली ती चूक तुमची एकट्याची नसून तुमच्या-आमच्या बापजाद्यांची आहे. माझ्या आयुष्याचें मातेरें तुमच्याकरवीं जगानें केलें आहे; पण तुमच्या जवानीचें आणि घराचें मातेरें मी करीन तर माझ्या दोषांचे वांटेकरी रूढि, समाज, आईबाप यांतून कोणीच होणार नाहीं !

'मी तुमची लग्नाची बायको आहें. अर्थात्, माझ्या दुःखाला किंमतच नाहीं !'

"त्यांना माझें बोलणें चाबकाप्रमाणें लागत होतें. ते अखेर माझ्याजवळ आले आणि डोळ्यांत अश्रु आणून प्रत्यक्ष माझ्या पायां पडण्याकरितां वांकले आणि म्हणाले—

"मी गुन्हेगार आहें ! मला क्षमा कर !"

मी त्यांच्या दोन्ही दंडांना हात लावून उठवून म्हटलें, "हें काय? हें काय? तुम्हांला हें शोभत नाहीं !!

"आणि आतां त्यांच्या शरीराला स्पर्श करतांना मला किळस आली नाहीं ! जें काम प्रेम पत्करूं इच्छीत नव्हतें, जें काम वासनेच्या अग्नीनेंहि झालें नाहीं, तें काम अनुकंपेच्या शीतल जलानें केलें !"

"मी माझ्या शरीराला विटलेंच आहें ना?...होऊं द्या त्या हतभागी हाडामासाच्या पेटाऱ्याची विटंबना ! यमू अशी कोण लागून गेली

आहे? हजारों स्त्रियांप्रमाणें तिचेंहि शरीर पुरुषाच्या वासनेचें सवंग खाद्यच आहे!

"मला यापुढें प्रश्नोत्तरें वाढवावयाचीं नव्हतीं. मीं चटकन् उठून पलंगावर अंग टाकलें, कारण मी आतां दमलेंहि होतें.

"अरेरे! वासना,— शरीरधर्म ही गोष्ट अशी आहे कीं, सात्त्विक संताप, पश्चात्ताप वगैरे सर्वांसच तीपुढें हार खावी लागते!

"त्यानंतर एका क्षणांत मीं त्या गतानुगतिक निरपराधी धनिक तरुणाच्या जवानीचें सार्थक केलें आणि स्वतःच्या शरीरास चामड्याच्या पादत्राणाहूनहि कमी लेखायचें असें ठरविलें!

"मी सांगू का? सर्व सांगू का?......मला माझा अधिक वीट कां आला सांगू का? ......

"मी त्या रात्रीं माझ्या शरीराचा उपभोग घेऊं दिला याचाच अर्थ (आरंभीं मनाप्रमाणेंच शरीरानेंहि केलेला विरोध सोडल्यास)... मीं त्या प्रकारास पूर्ण अनुमति दिली. माझ्या शरीरानें तरी सुखानुभवाची कबुली दिली...आणि लवकरच वासराला विसरून मालकाला खुषीनें धार देणाऱ्या गाईप्रमाणें मी ठरल्या वेळीं मनाला यत्किंचितहि क्लेश न होतां माडीवर दाखल होऊं लागलें!

"अरेरे! पण माझा आत्मा इतक्या लवकर सैतानाच्या स्वाधीन झाला नाहीं. आणखी एक अन्तकालीन किंकाळी त्यानें फोडली!

"त्या रात्रीनंतर एके दिवशीं आमच्या घरांतील बायकांबरोबर मीं देवाला गेलें होतें. बायकांच्या प्रदक्षिणा चालू असतां मी देवळाच्या मागील विहिरीवर बसलें होतें. मला तें पाणीच माहेर दिसूं लागलें आणि माझें नांवाचें माहेर कसाईखान्याप्रमाणें वाटूं लागलें. मी विहिरीच्या शेवटच्या पायरीवर जाऊन बसलें होतें. खालीं सोडलेल्या पायाला थंडगार पाण्याचा सुखस्पर्श होत होता; त्या शांत

जलसंचयांत माझें मुख, मला सुख... अरेरे! आज दुःख देत होतें. ज्या माझ्या मुखाचें अवलोकन करावयासहि पुण्याई लागे तें आज स्वतः-च्या व दुसऱ्याच्या वासनेचीं चिन्हें धारण करीत होतें. तोंडावरील त्या ओंगळ पुटकुळ्या, तें गर्वहत शरमिंधें तोंड, कीं जें पाहून गलित-गात्र सास्वांना आपल्या कारवायांनाच जणूं दृश्य फळें आलींसें वाटत होतें— तें तोंड पाण्यांत कां गाडूं नये? यमूचें हें शरीर कीं पाशवी विकारांचें शमन हेंच ज्याचें अंतिम साफल्य, जें वासनांनीं फुलतें, तारुण्यानें फुगतें, दुसऱ्याच्या शरीराचें खेळणें बनतें, दुसऱ्याच्या विलासांनीं आणि विटंबनांनीं फिरून जास्तच फुगतें व फुलतें, त्याला कासवांना—माशांना खाऊं घातलें तर काय वाईट?...

"आणि त्या क्षणीं मला तुमची आणि तुमच्या शिकवणीची आठवण झाली. तुम्ही मला एकदां म्हणाला होतां आपलें दुःख, आपली लज्जा जगाला सांगणें हेंदेखील एक लोक-कार्यच होय. आणि त्या एका वाक्याबरोबरच तुमच्या अनंत वाक्यांची आठवण झाली... त्या दिवशींहि आपण असेंच अपरात्रीपर्यंत बोलत बसलों होतों... आणि त्या रात्रीबरोबर अनंत रात्रींची आठवण झाली. तुमचा यमूविषयींचा अभिमान, तिच्या रूपाविषयींचा मूक अभिमान, तिच्या थोर मना-विषयींचा बोलका अभिमान, तिच्या बुद्धीविषयींचा सभय गर्व, सर्व मला आठवलें. यमूला शहाणी करण्याची तुमची धडपड तिच्या भावी स्थितीविषयींची चिंता, तिच्या मुग्धतेनें होणारा तुमचा कोंडमारा तिच्या धीटपणानें उडणारी धांदल, ...सर्व — सर्व कांहीं आठवलें. आणि निदान माझ्या सुख-दुःखाचे स्वयंस्फूर्त आणि निरपेक्ष वांटेकरी जे तुम्ही, त्या तुम्हांला तरी माझें हें दुःख, ही लाज सांगितल्याखेरीज तर मला मरावेंसेंहि वाटेना......!

"हीच तुमच्या यमूच्या लग्नाची कहाणी. हेंच तुमच्या यमूचें सुख-दुःख. यमू तुम्हांला फसवीत नव्हती, यमू कांहीं लपविणारहि नव्हती.

अशा लग्नानें सुखी होण्याइतकी यमू बदललीहि नाहीं...कीं, अशा दुःखांनीं रडण्याइतकी यमू कोमलहि राहिली नाहीं. तुमची यमू आहे तीच आहे; आणि यमूला तुम्हीं होतां तेच आहांत. माझ्या निर्लेप मनाचे अभिमानी, माझ्या सुखदुःखाचे वाटेकरी, माझ्या बालबुद्धीचे शेतकरी, तुम्हींच होतां— आणि तुम्हींच आहां !

"यमू तीच आहे, पण तुमच्या सहवासांत गेले ते दिवस पुनः येणार नाहींत......!"

यमूचा आपल्या अश्रूंवरील ताबा सुटला. ती स्फुंदून उघडपणें रडूं लागली.

१७

कूच ए यारसे हम दूर चले जाते हैं ।

[प्रिय व्यक्तीच्या निवासस्थळापासून मी आज दूर चाललों आहे !]

अरेरे ! जिचा एक सुस्काराहि माझ्या गात्रागात्रांना कंपित करी, जिचें दुःख पाहतांच मला जगांतील सर्व सुखें तुच्छ वाटत तीं आज माझ्यापासून दीड वितीच्या अंतरावर अंतर्वेदना असह्य होऊन मुक्तकंठानें रडत असतां मी तिचे अश्रु पुसूंहि शकत नव्हतों !

ज्या टेबलाशीं यमू व मी अनेक वेळ—अनेक तास, दुःखाची कल्पनाहि नाहीं अशा त्या पूर्वकाळीं बसलों होतों, त्यावर दोन्ही हात व त्या हातांवर डोकें टेकून यमू किती तरी वेळ तशीच स्फुंदत होती. छातीपासून केशकलापापर्यंतचा तिचा सर्व भाग कंपायमान होत होता. केशबंधाच्या खालपासून तों पाठीवरील ब्लाउजच्या कॉलरपर्यंतचा सर्व भाग लालबुंद झाला होता. अश्रूंनीं भिजलेलें तिचें आरक्त मुख मला दिसत नव्हतें; पण सुगंधी फुलांच्या वेणीनें वेष्टिलेला

तिचा तो विशाल केशबंध – तिच्या बिनमोल प्रेममय अंतःकरणाच्या खालोखाल माझ्या मनावर अधिराज्य गाजविणारा तिचा तो घनदाट केशकलाप – आज माझ्या मनाला सुखानें नव्हे, दुःखानें व्याकुळ करीत होता !

अरेरे ! एखाद्या बहुमोल हृदयांत प्रवेश मिळावा, पण त्याच्या वेदनांना स्पर्श करण्याचें मात्र सामर्थ्य नसावें; एखाद्या कमलकोमल शरीराचें अखिल जीवन आपल्या सान्निध्यांत जात असून तें होरपळून निघत असतां मात्र स्वतःचे अश्रु शिंपून ते क्षणभर सौम्य करण्याचाहि अधिकार नसावा, यापेक्षां दुर्दैव तें कोणतें ?... ज्या विवाहविधीच्या मुळाचा शोध घेत मीं समाजाच्या जन्मापर्यंत पर्यालोचन केलें, विधीन् विधि, रूढीन् रूढि पारखून पाहिली, त्याचें हें दुष्ट आणि राक्षसी स्वरूप स्पष्ट झाल्यावर अखेर आपण त्यापुढें हतबल आहोंत एवढेंच कळून यावें काय ?... नाहीं ! मी हतबल कसा ?... यमू दुःखमग्न असून मी तिचें दुःख निवारूं शकत नव्हतों; पण यमू समाजाच्या अनंत प्रवाहांतील एक ओंजळ होती आणि मीहि त्याच प्रवाहाच्या दुसऱ्या तीराकडील एक ओंजळच होतों. ती स्त्री होती, मी पुरुष होतों. ती माझ्या साहाय्यानें आतांशी डोळे उघडीत होती; तर माझे दोन्ही नेत्र प्रथमपासून उघडे होते आणि अनंत नेत्र उघडण्याचें सामर्थ्य मजजवळ होतें.

तें कांहींहि असो; आपलें मंगल शरीर दुसऱ्याच्या उपभोगाचें हतबल साधन असें वाटून प्राणत्याग पत्करण्यास मीं तरी एखाद्या कुमारिकेस उद्युक्त करणार नाहीं ! मी तरी असल्या राक्षसविवाहांतील वरपक्ष म्हणून मिरविण्यांत पुरुष-जन्माचें सार्थक मानणार नाहीं. मी अविवाहित राहणार व स्त्रीजातीच्या परमोच्च स्वरूपाची समाजास ओळख करून देणार !

मी अशा प्रकारें दूरस्थ कर्तव्याच्या वाटेकडे तोंड करून अंतस्थ

दुःखावर पडदा ओढण्याचा व्यर्थ प्रयत्न करीत आहें तोंच रडून लाल झालेले यमूचे भेदक डोळे मजकडे पाहूं लागले होते.

तिचे विचार जणूं माझ्या विचारांना स्पर्श करूनच वाहात होते!

"तुम्हीं लग्न करून टाका!" एकदम बुडत्याला कांहीं आधार सांपडल्याप्रमाणें यमू म्हणाली.

"यमू!...लग्न?...लग्न म्हणजे काय हें माहीत नव्हतें तोंवर अंधारांत उडी नको म्हणून मी लग्न केलें नाहीं. आणि लग्न म्हणजे काय हें कळून आल्यावर अंगारांत उडीं नको,--शिवाय दुसऱ्यास गळ्यांत घेऊन उडी नको--म्हणून आज मी लग्न करीत नाहीं. यमू! लग्न म्हणजे तूं काय समजतेस? स्त्री आणि पुरुष मिळून परमेश्वराची एक अद्वितीय अशी कृति पूर्ण होते. या कृतींतील एका अर्धास दुसरा अर्ध माहीत झाल्याशिवाय त्याच्या जन्माचें सार्थक नाहीं. हें परस्परांचें ज्ञान हाच लग्नाचा श्रेष्ठ अर्थ आणि हाच लग्नाचा अंतिम हेतु! कारण ज्ञान--खरें ज्ञान-- म्हणजे दोन जीवांस एकमेकांच्या भुका समजणें. "One passion in two bosoms." हें शेलेचें आपण वाचलेलें वाक्य तुला आठवत असेलच! असें होणें म्हणजेच ज्ञान. चार पैशांच्या भूगोला-च्या पुस्तकावरदेखील "न हि ज्ञानेन सदृशम्" असें लिहिणाराला कळणारें पुस्तकी ज्ञान म्हणजे बुद्धिरूपी स्फुलिंगावर ओतलेली मातीच होय. आज अनेक वर्षें तुझ्या हृदयांतील प्रत्येक विचार, विकार, वासना यांशीं एकजीव होऊन मीं कोणत्याहि विवाहिताहून स्त्री-हृदयाचें अधिक खोल ज्ञान व स्त्री-हृदयांत अधिक खोल जागा मिळविली आहें. मला विवाह करून काय करावयाचें आहे? ज्यांना शारीरिक धर्माहून उच्च धर्म नाहीं, तेच विवाह करतात. मला वाटतें, आपण नीत्शेच्या "एक्सि होमो"तच वाचलें--"No great man ever married......"

पण नीत्शेचें कष्टमय जीवन डोळ्यांपुढें येऊन माझ्या डोळ्यांना पाणी आलें. आणि मी म्हणालों "यमू! तूं मात्र अखेर मला एकट्याला सोडून नीत्शेच्या बहिणीचें अनुकरण केलें आहेस. आतां या दुःखातिरेकानें मला नीत्शेप्रमाणें बुद्धिभ्रंश न होवो म्हणजे झालें!"

"नाहीं!" यमू आवेशानें म्हणाली. "तुम्हांला बुद्धिभ्रंश होणें शक्य नाहीं व मीं नीत्शेच्या बहिणीप्रमाणें लग्नहि केलें नाहीं.... मीं शरीरविक्रय केला आहे!... मला तुमच्याइतका जवळचा आप्तहि नाहीं व सखाहि नाहीं....आणि तुमच्या बुद्धिसामर्थ्याच्या शतांशाची जर मला ओळख झाली असेल, तर मी असें सांगतें कीं, यमूच्या विवाहानेंच काय, विटंबनेनें, किंबहुना विनाशानेंहि तुम्हांला बुद्धिभ्रंश होणें शक्य नाहीं. सुख असो कीं दुःख असो, विराट् जगताचा विस्तार असो कीं अल्लड कुमारिकेचें कोमल शरीर असो; कशांतूनहि तुम्हांस कर्तव्याचा व ज्ञानाचाच मार्ग आजवर दिसला आहे!

"पण तें असो, तुम्ही समाजाचा उद्धार करा, अगर करूं नका. सहस्रावधि कुमारिकांच्या दुःखांचें निवारण करा अगर नुसतें निदान करा...पण विवाह करा! हा केवळ, माझा मायेचा आंधळेपणा आहे असें समजूं नका. लाखों जीवांच्या भविष्यत् काळांतील सुखाकडे टीचभर अंतर चालून जाण्यांत जन्म घालविण्यापेक्षां श्रीविष्णूप्रमाणें तीनच पावलें टाकून एकाच कुमारिकेचें पण समग्र जीवन धन्य करा! लग्न करा!"

होय! हे प्रेमाचे शब्द होते—हे हिताचे शब्द होते—पण जिच्यावर माझें प्रेम व जिचें हित हेंच माझें सर्वस्व, तिचें सर्वस्व नाहींसें झाल्यावर मी माझें हित कसा साधूं? आणि स्वतःच्या जीवाचें सुख संपलें, म्हणजे आम्ही वेदान्ती जीव जगाच्या सुखाकडे वळत असतों. मला

आतां लोककल्याणाचा दूरचाच प्रवास हवा होता. भावी पिढ्यांकडेच नजर लावणें मला जरूर होतें.

ज्या मेजाशीं बसून आम्हीं तासन् तास एकमेकांच्या हृदयांचे सोपान बनवून ज्ञान-शिखराची वाट तुडाविली, ज्या घरांत मीं यमूचें—माझ्या जीवनाच्या वाटेवरील एकमेव दीपिकेचें—वास्तव्य आजवर तल्लीनपणें पाहिलें... त्याच घरांतून आज मी कायमची दूरची वाट धरणार होतों!

* * *

रात्रीचे दोन वाजले होते. घरांतील स्त्रीपुरुष झोंपीं गेले होते. दूर-दूरच्या वाड्यांतून मंगळागौरीच्या मुलींच्या गाण्यांचे, फुगड्यांचे आणि हसण्याखिदळण्याचे आवाज ऐकूं येत होते. उशिरां उगवलेला चंद्र ढगांतून वाट काढीत होता आणि तोहि मला आज एक म्लानमुख चिरप्रवासी वाटत होता!

ज्या झाडांच्या चिंचा यमू गोड अध्ययनाबरोबर तोंडीं लावणें म्हणून ठेवीत असे, त्यांच्या ओल्याचिंब बारीक दाट पानांवर चंद्राचे किरण लकाकत होते. या प्रचंड वृक्षांकडे पाहून मला गतायुष्यांत कशामुळें कोण जाणे, स्थैर्याची भावना मनांत येई. आज एकदम मला वाटलें, कोणीं सांगावें? उद्यां त्या बाजारी मालकाच्या मनांत येण्याचा अवकाश, कीं तीन दिवसांत हे वृक्ष जमीनदोस्त होतील! ......

यमूच्या अनुज्ञेची वाट न पाहातां, अश्रूंचीं कदर न करतां मीं डोक्याला टोपी घातली, उठलों व दाराकडे वळलों. याच दारांतून अनेक वेळां रात्रीं अकरा वाजेपर्यंत मजबरोबर वाचन संपल्यावर जिन्याखालीं मला यमूनें वाट दाखविली होती.

अरेरे! पण ती वाट तेव्हां फिरून यमूकडेच वळे त्या वेळचा चंद्र फिरून उगवे; पण आज आमच्या सहजीवनाची व उज्ज्वल

आशेची चांद्रिका कायमची मावळणार होती. आजहि यमू दारापर्यंत आली होती.— आजहि ती मला हातांतील दिव्यानें वाट दाखवीत होती—आजहि जपून जा म्हणून सांगत होती! आणि तरी......

" फार विचार करूं नका!... जपून जा!" हे यमूचे शेवटचे शब्द कानांत घुमत असतांच फार विचार करीत त्या उत्तररात्रींत मी फारच दूर गेलों!

माझें तोंड अमर्याद निर्जन रात्रीकडे, यमूचें तोंड माझ्या पाठीकडे... यमूनें धारण केलेल्या दीपाच्या प्रकाशांतच पावलें टाकीत मी यमूपासून दूर जात आहे... अशा स्वरूपांत त्या रात्रीं सुरू झालेली माझी जीवनयात्रा आजहि चालू आहे!

१२ जुलै, १९४०.

समाप्त

कूच ए यारसे हम दूर चले जाते हैं।
अपनी तबियत्से हैं मज़बूर चले जाते हैं ॥
हम किधर जाते हैं ये भी हमे मालूम नही।
बाद् ए इष्कमें मख्मूर चले जाते हैं ॥

“ प्रिय व्यक्तीच्या निवासस्थळापासून मी आज दूर जात आहें.
आपल्या वृत्तींनींच अगतिक होत्साता,-मी दूर जात आहें.

मी कुठें जात आहें हेंहि मी जाणत नाहीं !
प्रेमाच्या मदिरेनें मत्त असा मी-दूर जात आहें!”

परिशिष्ट

१. भावकथेचें भावसूत्र

प्रकरण १— **पूर्वपीठिका**— नायकाचा विवाहविषयक दृष्टिकोन.
" २— नायिकेचें स्वभावचित्र व भावी दुःखानुभवाची छाया.
" ३— वधूपरीक्षेच्या प्रसंगानें नायिका... तिचीं मातापितरें... नायक व इतरेजन यांचें मनोविश्लेषण.
" ४— विवाह-निश्चय.
" ५— विवाह-प्रसंग.
" ६— वरपक्षीयांचे अधिकार व अभिमान.
" ७— वराच्या मनोरचनेचें पृथक्करण.
" ८— वरपक्ष आणि वधूपक्ष.
" ९— कन्यावियोग...नायिकेचें पितृगृहींचें स्थान.
" १०— नायिकेच्या स्थित्यंतरासंबंधीं नायकाच्या भावना... अनपेक्षित भेट.
" ११— नायक-नायिकेच्या पूर्वसंबंधांचें निवेदन.
" १२— नायक-नायिकेची पुनः भेट... नायकास त्रस्त करून सोडणारा प्रश्न, " पूर्वीची यमू आतां अवशेष होती काय ? "
" १३— नायिकेचें वीररसाचें आवरण... आजवरच्या प्रतारणेचें स्पष्टीकरण... लग्नाला तयार होण्याचें कारण.
" १४— गतगोष्टींचा परिस्फोट... नायिकेला आईकडून ऐकावें लागलेलें शहाणपण... नायकास त्रस्त करणारा आणखी एक प्रश्न.
" १५— नायिकेचें हृदयाविष्करण... नववराची पहिली भेट.... सासरच्या मंडळींची वृत्ति... नायिकेची वृत्ति.
" १६— प्रथम-मीलनाच्या वेळची मनःस्थिति व प्रश्नोत्तरें... वधूची सदयता व मीलन... नंतरच्या मानसिक यातना व हृदयाविष्करण.
" १७— **उपसंहार**– नायकाच्या अंतर्वेदना; नायकाचा ध्येयवाद, व विवाह-विषयक ध्येयवादी कल्पना... नायक-नायिकेच्या एकमेकांसंबंधींच्या शेवटच्या भावना व निरोप.

[प्रस्तुत भावकथेंत केवळ चित्रण व पृथक्करण आढळेल. सिद्धान्त प्रायः आढळणार नाहींत व जे आढळतील ते नायक-नायिकेचे त्या क्षणीचे विचार समजावेत. लेखकाचीं मतें प्रस्तावनेंत आढळतील.]

२. परकीय कवींचे व तत्त्ववेत्त्यांचे उल्लेख

पृष्ठ २९:—टेनिसन्च्या मूळ ओळींत Book ऐवजीं Child आहे. नायकास मौन सोडावयास लावण्याकरितां नायिकेनें त्याला पोटच्या मुला-प्रमाणें प्रिय असलेलें 'शेली'च्या कवितांचें पुस्तक त्याच्या मांडीवर ठेवलें असा भाव.

,, ३८:—कण्वानें "इमे अपि... इ." म्हणजे याहि कन्यकांचें कन्यादान व्हायचेंच आहे!" असें शकुंतलेच्या सख्यांविषयीं म्हटलें आहे. येथें इतर मुलींच्या रडण्यावरून "याहि मुलींचीं एक दिवस अशींच लग्नें होणार!" असें नायकाच्या मनांत येऊन गेलें.

,, ७१:—**'विन्टर्स् टेल'** :—'लिऑन्टिस्' व 'पॉलिग्झेनिस्' यांच्या बाळ-मैत्रीचें वर्णन. "आम्ही दोघे आवळ्या-जावळ्या कोंकरांप्रमाणें होतों...दुष्टपणा ही काय चीज आहे, हेंहि आम्हांस माहीत नव्हतें व जगांत कोणास माहीत असेल अशीहि कल्पना नव्हती." नायक-नायिकेचे मुग्ध-मधुर संबंध या अवतरणानें सुंदरपणानें चित्रित होतात.

,, ९९:—प्रस्तुत प्रकरणांत नायिकेच्या चरित्रावरूनहि दया आणि दुःख ("आँचलमें दूध" आणि "आँखोंमें पानी") हेंच स्त्रियांचें नशीब ठरत आहे.

,, १०९:—"One passion in two bosoms" ही मूळ ग्रीक कल्पना आहे. 'शेली'नें **'एपिसायूकिडिऑन्'** या काव्याच्या प्रस्तावनेंत हें प्रेमाचें लक्षण म्हणून दिलें आहे. प्रस्तुत कथेच्या नायकानें हीच ज्ञानाची व्याख्या करून ज्ञानमार्ग व प्रेममार्ग अन्तीं एकच असें सूचित केलें आहे. कोणत्याहि वस्तूच्या पूर्ण आकलना-शिवाय खरें प्रेम शक्य नाहीं व प्रेमाशिवाय खरें आकलन शक्य नाहीं.

,, १०९:—"कूच ए यारसे..." इ० ओळी सुप्रसिद्ध नाटककार **आगा-हश्र काश्मीरी** यांच्या मूळ ओळींत किंचित् फरक करून मीं बनविल्या आहेत. मुळांतील ओळी अगदीं विरुद्ध अर्थानें वापरल्या आहेत. एका महान् साहित्यिकाच्या शब्दांत सोयीप्रमाणें फेर केल्याबद्दल ऊर्दूभक्त मला क्षमा करतील अशी आशा आहे.

[यांखेरीज **नीत्शे, शोपेन-हॉर** वगैरेंचे उल्लेख विषयानुरोधानें अवश्य म्हणूनच आले असले, तरी "आपला **नीत्शे,** आपला **शोपेन-हॉर**" वगैरे शब्दांनीं नायक-नायिकेचें बौद्धिक सहजीवन ध्वनित करण्याचाहि हेतु आहे.]



रा. श्रीकृष्ण केशव क्षीरसागर हे, वाङ्मय आणि जीवन यांचे मार्मिक टीकाकार म्हणून विद्वानांच्या आदरास पात्र झाले आहेत. त्यांच्या वाङ्मयविषयक टीकालेखांत चिकित्सकता व सहृदयता, विद्वत्ता व भाषासौष्ठव यांचें दुर्मिळ असें मधुर-मीलन पाहावयास सापडतें. 'लोकहित-वादी', 'ज्ञानकोशकार केतकर' वगैरेवरील त्यांचे सुविस्तृत प्रबंध व महत्त्वाच्या ग्रंथांवर त्यांनीं लिहिलेलीं मूलग्राही परीक्षणें वाचणारास वरील सत्याचा प्रत्यय सहज येईल. मार्क्सप्रणीत जडवादास विरोध करणारे त्यांचे प्रबंध व स्फुट ललितलेख त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचें शुद्ध दर्पणच होत. वरील तात्त्विक लेख व भाषाशुद्धीवरील त्यांचे प्रखर टीकालेख यांनीं त्यांचें नांव तत्त्वप्रधान टीकाकार व विवादपटु म्हणून प्रसिद्धीस आलें. तथापि त्यांचें ललितलेखन— मनोविश्लेषणात्मक लघुकथा, लघु-निबंध वगैरेहि— वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या रूपानें त्यांच्या ललितलेखनाचा उत्कृष्ट नमुना वाचकांपुढें येत आहे. त्यांच्या ललितलेखनांत व तात्त्विक निबंधांत एकच तत्त्वज्ञान आढळेल. रा. क्षीरसागर हे साक्षात्कारवादी सौंदर्यपूजक आहेत. तथापि सामाजिक दृष्टीसहि ते पारखे नाहींत. व्यक्ति आणि समाज यांच्या अंतिम विमोचनाबद्दल त्यांना दृढ श्रद्धा आहे. आणि या विमोचनाचा योग्य मार्ग आध्यात्मिक दृष्टिकोनाशिवाय सापडणें अशक्य आहे, असें त्यांचें निःसंदिग्ध मत आहे. प्रस्तुत भावकथेंत मनोविश्लेषण, समाजविश्लेषण आणि सात्त्विक प्रणय यांतील कशास प्रधान स्थान आहे हें सांगणें सोपें नाहीं. तथापि, याहि पुस्तकांत रा. क्षीरसागर यांचें सर्वस्पर्शी तत्त्वज्ञान प्रतिबिंबित झालेलें आढळेल. आणि त्याबरोबरच सात्त्विक प्रणयाचें इतकें हृदयंगम चित्र मराठींत इतरत्र दुर्मिळच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं.

G. K.

राजगुरु प्रेस, पुणें २.